# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – २२

## सभावृत्तांत

दिनांक – १९.९.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर-२०१८ ची मा.महापालिका सभा बुधवार दिनांक १९.९.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा. नितीन (आप्पा) प्रताव काळजे | |
| ९) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| १०) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| ११) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १२) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १३) | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | |

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.गोफणे अनुराधा देविदास

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.अजित दामोदर गव्हाणे

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे सारिका संतोष

२१) मा. लांडगे रवि लक्ष्मण

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२६) मा.सावळे सिमा रविंद्र

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा. लांडे विक्रांत विलास

२९) मा.गीता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.केशव हनुमंत घोळवे

३५) मा.मंगला अशोक कदम

३६) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३७) मा.अश्विनी भिमा बोबडे

३८) मा. योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३९) मा.संजय बबन नेवाळे

४०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४१) मा.भालेकर प्रविण महादेव

४२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४५) मा.घोलप कमल अनिल

४६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.जावेद रमजान शेख

४९) मा.यादव मीनल विशाल

५०) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५१) मा. प्रमोद कुटे

५२) मा.राजू मिसाळ

५३) मा. शैलजा अविनाश मोरे

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.ढाके नामदेव जनार्दन

६०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६१) मा.करुणा शेखर चिंचवडे

६२) मा.भोईर सुरेश शिवाजी

६३) मा.अपर्णा निलेश डोके

६४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६७) मा.जयश्री वसंत गावडे

६८) मा. कोमल दिपक मेवाणी

६९) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७०) मा.सुलक्षणा राजू धर

७१) मा.शाम गणपतराव लांडे

७२) मा.सुजाता सुनिल पालांडे

७३) मा.योगेश मंगलसेन बहल

७४) मा.कदम निकीता अर्जुन

७५) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७८) मा.नढे विनोद जयवंत

७९) मा. पाडाळे निता विलास

८०) मा.काळे उषा दिलीप

८१) मा. कोकणे संतोष अंकुश

८२) मा.पवार मनिषा प्रमोद

८३) मा.बारणे अर्चना तानाजी

८४) मा. अभिषेक गोविंद बारणे

८५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८६) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

८७) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८) मा.बारणे माया संतोष

८९) मा.निलेश हिरामण बारणे

९०) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९१) मा.दर्शले रेखा राजेश

९२) मा.कलाटे राहुल तानाजी

९३) मा. कलाटे मयूर पांडुरंग

९४) मा.ममता विनायक गायकवाड

९५) मा.कामठे तुषार गजानन

९६) मा. चोंधे आरती सुरेश

९७) मा.कस्पटे संदिप अरुण

९८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१००) मा. चंद्रकांत बारकु नखाते

१०१) मा. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२) मा.कुटे निर्मला संजय

१०३) मा. शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०४) मा. विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०५) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०६) मा.मुंढे उषा अंकुश

१०७) मा.कदम शशिकांत गणपत

१०८) मा.लोखंडे चंदा राजू

१०९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११०) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१११) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११२) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११६) मा. संतोष बबन कांबळे

११७) मा. उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११८) मा. हर्षल मच्छिंद्र ढोरे

११९) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२२) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.कोळंबे-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.तूपे, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डॉ.साळवे- वैद्य.संचालक, मा.झगडे, मा.खोत, मा.दुर्गूडे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.लडकत, मा.घोडे,

मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.पाटील, मा.पवार, मा.सुपेकर -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे एक वर्षासाठी किमान पदवीधर असलेल्या सदस्याचे नामनिर्देशन करणेस मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल - ९९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

२) २०६ पिंपरी (अ.जा) विधानसभा मतदार संघामधील पहील्या टप्प्यामध्ये सोबत सादर केलेल्या CD मधील यादीनुसार संबंधित यादी भागातील ४६४५ मतदार वगळणी प्रस्तावस मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल - ९९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

३) **डॉ.राजेंद्र नामदेव वाबळे** यांची **अधिष्ठाता (गट 'अ')** या पदावर जाहिरातीत नमुद केलेल्या विहित अटी व शर्ती नुसार अस्थायी अस्थापनेवर ३ वर्षे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर नियुक्ती करणेकामी तसेच त्यांना मानधनापोटी दरमहा अदा करावयाचे खर्चास मान्यता देणेबाबतचा

मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल - ९९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रपत्र 'अ', प्रपत्र 'ब', मधील २७ पदांवर अध्यापकांची जाहिरातीत नमुद केलेल्या विविध अटिशर्तीनुसार अस्थायी अस्थापनेवर तीन वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात एकत्रीत मानधनावर नियुक्ती करणेकामी तसेच दरमहा मानधनापोटी सोबतचे प्रपत्र 'क' मध्ये नमुद केलेप्रमाणे अदा करावयाच्या संभाव्य खर्चास मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल - ९९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

५) स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत करण्यात येणा-या कामास प्रशासकीय मान्यता व नियोजित कामांना वाढ/घट द्वारे करावयाची तरतुद यास मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल - ९९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सिमा सावळे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. बाहेर दत्ताकाका साने यांनी कुत्र्याची लहान लहान पिल्ले आपण गावाला नेण्याची जी बॅग असतेना त्या बॅगेमध्ये चैन बंद करुन याठिकाणी आणलेली आहेत. त्या पिलांना त्यांच्या आईपासून वेगळे करुन आणले आहे. त्यांच्या आंदोलनाला आमचा विरोध नाही. आंदोलन करायच जर असेल तर त्यांनी ते निश्चितपणे कराव, विरोध नाही. आंदोलनाला आमचा विरोध नाही. परंतु कुत्र्याची जी पिले आणली आहेत ती त्या बॅगमध्ये चैन बंद करुन आणलेली आहेत. उदया एखाद कुऱ्याच पिलू दगावले तर याला जबाबदार कोण. कोणाला आपण जाब विचारणार आहेत आणि इतकी पातळी घसरली की लहान जी पिले आहेत त्यांना तुम्ही बॅगेमध्ये बंद करुन आणता. एखादं मोठं कुत्र आणून सोडलं असतं तर आमच काही म्हणणे नव्हते. इतकी लहान कुत्र्यांची पिल्ले ती. आपल्या लहान मुलांच्या अंगावरील चुकून चादर किंवा टॉवेल त्याच्या नाकातोंडावर पडला तर आपण किती घाबरतो. मग ते जनावर आहे म्हणून त्याला कशीपण वागणूक देणार का. मा. कमिशनर साहेब पेटाच्या अंतर्गत जी कलम असतील त्या कलमाच्या अंतर्गत याठिकाणी दत्ताकाका सानेंवरती आणि त्यांच्या सहका-यांवरती गुन्हे दाखल झाले पाहिजेत. मा. महापौर साहेब, ज्याठिकाणी जीव जाण्याची शक्यता आहे आणि मूक्या प्राण्यांवर तुम्ही छळ करतांय. अस कुठल्याही प्रकारच आंदोलन सहन केल जाणार नाही. एक तर ती लहान पिले आहेत, अगदी नाजूक ती पिले आहेत. डोळे सुध्दा त्या पिलांनी अजून नीट उघडलेले नाहीत. नवजात पिलांना बॅगेमध्ये भरुन आणल जस सामायन भरुन आणतो आपण, निर्जीव वस्तु तशा त्यांनी भरुन आणलेल्या आहेत. ही पध्दत आहे का आंदोलनाची. इतकी तुम्हाला प्रसिध्दी हवी आहे का आणि प्रसिध्दीसाठी ते वाटेल ते करतात. मागच्या वेळेस प्रसिध्दीसाठी नकोनको ते प्रकार झालेले आहेत. विरोधी पक्ष आहे, विरोधी पक्षाने आंदोलने केली पाहिजेत. सत्ताधारी पक्षाच्या काही चुका असतीलतर त्या निदर्शनास आणून दिल्या पाहीजेत. परंतु त्यासाठी तुम्ही निष्पाप जिवाचा बळी घेता कामा नये. त्यांचे आंदोलन असेल तर त्यांनी कमिशनरांना, डॉ. रॉय असतील, दगडे असतील जे कोणी असतील, तुम्ही त्यांना घेराव घाला. तुम्ही काय करायच ते करा. परंतु तुम्ही सभागृहामध्ये कुत्र्याची पिले बंद बॅगेमध्ये घेऊन येता. मा. महापौर साहेब, याचे फोटो सुध्दा आम्ही काढलेले आहेत, हे योग्य नाही साहेब. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. सुरक्षा अधिकारी जरांडे आहेत त्यांनी त्यांना परवानगी दिलीच कशी. जिवंत पिल्ले आहेत ती.

रस्त्याने जाताना आपण गाडीच्या खाली सुध्दा कुत्र्यांच्या पिलांना येऊ देत नाही आणि हे असं बॅगेत चैन बंद करुन आणता. ते सगळयांना दाखवून देत आहेत बघा बघा मी कशी पिले आणली आहेत. काय गुन्हा दाखल करायचा असेलतर माझ्यावर करा. ही तर मुजोरी आहे आणि वरुन सांगायच तुम्हाला काय करायच ते करा म्हणून. मा. महापौर साहेब, अशा प्रकारचे वर्तन विरोधी पक्षनेत्यांना शोभत नाही. त्याचबरोबर त्यांच्या नगरसदस्यांना सुध्दा शोभत नाही. प्रसिध्दासाठी केलेलं हे आंदोलन आहे. त्यांच्या आंदोलनाचा मी याठिकाणी तीव्र शब्दात धिक्कार करते. तुम्हाला अडचण असेल, काम होत नसेल तुम्ही ठिया मांडा, तुम्ही मोठी कुत्री आणा, आवारात सोडा आमचं काही म्हणणं नाही. परंतु कुत्र्यांची पिल्लं तुम्ही बॅगेमध्ये भरुन आणली आहेत. आपण आपल्या पोरांना कधी बॅगेमध्ये भरुन नेले असतं का. एखाद पिल्लू मेलतर जबाबदारी कोणाची. दारात कुत्रे आले तर आपण त्याला भाकर टाकतो, मारत सुध्दा नाही. प्रेमाने बोलतो, गप्पा मारतो आणि यांनी तर बॅगेमध्ये भरुन आणलीत कुत्र्यांची पिल्ले. छोटी पिल्ले आहेत ती मोठीपण नाहीत. ती पण चैन बंद करुन. सभागृह नेते त्यांच्यावर गुन्हा दाखला व्हायला पाहीजे. अशा प्रकारचे वर्तन यांचे खपवून नाही घ्यायचे मा. महापौर साहेब, आपणांस विनंती करते की विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी बॅगेमध्ये भरुन कुत्र्यांची लहान पिल्ले आणली आहेत. त्यांच्यावरती पेटा कायदयाच्या अंतर्गत योग्य ती कार्यवाही व्हावी. या संदर्भात कायदयाचे काय नियम असतील ते कमिशनरांनी आणि डॉ.रॉय यांनी सांगावेत आणि त्यांच्यावर तशा प्रकारचा गुन्हा दाखल करावा.

**मा.उषा मुंढे -** मा. महापौर साहेब, सिमाताईंनी मांडलेल्या विषयाला मी अनुमोदन देते.

**मा. भाऊसाहेब भोईर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. आज सभागृहामध्ये इथे अगोदर काय चर्चा झाली मी काही ऐकलेली नाही. परंतु याठिकाणी आता जी काही घटना घडत आहे त्या घटनवेर अतिशय सामंजस्यान, कोणाच्याही दबावाला बळी न पडता सद्सदविवेकबुध्दी जागृत ठेवून अतिरिक्त आयुक्त आष्टीकर साहेब यांच्या समवेत एकनाथजी पवार यांनी विनंती केल्यानुसार निश्चितपणे तोडगा काढलेला आहे. यामध्ये भावना अशी होती की यापुर्वी देखील अशी प्रकरण डायरेक्ट सभागृहामध्ये घडल असल्या कारणानं त्यावर अतिशय मनापासून प्रशासन त्या मुद्दयावर झोपलेले आहे. त्यांना जागृत करण्यासाठी, शहराच्या दृष्टीकोनातून ही प्रतिकात्मक या ठिकाणी घटना घडत होती. परंतु आपल त्यावर जर मत नसेल की

याठिकाणी घडू नयेतर आम्ही त्याच्यावर तोडगा काढलेला आहे. पण त्याच्या पाठीमागचा उद्देश, उद्देश हा होता की जे अनेक नगरसेवक आहेत ते कोणत्या पक्षाचे आहेत हा मुद्दा नाही. फक्त राष्ट्रवादीच्या वॉर्डामध्ये, प्रभागामध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट आहे आणि त्यावर हे कटकारस्थान भारतीय जनता पक्षाचे आहे असाही आमचा आरोप नाही. हा संपुर्ण शहराचा प्रश्न आहे. त्यामुळे फार मोठे कटकारस्थान करुन त्याठिकाणी शहरातले एवढे भटके कुत्रे आहेत ते प्रभागवाईज फिरतात अशी काही परिस्थिती नाही. आयुक्त साहेब हा सर्वांचा प्रश्न आहे. आता सुध्दा पाडाळे ताई बाहेर आल्यानंतर त्यांच सुध्दा तेच मत होतं. त्यानी देखील म्हणलय हे अतिशय योग्य आहे. त्याच कारण त्या पाठीमाग कोणाचाही द्वेष नव्हता आणि द्वेष नसलेल्या गोष्टीबद्दल आंदोलन जे असत, तर ते सर्वांनी संयुक्तिकरित्या मानले पाहिजे. अर्थात ती पध्दती कशी आहे त्या पध्दतीवरती पडदा पडला. तो पडदा पडला त्यावर आम्ही देखील सहमत आहोत ना. आम्ही देखील मोठया मनाने आष्टीकर साहेबांनी दोन मिनिटामध्ये सांगितल्यानंतर आम्ही हे प्रकरण हाताळलं. एकनाथ पवारांनी बाहेर सांगितल्यानंतर मी सर्वाना विनंती केली. दत्ताकाकांचे देखील तेच मत होतं. त्यापाठीमागे प्रसिध्दी किंवा काहीतरी आहे असं काही नाही. आज या ठिकाणी सर्व नगरसेवकांना तुम्ही मा. महापौर इंन्डिव्ज्युअली विचारा. सर्व नगरसेवकांना तुम्ही पत्र दया की हया संदर्भात तुम्ही समाधानी आहात की नाही आहात. मग तुम्हाला उत्तर येईल. आता डॉ. रॉय यांना फोन केला, दगडें साहेबाना फोन केला. आमच्या भाडेकरुनी फोन केला. त्यांना म्हणल फोन केला होता का तर दोन मीस्ड कॉल होते. तर त्यांना मी प्रश्न विचारला ते म्हणले दोनच गाडया आहेत. मग त्यांना कोणत्या गोष्टीची कमतरता आहे. प्रशासनाचे काम नाही का. डॉक्टर रॉय काय करताय तुम्ही. खुर्चीसाठी तुम्ही सर्वजण ज्या तन्मयतेने भांडण करताय कोर्टापर्यंत जाताय तुम्ही. पूर्वी पेढा खायला घालायचे भटक्या कुत्र्यांना. त्यावर त्यादृष्टीकोनातून फार मोठे आंदोलन उभे राहिल्यानंतर प्राणी हत्या करु नये म्हणून त्यांना वेळीच उपाययोजना करणेसाठी आचारसंहिता दाखविली. आता त्याची उत्पत्ती किती प्रमाणात होती. किती संख्या वाढतेय मोठया प्रमाणामध्ये. त्याला आळा घालण्यासाठी तुमची काय उपाययोजना आहे. आम्ही जर त्यांना विनंती केली तर एक अधिका-यांना आता त्यांना दोन गाडया आहेत. २२ लाखाच्या शहरामध्ये आता बरचसे मोठे शहर आहे त्यासाठी फक्त दोन गाडया. नगरसेवकांचा फोन उचलला नाही. त्यांच्या भावना त्यांचे समोर नागरीक

बसलेले असतात. आता तापकीर ताईंनी सांगितले की कोणाला तरी कुत्रे चावले त्याच्यामुळे मोठी घटना घडली त्या कुटूंबामध्ये. मग इतकी जर सहज आणि सोपी गोष्ट वाटत असेलतर मला असं वाटत की आज ठीक आहे. सभागृहाचे पावित्र्य, कोणता कायदा. कायदे आम्हालाही समजतात. परंतु हया पाठीमागच्या भावना आमच्या अशा होत्या की यामध्ये कोणाचाही काहीतरी हेतू डोळयासमोर ठेवून असं काही केल्यानंतरच प्रसिध्दी मिळते अशातला काही भाग नाही. म्हणून आयुक्त साहेब, महापौर साहेब, महापौर साहेब तुम्ही खरतर सभेचे अध्यक्ष आहात आमच्या. तुम्ही स्पष्टपणे आदेश दया या सभागृहामध्ये. तुम्ही सभागृहाचे महापौर आहात, शहराचे महापौर आहात. तुम्ही या सभेचे अध्यक्षस्थान भूषवीत आहात. या दृष्टीकोनातून तुमची नैतिक जबाबदारी आहे. हे पुन्हा पुन्हा घडता कामा नये. हे न घडण्यासाठी काहीतरी उपाययोजना करा. हयांना काही तरी करा, त्यांना काही तरी करा असं करुन भागणार नाही. सभागृहामध्ये नगरसेवकांच्या व्यतिरिक्त सुध्दा अनेक समाजकार्य करणा-या संस्था कार्यरत आहेत. म्हणून या सभागृहामध्ये तुमच्याकडून आदेश देण्यात यावेत अशी मी भावना व्यक्त करतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह याठिकाणी भाऊसाहेबांची भूमिका नेहमी कौतुकास्पद असते. नेहमी सभागृहाला अनुसरुन ते बोलतात. परंतु भाऊसाहेब आज तुम्ही बोलतात, तुमच्या प्रत्येक उत्तरांनी आम्हाला निश्चितपणे चांगले वाटते. त्यामुळे आम्ही त्याचा विचारही करतो. परंतु आज जी घटना घडली ती १०० टक्के लाजीरवाणी आहे. तुम्हाला विरोध करायचाय म्हणून नाहीतर विरोधी पक्षाने विरोधी पक्षाच काम केलं पाहिजे सभागृहामध्ये कामकाज चालू असताना परंतु हयाचा अर्थ असा नाही की आपण एखादया मुक्या जनावरांना बॅगेमध्ये बंदीस्त करुन आणावे आणि तीही छोटी पिले, त्यांचे डोळेही अजुन उघडलेले नाहीत. म्हणजे अशा पिलांवर आपण अत्याचार करतोय. म्हणजे आमच्यावर अत्याचार होतोय, अत्याचाराचा बदला अत्याचार. अशा प्रकारची भूमिका याठिकाणी दिसतेय. अनेक वेळा सांगितलंय की आम्ही सुध्दा विरोधी पक्षामध्ये काम केलं. आम्ही सुध्दा अभ्यासपुर्ण विषय मांडलेत. आम्ही सुध्दा अनेक विषयाला खोडा घातला, जे चुकीचे होते ते थांबविले. खोडा घातला म्हणजे जे चुकीचे होते ते आम्ही थांबविले. परंतु अशा प्रकारचे चुकीचे आंदोलन आम्ही कधीच केलं नाही. कारण याठिकाणी सगळयात महत्वाचे अधिका-याने फोन उचलला नाही. बरं झाल साहेब, अगदी चांगली गोष्ट आहे तुम्ही

त्यांचा फोन उचलला नाही असं आम्ही याठिकाणी मुळीच म्हणणार नाही. अधिका-यांनी फोन उचललाच पाहिजे. असणारी कंम्प्लेट त्यांनी सॉलव्ह केली पाहिजे. तुम्हाला नाही पटलं, नाही झाल तुमच कामतर तुम्ही त्यां अधिका-यांना घेराव का घातला हे प्रश्न विचारण्याची आम्हाला गरजही नाही. परंतु तुम्ही आंदोलन करीत असताना एखादया निष्पाप ज्या जनावरांना बोलता येत नाही, त्याची संवेदना मांडता येत नाही, त्याचे विचार आपल्याला कळत नाहीत, त्याची भावना आपल्याला कळत नाही. अशा एका निष्पाप जनावराला आपण असं बांधून आणता हे कितपत योग्य आहे. ही भावना सुध्दा आपण लक्षात घेतली पाहिजे. कुत्री आमच्या काळामध्ये वाढली का, कशी वाढली हयाच्यावरती मी अजिबात भाष्य करणार नाही. पंचवीस वर्षे काय झाले, तुम्ही म्हणता की कायदा निर्माण केला. कायदा निर्माण करण्याची वेळ आली की आपण त्या कुत्र्याला पेढे खायला घालत होतो. आता पेढे घालत नाही तर पिशवीत घालून मारायचं का. फक्त स्वरुप बदललं, स्वरुप बदलून कोणताही प्रश्न सुटत नाही. निश्चितपणे महापौर हे शहराचे महापौर आहेत, आमचे महापौर आहेत असे आम्ही कधीच म्हणणार नाही. शहराचे महापौर म्हणून त्याच्यावरती त्यांचे विचार मांडून त्यांनी सोलुशन शोधले पाहिजे. मग महापौरांना बोलताना ही पध्दत आहे का बोलण्याची. म्हणजे मागच्या वेळेला सभागृहामध्ये आंदोलन झाले. त्यावेळेस सुध्दा म्हणजे प्रत्येक वेळेला काहीतरी स्टंटबाजी करायची. स्टंटबाजी करायला अनेक विषय आहेत. मागच्या वेळेसची स्टंटबाजी परवडली आम्हाला. परंतु ही स्टंटबाजी नाही परवडणार. एखादया निष्पाप प्राण्याला आणायचे आणि त्याच्यावरती अन्याय करायचा. म्हणजे अन्यायाचे उत्तर अन्याय. ही पध्दत जर सभागृहाची असेल तर अशा सभागृहामध्ये जे काही आंदोलन केले त्या आंदोलनाचा तीव्र निषेध याठिकाणी करते. आणि जस आपण याठिकाणी मगाशी चर्चा केली. ते कुत्र आहे, ठीक लक्षात नव्हते आले हे सगळे आम्हाला मान्य आहे. नंतर लगेच म्हणायला हवे होते की चुकून झालेल आहे आपण ती कुत्री लगेच सोडली पाहिजेत. परंतु असं न करता चला करा माझ्यावर कारवाई, मी कारवाईला तयार आहे. मग करायची होती ना कारवाई. साहेब, अशा प्रकारची मनगटशाही, विचार सगळयांनी मांडावेत, चुकीच्या गोष्टी होत असतील तर निश्चितपणे थांबल्या पाहिजेत. विरोधी पक्षनेत्यांचे किंबहुना ते कामच असतं. परंतु यासाठी मनगटशाही जर कोणी वापरत असेलतर ते योग्य नाही ते लहान कुत्री आहेत त्यांच्यावर असा अन्याय करु नका. आपले विषय जे आहेत त्यावर आपण सभागृहामध्ये चर्चा करु चर्चा करुन प्रश्न

सोडवू. परंतु कारवाई झाली तरी चालेल. परंतु माघार घेणार नाही. हे जर वाक्य यांच असेल तर आणि एवढा मुजोरापणा योग्य नाही साहेब. अशा प्रकारे मुक्या जनावरांवर अन्याय करुन जर मी शहाणा आहे किंवा आम्ही करतो ते काम योग्य आहे असे कोणाला वाटत असेल तर त्यांना धडा शिकवावाच लागेल. पेटा कायदा जो आहे त्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल केला पाहीजे. कारण इथून पाठीमागे देखील आंदोलने झाली आहेत. शहरामध्ये आंदोलने झाली पाहिजेत. सगळया गोष्टी मान्य आहेत. परंतु अशा प्रकारे अघोरी कारभार करायचा आणि नंतर चोराला दोषी ठरवायचं हे याठिकाणी सहन केल जाणार नाही अशी महापौर साहेब, आपल्याला विनंती करते आणि पेटा अंतर्गत जी काही कारवाई करता येईल ती कारवाई आपण करावी, धन्यवाद.

**मा. विकास डोळस -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. येताना दिसले की बॅगेमध्ये कुत्र्यांची पिल्ले आणली आहेत. भटक्या कुत्र्यांची समस्या ही शहराची समस्या आहे हे प्रत्येक नगरसेवक मान्य करेल. परंतु आमचे जेष्ठ नगरसेवक भाऊसाहेबांची जी भूमिका असती, पक्षाचा विचार न करता त्यांच्या भूमिकेशी मी १०० टक्के सहमत असतो. भटक्या कुत्र्यांच्या समस्या होत्या तर अधिका-यांना रुममध्ये बंद करायचे होते ना. आज आपण देहू, आळंदी यासारख्या पावन भूमीमध्ये राहतो. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांचा वारसा आपल्याकडे आहे आणि आपण मुक्या जनावरांना बॅगेमध्ये भरुन आणतो हे कितपत योग्य आहे. तळपायाची आग अक्षरशः मस्तकाला गेली, जर एवढा राग आहे तर प्रशासनावरती राग काढा ना. या भटक्या जनांवरावरती राग कशाला काढता. हया घटनेचा मी तीव्र शब्दात निषेध करतो आणि आपले जे ज्येष्ठ नेते आहेत त्यांना हे न शोभणारे वर्तन आहे, जाहीर निषेध. धन्यवाद, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. खर म्हणजे आज जो काही याठिकाणी प्रकार झालेला आहे, गेल्या अनेक वर्षापासून या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कुत्र्यांच्या संदर्भामध्ये नसबंदी करणेत आलेली आहे. आणि एवढया मोठया प्रमाणामध्ये कुत्र्यांच्या ठीक आहे समस्या असणार आहेत. समस्यांसाठी लोकशाहीच्या मार्गाने आम्हीही मागच्या काळामध्ये आंदोलने केले. आणि आंदोलन करीत असताना आज आपण म्हणतो एखादया मुक्या प्राण्याने, कुत्र्याने आपल्याला चावले तर आपण त्याला मारुन टाकत नाहीत. त्याच्यावर आपण कुठेतरी त्याला आपण बंदीस्त करतो आणि तेही आज याठिकाणी आम्ही जे की चित्र बघितले.

एक छोटं पिलू, लहान पिलू आपण त्याच्या पायावरुन गाडी गेली किंवा मोटरसायकल गेली तर लगेच थांबून त्याला पाणी पाजतो.  आणि अमानुषपणे असे कृत्य त्या छोटया पिलांवर होत असेल तर मला असं वाटते की अतिशय दुर्दैवी प्रकार आहे. आणि तो सुध्दा मुक्या प्राण्यांवरती. आज जगामध्ये आणि देशामध्ये मुक्या प्राण्यांच्या बाबत एक वेगळे काम केलं जातयं. मुक्या प्राण्यांसाठी चांगल्या प्रकारची ट्रीटमेंट दिली जातेय. त्यांच्यासाठी खर्च केला जातोय. विविध राज्यामध्ये मुक्या प्राण्यांसाठी मोठया प्रमाणामध्ये बजेट केले जातेय. आणि अशा पध्दतीचे काम चालू असताना एखादया मुक्या प्राण्यावरती अन्याय करुन त्याला पिशवीमध्ये टाकून एखादया पिलाला डांबून आणून त्याचा मृत्यू याठिकाणी होतो की काय अशी शंका याठिकाणी आमच्या सारख्या कार्यकर्त्याला याठिकाणी आली. आणि हा जो काही प्रकार याठिकाणी राष्ट्रवादीच्या माध्यमातून केला. खर म्हणजे दुर्देवी प्रकार आहे. लोकशाहीच्या मार्गाने आम्हीही आंदोलने केली या शहरामधील समस्यांसाठी. मगाशी डोळस यांनी सांगितले की अधिका-यांना पकडा. अधिका-यांना सुध्दा या माध्यमातून आम्ही सांगतो की अनेक वर्षापासून तुम्हाला एजन्सी दिल्या. एजन्सी दिल्यानंतर सुध्दा अनेक प्रकारची कुत्रे मोठया प्रमाणात फिरत असतील तर येणा-या काळामध्ये लवकरात लवकर त्या कुत्र्यांचा विचार करायला पाहिजे. नागरीकांना त्याचा त्रास होतोय हे आम्हाला सगळ माहिती आहे. परंतु अशा पध्दतीने आंदोलने करणे आणि कुठल्याही एक अर्थाने स्टंटबाजी करण्याचा प्रकार आणि तो ही एका मुक्या प्राण्याला घेऊन याठिकाणी केलेला आहे. या प्रकाराचा मी तीव्र शब्दामध्ये निषेध करतो. महापौर साहेब अशा येणा-या काळामध्ये जर का या सभागृहाचा अवमान आपण या माध्यमातून करीत असणार हे सभागृह चालविताना पावित्र्य ठेवण्याचे काम आपल्या माध्यमातून नाही झाले तर मला वाटते की येणा-या काळामध्ये आपण बघतो सभागृह कसं चालवावयाच सभागृहामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील समस्यांच्या संदर्भामध्ये, विकासाची कामे चर्चेच्या माध्यमातून सोडविली गेली पाहिजेत. किंवा अधिका-यांना पत्रव्यवहाराच्या माध्यमातून सोडविल्या गेल्या पाहिजेत. अधिका-यांना जाब विचारला पाहिजे. हे सभागृह त्याच्यासाठी आहे. परंतु मुक्या प्राण्यांवरती अन्याय करुन एक असं छोटयाशा पिलांना याठिकाणी आणायचं. आणि त्याच्या माध्यमातून याठिकाणी स्टंटबाजी करायची. मला वाटतं की हे कृत्य अतिशय निंदनीय आहे. याचा मी तीव्र शब्दामध्ये याठिकाणी निषेध करतो.

**मा.उषा मुंढे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. कमिशनर साहेब आता कुत्र्यांचा हा विषय नवीन नाही. ज्यावेळेस आम्ही नगरसेवक नव्हतो, नागरीक होतो, त्यावेळेस पण हाच प्रकार होता. जो आता काही प्रकार घडला छोटया छोटया कुत्र्यांच्या पिलांचा साहेब, आपल्या एखादया लहान मुलाला जर लागले तर आपण त्याच्यासाठी  कळवळीने काही तरी उपाय करतो. आणि हया छोटयाशा कुत्र्यांचे पिलांचे आपल्याला कसं काही वाटल नाही आणताना. कारण आणायचीच होती तर मोठी कुत्री आणायची होती. तुम्हालाही चावली असती आम्हालाही चावली असती, अधिका-यांना ही चावली असती. छोटी कुत्री आहेत ती कशासाठी आणायची. आम्ही एक महिला आहोत. आम्हाला ही छोटी छोटी मुलं आहेत. आम्ही काही वांझोटया नाहीत पण कुत्र्याच्या लहान पिलांच्या बाबतीत जी परिस्थिती घडली तीच परिस्थिती छोटया मुलांच्या बाबतीत घडली तर काय अवस्था होईल. हे महिलांना जास्त अनुभव आहे आणि साहेब असं करायचे होतं तर त्या कुत्र्याच्या निष्पाप जिवाने काय केलयं. आणा ना मोठी कुत्री आणि सोडा. कुणाला चावतात ते तर बघू ना. साहेब, अधिकारी आपले काम ऐकत नाहीत, अधिकारी आपले फोन उचलत नाहीत. तर ही अधिका-यांची चुकी आहे ना. कोंडायचा होता ना एखादा अधिकारी. आणि सोडायची होती कुत्री मग नसती चावली तर मग तुम्ही छोटया निष्पाप पिलांवर जी शिक्षा अधिका-यांना दयायची होती ती तुम्ही पिलांना नको होती दयायला. आणायची होती तर मोठी कुत्री आणा आणि सोडून दया. आणि जनावरे पण आणा. बघूया काय होतंय ते. अधिका-यांची ही चुकी असताना छोटया पिलांना असं करायला नको होतं.

**मा. विनया तापकीर -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. खरतर  आजचे जे आंदोलन झाले एकीकडे आपल्या शहराची स्मार्ट सिटीकडे वाटचाल चालू आहे. आणि दुसरीकडे कुत्र्यांचे शहर म्हणून आपल्या पिंपरी चिंचवडला नावलौकीक झालेला आहे. म्हणजे कुत्र्यांचे शहर म्हणून प्रसिध्द होते की काय असं मला वाटतयं. कारण प्रशासनाचा अत्यंत ढिसाळ कारभार चालू आहे. एक महिन्यापूर्वी मी डॉ. दगडेंना फोन केला. आमच्या इथ एक पिसाळलेले कुत्रे आहे ते गायकवाड कुटूंबियांच्या दारामध्ये बसले आहे. आणि जे गायकवाड आहेत ते दवाखान्यामध्ये ॲडमीट आहेत. त्यांच्या घराच्या दारात ते पिसाळलेले कुत्रे बसले होते. ते त्यांच्या मुलीला चावले हे सांगून सुध्दा त्या माणसाने काहीच कारवाई केली नाही. ही अत्यंत शोकांतिका आहे आयुक्त साहेब. म्हणजे लोकांना कुत्री तुम्ही चावून दयायची का. मग

तुम्ही उपाययोजना करणार का तरी सुध्दा त्यांचे डोळे उघडले नाहीत. चार दिवस मी फोन करीत होते. शेवटी ते कुत्र त्यांच्या दारामध्येच मेले. अक्षरश: बाहेर देखील पडण्यास त्यांना मुभा मिळाली नाही. डॉ. दगडेंचा फोन नंतर स्वीच ऑफ. म्हणजे चार दिवस मी सलग फोन करत होते नंतरतर तो फोन स्वीच ऑफ. शेवटी ते कुत्र मेलं नंतर त्या कुटूंबियांनी दवाखान्यामध्ये जाऊन इंजेक्शन घेतले आणि इकडे आपण गुणगान गातो, आणि काय तर आंदोलन नाही करायचं. मग आमच्या प्रश्नांना वाचा कुठून फुटणार. आंदोलन केल्याशिवाय आमच्या प्रश्नांना वाचा फुटणार आहे का. मग हे चुकीचे आहे ना. तुम्ही पिसाळलेली कुत्री आमच्या वॉर्डामध्ये आणून सोडता. शहरातील सगळी पिसाळलेली कुत्री जी आहेत. ती कुणालाही विचारा प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये कुत्री पकडतात आणि थोडं पुढे गेले की सोडून देतात. बर गाडयांचा प्रॉब्लेम आहे ना हा. आमचा प्रॉब्लेम नाही ना. आयुक्त साहेबांना तुम्ही विचारा. प्रशासनाचा प्रॉब्लेम आहे. गाडया वाढवून घ्या. त्या कुटूंबियांना मी उदया इथं आणून हजर करते. चार दिवस झाले तरी गाडी पाठविली नाही. नंतर ते कुत्रं मेल, दुस-या ठिकाणी पण हाच प्रॉब्लेम झालेला आहे. आता उदया इथं आम्ही मोठी मोठी कुत्री आणून सोडतो इथं सभागृहामध्ये. त्या शिवाय आमच्या प्रश्नांना वाचा फुटणार नाही ना. छोटया कुत्र्यांना न आणता मोठया कुत्र्यांना आणून सोडू. प्रशासनाचा मी निषेध करते आणि हया भाजपा सरकारचा पण.

**मा.निता पाडाळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. आयुक्त साहेब आता जे आंदोलन झाले. कुत्र्यांच्या छोटया पिलांना जे सभागृहामध्ये आणले. ते साहेब चुकीचे होते. असं एखादया लहान मुलाला त्याच्या आईपासून तोडल्यासारखे होते. परंतु आयुक्त साहेब कुत्र्यांच्या बरोबरच मला इथं प्रश्न मांडायचा आहे तो म्हणजे डुकरांचा. डुकरांचा प्रश्न आयुक्त साहेब माझ्या वॉर्डामध्ये एवढया मोठया प्रमाणात निर्माण झाला आहे. आयुक्त साहेब आज माझ्या वॉर्डामध्ये चार लोकं स्वाईन फ्ल्यूने गेलेले आहेत. थोडी नाहीत चार लोक माझ्या वॉर्डात स्वाईनफ्ल्यूने गेलेली आहेत. अजुनही आठ-दहा जणांना स्वाईनफ्ल्यू झालेला आहे. काही बिर्लामध्ये आहेत तर काही निरामयमध्ये आहेत. आयुक्तसाहेब डुकरे जी आहेत ती वॉर्डामध्ये दलदल करतात. आणि माझ्या वॉर्डामध्ये एवढा प्रॉब्लेम आहे. लोकांच्या घरामध्ये सुध्दा डुकरे जातात. मी दगडेसाहेबांना फोन केला की साहेब काहीतरी उपाययोजना करा. स्वाईन फ्ल्यूचा एवढा विषय पण लोकांच्या जीवाशी खेळण्याचा विषय इथ चालला आहे. चार पेशंट

गेले आहेत प्रशासनाला खुलासा तरी करायला सांगा. स्वाईन फ्ल्यूवर त्यांनी काय उपाययोजना केल्या आहेत. पक्षनेते तुम्ही पण आता बोला. कारण अक्षरश: साहेब एकदम तरुण-तरुण एक तर ३८ वर्षाचा, एक ४२ वर्षाची लेडीज, आणि कदाचित मला वाटत की ४८ वर्षाचा जेन्टस् असेल. अशी लोक जर स्वाईन फल्यूने मरायला लागली तर आयुक्तसाहेब करायच काय. हे जे डुकर आणून तिथे सोडतात आपले अधिकारी त्या डुकराच्या एजन्सीकडून पैसे घेतात, हप्ते गेलेले असतात. ती डुकरे उचलायला जात नाहीत. प्रायव्हेट माणूस तिथे डुकरे आणून सोडतो. ती डुकरे मोठी झाल्यानंतर परत नेऊन त्यांचे काय करतात हे सभागृहाला सांगण्याची गरज नाही. मग हे जर स्वत: प्रायव्हेट धंदे करणार असतील त्यांची स्वत:ची पाळीव डुकरे असतील. त्याचा एवढा जर लोकांना त्रास होत असेल. आणि आपले अधिकारी काही नाही. फक्त जातात एखादं डुकर घ्यायच त्यांच्या सहमतीने आणायचं आणि हप्ता घ्यायचा आणि येथे येवून परत बसायचं. त्याला काही अर्थ आहे का आयुक्त साहेब. आयुक्त साहेब डॉ.रॉय सरांनी किंवा जो कोणी स्वाईन फल्यूवरती काम करीत असतील त्यांना आताच खुलासा करायला सांगा. आणि आयुक्त साहेब स्वाईन फ्ल्यूची लस ही पालिकेच्या प्रत्येक रुग्णालयामध्ये तुम्ही मोफत दया. कारण लोकांना ती लस घेणे परवडत नाही. लोकांच्या मध्ये जागृती झाली पाहिजे. साहेब आम्ही आता वॉर्डामध्ये फिरतोय ना आमचा सगळया नगरसेवकांची हीच भाषणे असतात. प्रत्येक माणूस घाबरला आहे. स्वाईन फ्ल्यूची काळजी कशी घ्यायची. अक्षरश: आम्हाला असं वाटतय की आम्ही प्रशासनाचे काम करायला लागतोय. स्वाईन फ्ल्यूची काळजी कशी घ्यायची. काय आपण स्वच्छता ठेवली पाहिजे. आयुक्त साहेब आरोग्याचा प्रश्न खूप मोठा भयंकर आहे. आपल्या आरोग्यामुळे पुर्णपणे माझ्या वॉर्डामध्ये, आणखी कोणाच्या वॉर्डामध्ये आता सुजाताताईनी पण सांगितले की त्यांच्या वॉर्डामध्ये सुध्दा आठ पेशंट स्वाईन फल्यूने गेलेले आहेत. तरी आयुक्त साहेब आपण प्लीज काहीतरी उपाययोजना याच्यावर करा. आणि रॉय सरांना खुलासा करायला सांगा.

**मा.संदीप वाघेरे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. मगाशी दत्ता सानेंनी कुत्र्यांची पिल्ले आणली आहेत. मागच्या आठवडयामध्ये सचीन भोसलेने डुकराचे पिल्लू आणले होते. मागे एकदा खासदार श्रीरंगआप्पा बारणे यांनी डुकराचे पिल्लू आणले होते. चांगली गोष्ट आहे. खरतर पिंपरी चिंचवड शहर म्हणजे प्राणी संग्रहालय झाल्यासारखी परिस्थिती आहे. मोकळया गाया आहेत, कुत्री आहेत, डुकरे

आहेत. स्वाईन फ्ल्यू आज २० ते २१ हजार संशयित पेशंट आहेत. माझ्या पिंपरीतले तीन पेशंट दगावले आहेत. वायसीएमएचमध्ये आता पर्यंत २० पेशंट स्वाईन फ्ल्यूने दगावले आहेत. आयुक्त साहेब ब प्रभागामध्ये मिटींग झाली होती त्याचवेळेस मी तुम्हाला सांगितले होते की चिखलीमध्ये पाच एकर जागा आहे. त्यामध्ये कंपाऊड वॉल व्यवस्थित करुन व बाकीच्या गोष्टी करुन मोकळया गाया ज्या फिरतात त्या आपण जर तिथे ठेवल्या, त्यांची गोशाळा तिथे जर करावी. दुसरी गोष्ट म्हणजे तुमचे प्रशासन सांगत होते की नगरसेवक सांगतात की डुकरे पकडायला. पण मी सांगतो की, मी स्वत: तिथे डुकरे पकडायला गेलो होतो. १० ते १२ डुकरे आम्ही **ॲट ए** टाईम पकडली. आम्ही १०-१२ जण होतो पकडायला. डुकरे पण १०-१२ होती. पण त्या डुकरानीं गाडीसकट आम्हांला ओढत नेलं. आणि १०-१२ डुकरांमधले एक डुकरं आम्हाला सापडलं. आणि तो मालक तिथे आला आणि त्याला सांगितल. तो म्हणाला तासाभरामध्ये मी ही सगळी डुकरे हलवितो. आणि त्याने दोन ते तीन तासामध्ये पन्नास-साठ डुकरे पकडून नेली. त्याने पुढे कुठे किंवा कशी सोडली असतील. आणि हया डुकरांची किंमत म्हणजे ते मटन म्हणून मार्केटमध्ये विकले जाते. ८ ते १० हजार एका डुकराची किंमत आहे. आणि हीच लोक त्यांच्या टेम्पोमधून त्यांचे खादय आणून टाकतात. आणि ते वॉच करीत असतात की आपली डुकर इथ आहेत म्हणून आणि ते आपल्यालाही कळत नाही. आता तुमच्या प्रशासनाचे डॉक्टर रॉय यांना मी वारंवार सांगितले की आमच्या इथं गाया आहेत, कुत्री आहेत, डुकरे आहेत. प्राणी संग्रहालय झालंय आमचं पिंपरी चिंचवड. म्हणजे पिंपरी तर १०० टक्के झालेले आहे. तर डॉ. रॉय, डॉ. साळवी हयांना आपण एक चांगला पुरस्कार दिला पाहिजे पिंपरी चिंचवडमधून. यांनाच यावेळेस पुरस्कार दया साहेब. यांच्यामुळे स्वाईन फ्ल्यूमुळे लोकं मेलेली आहेत, संशयित लोक आहेत. बाकीच्या गोष्टी झालेल्या आहेत. हयाच्यावर आपण कधी तोडगा काढणार आहोत. कारण आपण याच्यावर नुसती चर्चा करतो. आयुक्त साहेब तुम्ही वारंवार आदेश देऊन मोकळे झालेले आहात. तुम्ही आदेश दिला त्याच्यानंतर त्यांनी गाडी आणली. बाकी गोष्टी केल्या मी म्हणलं की स्वत: जाऊन पकडतो. आणि गेलो पण होतो तिथे पकडायला. आयुक्त साहेब तुम्ही आदेश देता परंतु तुमच्या आदेशाचे पालन खालचे अधिकारी करतात की नाही. आणि त्यांच्यावर खरोखर तुम्ही कारवाई करा. आणि आता ते डॉ. गोरेंच्या जागी डॉ. दगडे आलेत. खरोखरच दगड आहे तो माणूस. त्याला किती जरी सांगितले तरी तो करतो, बघतो. सांगतो.

आता मी त्याला त्या दिवशी म्हटलं की बाबा या डुकरांवरती कारवाई कर. तो म्हणला की आता गणपती होऊ दया, गणपतीनंतर चालू करतो. डुकरे जी झालीत त्याच्यामुळे लोकांना स्वाईन फ्ल्यू होतोय. ठिक आहे वातावरणाचा इफेक्ट झालायं. जास्त थंड वातावरण असेल तर स्वाईन फ्ल्यूचे जिवाणू वाढतात. त्याच्यावर आपण जागृती केली पाहिजे. आपण वायसीएमएचमध्ये स्वतंत्र गेल्या वर्षीपर्यंत स्वाईन फ्ल्यूसाठी आयसीयू केला होता. आता हया वेळेला काही नाही केला आपण. म्हणजे लोकांच्या आयुष्याशी खेळतोय साहेब. हे कुठेतरी थांबले पाहिजे साहेब एवढे बोलून थांबतो. जयहिंद जय, महाराष्ट्र.

**मा. राहुल कलाटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. महापौर साहेब एक चांगला विषय दत्ता काकांमुळे चर्चेलातर आला आहे. शहरातली जर का आपण अवस्था पाहिली कुठेही शहरामध्ये आपण जा कुत्री आहेत, डुकरे आहेत. सचीन भोसले नगरसेवक यांनी डुक्कर आणलं होतं. मला वाटत रॉय साहेबांच्या टेबलवरचं ठेवलं होतं. पण असं म्हटल जातं की काही काही प्राण्यांच्यामध्ये मेंदू नसतो पण याची चौकशी करा ना  साहेब आपण. नक्की काय चाललं आहे आपल्या शहरामध्ये. आपले अधिकारी काय करतात. ही वेळ का येतेय. ठीक आहे स्टंटबाजी असेल, छोटी छोटी कुत्री असतील परंतु त्यामागची भावना पण तुम्ही समजून घ्या. करा ना गुन्हे दाखल. त्यांची ती मानसिकता आहे. पण त्याच्याबरोबर उंदरे आता काय किमंतीला घेतली होती, नाग चोरीला गेला होता. स्वाईन फ्ल्यूने शहरातील नागरीकांचे बळी गेले आहेत. सत्ताधा-यांवरतीही गुन्हे दाखल करा आणि चुकल ना, चुकू दया ना. म्हणजे एक पक्ष चुकतो आणि दुसरा चुकत नाही ही शहरातील नागरीकांच्या रोजच्या दैनंदिन आरोग्याशी निगडीत हा विषय आहे. तेव्हा तुम्ही त्या प्रमाणामध्ये सिरीएसली घ्या. गुन्हा दाखल करुन प्रश्न सुटणार आहे का. नाही तर काय होईल उदया ते मोठे कुत्रे आणून सोडतील. इंजेक्शन घ्यावे लागेल. नाहीतर मोठे कुत्रे आणून दगडेवर सोडावे लागतील. शेवटी काय, दगडेंना चावू शकणार नाहीत ते, आडनावांप्रमाणे त्यांचेच दात दुखतील. ही परिस्थिती आहे या शहराची. शहरातील आरोग्य विषयाची जर आपण माहिती घेतलीतर किती रुग्ण गेले मागच्या काही महिन्यात स्वाईन फ्ल्यूनी. त्यांचेवरही गुन्हे दाखल कराना. समजा काकांनी स्टंटबाजी केली, कुणासाठी केली. शहरातील नागरीकांचाच प्रश्न सोडविण्यासाठी ना. लहान कुत्री आणली ना. ठीक आहे त्यांचे चुकलं.  पुढच्या वेळेला मोठी कुत्री घेऊन या काका. आयुक्त साहेब हा विषय

अत्यंत गंभीर आहे. या विषयाची फक्त चर्चा करुन सोडून देता येणार नाही. मगाशी पाडाळेताईंनी पण सांगितले. काळेवाडीमध्ये जा ना तुम्ही गल्लीबोळामध्ये पाहा काय अवस्था होती ते. होतयं काय इकडे मेन रोडला फिरताय तुम्ही. आत गल्लीबोळामध्ये घुसा आणि त्या ठिकाणी फिरणारी डुकरे, त्याठिकाणी फिरणारी कुत्री. संध्याकाळी काय होतं आयटीवरुन घरी जाणारा माणूस सुध्दा घाबरतो. चालण्यापासून कुत्री अंगावर येतात. टू व्हिलरवर तर तुम्ही जाऊच शकत नाही. आमच्या भागातील लोक एवढी त्रस्त आहेत. आता कुत्री पकडायला आल्यानंतर ती पळून जातात. तुमच्या अधिका-याच याच्यावर उत्तर काय येत की जेव्हा आम्ही पकडायला जातो तोपर्यंत ते निघून जातात. याच्यावर काहीतरी उपाययोजना करा, मॅन पॉवर वाढवा, गाडया वाढवा परंतु अशा प्रकारे शहरात सत्ताधारी म्हणून आपण सत्तेत असताना उगच कोणावर तरी गुन्हे दाखल करा, हे करा ते करा. याच्यापेक्षा  महापौर तुम्ही बॅलेन्स भूमिका घ्या आणि आतापर्यंत जे घडलय. स्वाईन फ्ल्यू असेल, उंदीर असेल, नाग चोरीला गेला असेल, त्यांच्यावर गुन्हे दाखल करा आणि हया शहरातील नागरीकांना वेठीस धरु नका. आणि त्यांना तुमच्यावर गुन्हे दाखल करण्यास काहीच इंट्रेस्ट नाही. त्यांना इंट्रेस्ट आहे स्वच्छता  झाली पाहिजे. काम झाले पाहिजे. कुठेतरी नागरीकांचा विचार करायला पाहीजे. आयुक्तांकडून अशा प्रकारचे आदेश दया. कुत्रे आणि डुकरे आणायची वेळ नाही आली पाहिजे, धन्यवाद.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. खरतर मी एकनाथ पवार यांचे आभार मानतो. की आपण सांगितल्यामुळे भाऊसाहेबांना विनंती केल्यामुळे आमचे ज्येष्ठ सदस्य आहेत त्यांची विनंती आम्ही मान्य केल्यामुळे सभागृहाच्या आतमध्ये ते प्राणी आणू शकलो नाहीत आणि त्यामध्ये आष्टीकर साहेबांनी आम्हाला विनंती केली ठीक आहे. काका इथून पुढे आपण विषय बदलू. महापौरांनी पण मला विनंती केली. त्यांचे ऐकल्यानंतर सभागृहामध्ये ही प्रतिक्रिया उमटणे म्हणजे मला वाटतयं प्राण्यापेक्षा.... आता मी बोलतोय ताई तुम्ही मध्ये बोलायचे नाही. काय संबंध आहे तुमचा. तुम्ही बोलत होता त्यावेळेला मी मध्ये बोललो का. आता तुम्ही मध्ये बोलायचे नाही. तुम्हाला महापौरांनी बोलण्याची संधी दिली होती. तुमचा आता बोलण्याचा काही संबंध नाही.

**मा. सिमा सावळे -** मी बोलणार. पिल्ले पिशवीत भरुन आणता. मी बोलणार.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. महापौर -** दत्ताकाका तुम्ही बोला. दत्ताकाका तुम्हाला बोलायला सांगितले आहे तुम्ही बोला. ताई तुम्ही थांबा. तुम्हाला नंतर बोलण्याची संधी देतो.  ताई तुम्ही नंतर बोला.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. दत्तात्रय साने -** मी तुमचे नांव घेतलेले नाही. मी तुमचे नाव घेतलेले नाही. मी बीन आईचा आहे का. मी बीन आईचा आहे का. मी बीन आईचा आहे का आम्हाला पोरं नाहीत का. मी महापौरांचे आभार मानले ना.

**मा. महापौर -** दत्ताकाका तुम्ही बोला. दत्ताकाका तुम्हाला बोलायला सांगितले आहे तुम्ही बोला.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब मी तुम्हांला विनंती करतो सभागृहाच पावित्र्य राखा. मी तुमचे आभार यासाठी मानले होते. कुत्रे, मांजर किंवा काय. आपण पीवर शेतकारी आहेत. (वगळले)

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. महापौर -** काका तुम्ही खाली बसा. काका तुम्ही खाली बसा, काका तुम्ही खाली बसा, सगळा खुलासा करु तुम्ही शांत बसा.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह खरतर ज्या पध्दतीने या विषयाची चर्चा सभागृहामध्ये झाली. खरतर हा विषय राष्ट्रवादी कॉग्रेसच्या वतीने दत्ताकाका तुम्ही ज्या पध्दतीने विषय हाच असं मी म्हणत नाही परंतु कधी कधी मला अस वाटतं की सत्ता गेल्याच्या नंतर एखादी पार्टी किती व्यथीत व्हावी. एक मिनिटे ऐका. प्रत्येक विषयामध्ये आपण राजकारण करुन अशा पध्दतीची परिस्थिती निर्माण करता. ज्या पध्दतीने मी गेल्या अनेक दिवसापासून बघतोय.....

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, तेलंगणामध्ये जगतियाल जिल्हयात राज्य परिवहन महामंडळाची बस दरीत कोसळून ५२ प्रवाशांचे निधन तसेच गणपतराव आंदळकर- हिंदकेसरी पैलवान,  तुकाराम शिवराम डांगे - चिंचवडगांव, रामदास विष्णू भोईर –चिंचवडगांव, सुरेश धोंडिबा गावडे –चिंचवडगांव, सुमन गुला

सुतार – चिंचवडगांव, वाल्मिक काकडे –मोरवाडी, एरिक जॉन - मोरवाडी, मैनाबाई दशरथ गुळवे –भोसरी, तुकाराम गोविंद नाणेकर – पिंपरीगाव, रामदास कलापुरे – पिंपरीगाव, गौरव देशमुख -पिंपरीगाव यांचे निधन झालेले असल्याने त्यांना या सभेत श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, सुचनेस मी अनुमोदन देतो.

**मा. महापौर -** सर्वांनी श्रध्दांजलीसा वाहण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

[ सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली. ]

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा.बापू उर्फ शत्रुघ् काटे –** मा.महापौर साहेब, ही सभा आज दि.१९/०९/२०१८ दु. ३.०५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा. महापौर -** ही सभा आज दि.१९/०९/२०१८ दु. ३.०५ पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

------

**(राहुल गुलाब जाधव)**

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २२</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**(दि.१९.९.२०१८ (दु.२.०० वा.)ची तहकूब सभा)**

**<u>दिनांक – १९.९.२०१८</u>** **<u>वेळ – दुपारी ३.०५ वाजता</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१९.९.२०१८ (दु.२.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा बुधवार दि. १९.९.२०१८ रोजी दुपारी ३.०५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव **महापौर**

२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव **उपमहापौर**

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.साधना अंकुश मळेकर

५) मा.दत्तात्रय बाबूराव साने

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा. नितीन (आप्पा) प्रताव काळजे

९) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१०) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

११) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१३) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.गोफणे अनुराधा देविदास

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.अजित दामोदर गव्हाणे

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे सारिका संतोष

२१) मा. लांडगे रवि लक्ष्मण

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२६) मा.सावळे सिमा रविंद्र

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा. लांडे विक्रांत विलास

२९) मा.गीता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.केशव हनुमंत घोळवे

३५) मा.मंगला अशोक कदम

३६) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३७) मा.अश्विनी भिमा बोबडे

३८) मा. योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३९) मा.संजय बबन नेवाळे

४०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४१) मा.भालेकर प्रविण महादेव

४२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४५) मा.घोलप कमल अनिल

४६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.जावेद रमजान शेख

४९) मा.यादव मीनल विशाल

५०) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५१) मा. प्रमोद कुटे

५२) मा.राजू मिसाळ

५३) मा. शैलजा अविनाश मोरे

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.ढाके नामदेव जनार्दन

६०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६१) मा.करुणा शेखर चिंचवडे

६२) मा.भोईर सुरेश शिवाजी

६३) मा.अपर्णा निलेश डोके

६४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६७) मा.जयश्री वसंत गावडे

६८) मा. कोमल दिपक मेवाणी

६९) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७०) मा.सुलक्षणा राजू धर

७१) मा.शाम गणपतराव लांडे

७२) मा.सुजाता सुनिल पालांडे

७३) मा.योगेश मंगलसेन बहल

७४) मा.कदम निकीता अर्जुन

७५) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७८) मा.नढे विनोद जयवंत

७९) मा. पाडाळे निता विलास

८०) मा. कोकणे संतोष अंकुश

८२) मा.पवार मनिषा प्रमोद

८३) मा.बारणे अर्चना तानाजी

८४) मा. अभिषेक गोविंद बारणे

८५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८६) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

८७) मा.बारणे माया संतोष

८९) मा.निलेश हिरामण बारणे

९०) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९१) मा.दर्शले रेखा राजेश

९२) मा.कलाटे राहुल तानाजी

९३) मा. कलाटे मयूर पांडुरंग

९४) मा.ममता विनायक गायकवाड

९५) मा.कामठे तुषार गजानन

९६) मा. चोंधे आरती सुरेश

९७) मा.कस्पटे संदिप अरुण

९८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१००) मा. चंद्रकांत बारकु नखाते

१०१) मा. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२) मा.कुटे निर्मला संजय

१०३) मा. शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०४) मा. विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०५) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०६) मा.मुंढे उषा अंकुश

१०७) मा.कदम शशिकांत गणपत

१०८) मा.लोखंडे चंदा राजू

१०९) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१११) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११६) मा. संतोष बबन कांबळे

११७) मा. उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११८) मा. हर्षल मच्छिंद्र ढोरे

११९) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२२) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.कोळंबे-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.तूपे, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डॉ.साळवे- वैद्य.संचालक, मा.झगडे, मा.खोत, मा.दुर्गूडे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.लडकत, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.पाटील, मा.पवार, मा.सुपेकर -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा. एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह खरतर ज्यापध्दतीने सभागृहामध्ये कामकाज व्हायला पाहिजे होते. मला असं वाटते की

एकमेकांची उणीधुणी काढण्यापेक्षा या शहरातील प्रश्नांना आपण सगळयांनी वाचा फोडण्याची खरतर गरज आहे. मा. महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे ही सभा दिनांक २७/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. बापु ऊर्फ शत्रुघ्न काटे –** मा.महापौर साहेब, सुचनेला मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - ९६ कुळी हा शब्द सभाकामकाजातून वगळून ही सभा गुरुवार दि. २७/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(मा.महापौर यांच्या निर्देशानुसार ९६ कुळी हा शब्द सभाकामकाजातून वगळणेत आला)

-----

**( राहुल गुलाब जाधव )**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २२</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**(दि.१९.९.२०१८ (दु.२.०० व ३.०५) वा.ची तहकूब सभा)**

**<u>दिनांक – २७.९.२०१८</u>** **<u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१९.९.२०१८ (दु.३.०५) ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२७.९.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| **१)** | मा.राहुल गुलाब जाधव | **महापौर** |
| **२)** | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | **उपमहापौर** |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा. नितीन ( आप्पा ) प्रताप काळजे | |
| ९) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १०) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |

११) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१३) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६) मा.सावळे सिमा रविंद्र

२७) मा.लोंढे नम्रता योगेश

२८) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२९) मा.लांडे विक्रांत विलास

३०) मा.गीता सुशिल मंचरकर

३१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.केशव हनुमंत घोळवे

३५) मा.मंगला अशोक कदम

३६) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३७) मा.अश्विनी भिमा बोबडे

३८) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३९) मा.संजय बबन नेवाळे

४०) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४१) मा.भालेकर प्रविण महादेव

४२) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४३) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४५) मा.घोलप कमल अनिल

४६) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.जावेद रमजान शेख

४९) मा.यादव मीनल विशाल

५०) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५१) मा.प्रमोद कुटे

५२) मा.राजू मिसाळ

५३) मा. शैलजा अविनाश मोरे

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.ढाके नामदेव जनार्दन

५९) मा.करुणा शेखर चिंचवडे

६०) मा.भोईर सुरेश शिवाजी

६१) मा.अपर्णा निलेश डोके

६२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६४) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६५) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६६) मा.सुलक्षणा राजू धर

६७) मा.शाम गणपतराव लांडे

६८) मा.सुजाता सुनिल पालांडे

६९) मा.कदम निकीता अर्जुन

७०) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७१) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७२) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७३) मा.नढे विनोद जयवंत

७४) मा.पाडाळे निता विलास

७५) मा.काळे उषा दिलीप

७६) मा.कोकणे संतोष अंकुश

७७) मा.पवार मनिषा प्रमोद

७८) मा.बारणे अर्चना तानाजी

७९) मा.अभिषेक गोविंद बारणे

८०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८१) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

८२) मा.निलेश हिरामण बारणे

८३) मा.दर्शले रेखा राजेश

८४) मा.कलाटे राहुल तानाजी

८५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८६) मा.ममता विनायक गायकवाड

८७) मा.कामठे तुषार गजानन

८८) मा.चोंधे आरती सुरेश

८९) मा.कस्पटे संदिप अरुण

९०) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९१) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९२) मा.सुनिता हेमंत तापकीर

९३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९५) मा.कुटे निर्मला संजय

९६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९८) मा.आंगोळकर सागर सुनिल

९९) मा.मुंढे उषा अंकुश

१००) मा.कदम शशिकांत गणपत

१०१) मा.लोखंडे चंदा राजू

१०२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०७) मा.संतोष बबन कांबळे

१०८) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०९) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१११) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११२) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११३) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.आष्टीकर – प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त(२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण– शहर अभियंता, मा.डॉ.रॉय–आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा. कोळंबे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा. तुपे, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.दुरगूडे, मा.चितळे, मा.खोराटे, मा.इंदलकर,मा.झगडे -सहा.आयुक्त, मा.लोणकर, मा.राऊत,मा खोत – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण–मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.गायकवाड, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा. सिमा सावळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह मा. महापौर साहेब एच.ए. ग्राऊंडवर एका सात वर्षाच्या बालीकेवर आत्याचार करुन मृतदेह टाकण्यात आला तसेच कासारसाई येथे दोन मुलीवर अत्याचार करण्यात आला त्यापैकी एका मुलीचा मृत्यू झाला असल्याने मृत व्यक्तींस श्रध्दांजली अर्पण करणेत यावी तसेच अजुन काही घटना याठिकाणी झाल्या आहेत. आयटीमध्ये जाणारी मुलगी आहे तिची तक्रार घेतली नाही. या सर्व विषयांच्या पार्श्वभूमीवर आजची सभा अर्ध्या तासासाठी तहकूब करावी अशी सूचना मी करते.

**मा.आशा शेंडगे-धायगुडे –** मा.महापौर साहेब, सुचनेला अनुमोदन देते.

**मा.महापौर-** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा. मंगला कदम -** मा. महापौर साहेब, चर्चा तरी करा ना या विषयावरती पोलीस यंत्रणा का काम करीत नाही. चर्चा तरी व्हायला पाहिजे आयुक्तालय आपल्या इथं झाले आहे. त्यानुसार चर्चा करा. अर्धातास नंतर तहकूब करा.

**मा. महापौर –** मंगलाताई तुम्हाला बोलायचं आहे का. ठीक आहे बोला तुम्ही.

**मा. मंगला कदम -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आताच श्रध्दांजली या विषयावरती तहकुबी मांडण्यात आली. खरतर या गोष्टीवर चर्चा व्हायला पाहिजे. शहरामध्ये आज विविध घटना घडतात. याठिकाणी आता आयुक्तालय झाले आहे. जाता-येताना आम्ही त्यांच्या ताफ्याच्या गाडया बघतो. मग त्यांच कामकाज सध्याच्याला काय चाललयं. महापौर तुम्ही आता कुठल्याही पोलीस चौकीमध्ये फोन लावा त्यांचेकडे एक सुध्दा गाडी नाही. पोलीसांकडे नाही, एपीआयकडे नाही, पीएसआयकडे नाही. मग ही जर परिस्थिती असेल तर आपले शासन काय करतेय. महापौर साहेब, या शासनाला तुम्ही या शहराच्या दृष्टीकोनातून कळवा. पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशा काही घटना घडत आहेत. अत्याचार वाढले आहेत, भयंकर भयानक घटना होत चालल्या आहेत. अशा गोष्टी सुध्दा आमच्यासारख्या महिला तोंडाने बोलू शकत नाहीत. आयटी पार्कमधल्या मुली, एवढया आईवडीलांनी मोठयामोठया मुली घडवावयाच्या. त्यांचे शिक्षण करायचे, त्यांना नोक-या लावायच्या आणि त्या घरी

येताना त्या आपल्या घरी परत येतील का नाही याची परत  शंका बाळगायची. तरी याच्यासाठी महापौर खरतर सभागृहातल्या सगळया लोकांनी चर्चा केली पाहिजे की हे कुठेतरी थांबले गेले पाहिजे. फक्त आता काही ठिकाणी पोलीसां व्यतिरिक्त ज्या संघटना आहेत. या संघटनांनी प्रत्येक वॉर्डामध्ये संघटना तयार करा. प्रत्येक ठिकाणी अशा गोष्टी घडल्या पाहिजेत. की कुठेतरी या गोष्टींना आळा बसला पाहिजे. आज कोण म्हणत की बिल्डींगमध्ये आपण बघतोय, टीव्हीवर आपण बघतोय. कोण म्हणतं की चॉकलेटचे अमिष दाखविले. आम्ही काय करतो याच्यापेक्षा आपण काही तरी चांगले केले पाहिजे हे आपण बघितले गेले पाहिजे आणि त्याच्यासाठी पोलीस आयुक्तां बरोबर तुम्ही महापौर मिटींग घ्या. तुमचा अधिकार आहे तो. महापौरांनी बोलायला पाहिजे. शहरात अशा काही प्रकारच्या घटना घडत असतील तर महापौरांनी त्यांना बोलाविले पाहिजे. महापौर साहेब तुम्ही मिटींग घेतली पाहिजे. बोलवा इथं त्यांना. तुम्ही तुमच्या इथं बोलवा किंवा तुम्ही त्यांच्या इथं मिटींग लावा. सगळयांना बोलवा आणि मिटींग होऊ दया इथं. आता परवाच्या दिवशी आम्ही ज्यावेळेला पोलीस कंम्प्लेंट करीत होतो. एवढया गोष्टी घडतात. यांना गांर्भिय नाही याच. ज्यांना गांर्भिय नाही त्याच  तुमच्या वॉर्डमध्ये सर्व सुख सोयी असतील तर तुम्ही खुशाल गप्पा बाहेर जाऊन माराव्यात. महिलांवरच्या अत्याचाराचा विषय असलातरी तहकुबी मांडलेली आहे. ज्यांना महिलांसाठी गांर्भीय नसेल त्यांनी सभागृहाच्या बाहेर जावे. मुलींवर होणा-या अत्याचारासाठी त्यांनी तहकुबी मांडलेली आहे. या गोष्टीसाठी कोणीही बोलायला तयार नसेल तर मग सभागृह कसले आपण कसे नागरीकांच्यामधुन आज आपण निवडून आलेले आहोत. आज पन्नास हजार लोकसंख्येचे/मतदारांचे  प्रतिनिधीत्व तुम्ही करताय. मग यासारख्या गोष्टी तुम्ही गांर्भीयाने घेतल्या पाहिजेत. महापौर याच्यासाठी तुम्ही चांगल्या पध्दतीने नगरसेवकांची कमिटी करा. की अशा काही घटना घडल्यानंतर ताबडतोब त्याच्याबद्दल काही लोकांच्या तक्रार दाखल करुन घेत नाहीत. पंधरा-पंधरा दिवस झाले तरी तक्रारी दाखल करुन घेत नाहीत. त्यादिवशी आम्ही फोन केला अहो, साहेब असं असं आहे. एवढे समोरासमोर दिवसा ढवळया त्यांच्या चौकीमध्ये इनपूट असते आमचं. कॅमे-याचे इनपूट चौकीमध्ये आम्ही दिलंय. त्यांच्या चौकीमध्ये स्क्रीन दिलेले आहे आम्ही. साहेब ही घटना घडतेय. आता आमच्या इथे नेमका स्टाफच नव्हता, तुम्ही फोन केला त्यावेळेला तुमच्याकडे यायला गाडीच नव्हती. मग ही जर उत्तरे हयांची असतील तर महापौर तुम्ही या शहराचे महापौर आहात. शासनाचे

कामकाज वाईट आहे का चांगले आहे हा मुद्दा दुसरा आहे. परंतु जर शहरामध्ये अस्वस्थता असेलतर शहराच्या दृष्टीकोनातून आपण विचार केला गेला पाहिजे. महिलांच्या बाबतीत असेतर आपण त्या दृष्टीकोनातून विचार केला गेला पाहिजे आणि त्यांच्या वॉर्डामध्ये संघटना आहेत तर त्या संघटना वाढवा. शांतता कमिटया वाढवा. सगळया गोष्टी हया वाढल्या गेल्या पाहिजेत. प्रत्येक नागरीकांमध्ये पोलीस निर्माण झाला पाहिजे. हया सगळया गोष्टींचा जर विचार केला गेला पाहिजे. तरी या घटनांना थोडा तरी कुठेतरी आळा बसेल. लोकसंख्या भरमसाठ वाढलेली आहे. इतर ठिकाणी दुष्काळ आहे. पिंपरी चिंचवडमध्ये लोकांची संख्या वाढत चाललेली आहे. लोक येतात पण काही लोकांची अशी परिस्थिती आहे. ट्रीपल सीट बसणारी मुले सहजपणे महिला मोबाईलवर बोलत असतील तर मोबाईल हिसकावून घेतात. पण इथे घटनास्थळी येणारे आहे का कोणी. नाही कोणच नाही. पोलीस यंत्रणा सध्याच्याला महापौर साहेब फार अवघडपणे त्यांचे काम चाललेले आहे. त्यांना सुध्दा बरचसे कायकाय कामकाज वाटून दिलेली आहेत. यामुळे आणि त्यांच्याकडे गाडया नाहीत महत्वाचे. हे तुम्ही शासनाला कळवा. जर तुम्ही आयुक्तालय दिलयं. चौक्या वाढविल्यात तर स्टाफ ही वाढवावयाला पाहिजे.  आपण फक्त जागा दयायच्या. दरवेळेला पिंपरी चिंचवड शहराकडून जागा मात्र मागून घेतात. फर्निचर आपण करुन दयायच. त्यांना सगळया गोष्टी मात्र आपण करुन दयायच्या. पण कामकाजाच्या बाबतीत मात्र पिंपरी चिंचवड शहराचा जाब तुम्ही त्यांना विचारला पाहिजे. आणि अशा दृष्टीकोनातून खरी श्रध्दांजली वाहायची असेल तर प्रत्येक व्यक्तीने आवाज उठविला पाहिजे. सगळयांना त्यांना जाऊन विचारले पाहिजे की ही शहरामध्ये अशा प्रकारच्या घटना कशा घडतात. तर ती खरी श्रध्दांजली होईल महापौर साहेब. आणि याबद्दल तुम्ही मिटींग लावावी. अशी तुम्हाला मी महापौर साहेब विनंती करते. त्या मिटींगला  बोलवा ज्यांना ज्यांना बोलवावयाचे त्यांना त्यांना तुम्ही बोलवा. परंतु कायदयाच्या दृष्टीकोनातून त्यांना सक्षम, आज ते ही सक्षम आहेत. त्यांना जर उत्तर दिले तर ते म्हणतात तुम्ही या आमच्याकडे  आणि बघा गाडीच नाही आमच्याकडे आम्ही काय चालत यायचे का.  हे जर का पोलीस उत्तर देणार असतील तर काय करणार  आपण. मग आता त्यांना कार्पोरेशनने जागा पुरवावयाच्यात का. हे विचाराना तुम्ही त्यांना. शासनाने विचारले पाहिजे की आम्ही काय  त्यांना कार्पोरेशने गाडया पुरवावयाच्यात का. तुम्ही त्यांना ऑफीसेस दया, जागा दया पाहिजे ते लोकेशन्स् दया. अटोक्ल्स्टरला आयुक्तालय दिलयं. अटोक्लस्टर हे काय आयुक्तालय

आहे का. म्हणजे एवढया चांगल्या चांगल्या इमारती आपण त्यांना  आपण दिल्या. अहो त्यांची कॅपॅसिटी नाहीय का, महाराष्ट्र शासनाची कॅपॅसिटी नाहीय का. त्यांचे ऑफिसेस बनवायचे. सगळया प्रकारचे सगळीकडून कर जातात. जीएसटी जातो एवढा मोठा.  आणि मग त्यांनी त्यांची यंत्रणा पक्की नको का करायला. उदया ते म्हणणार तुमचं बांधकाम आहे ते आम्ही पोलीस पुरवू शकत नाही. बरोबर आहे आमची अपेक्षा ही नाही. आणि आम्ही तेवढे समजून घ्यायला समर्थ आहोत. प्रत्येक माणसागणीस ते पोलीस यंत्रणा ते पुरवू शकत नाहीत. परंतु कुठेतरी त्याला  चेक पाहिजे. तुम्हाला जर तुमच्या पोलीसचौकीमध्ये आम्ही इनपूट दिलेला आहे. टीव्ही स्क्रीनवर तुम्हाला कळतयं. वॉर्डामधल्या सगळया गोष्टी माहिती असतात. मोटर सायकल चोरीला गेलेल्या माहिती असतात. फोर व्हीलर चोरीला गेलेल्या माहिती असतात. लोकांना भिती वाटते. इनोआ गाडी बाहेर लावलेली चोरीला जाते आणि त्याची विल्हेवाट सुध्दा तेवढया पध्दतीने लावली जाते.  हया सगळया घटना शहरामध्ये घडतात. लहान मुलांना आईवडील कौतुकाने सायकल घेऊन देतात. अठराअठरा, वीसवीस पंचवीस पंचवीस हजारांच्या सायकली  मुलांना घेतात. पण ती सायकल किती दिवस टिकते. सोसायटीतील कॅमेरे असले तरी पोलीस म्हणतात की हे आमचे  बघण्याचे काम नाही. जर हयांना सीसीटीव्ही फुटेज जरी नेऊन् दिले तर म्हणतात की आम्ही काय करायच याला. जर या सगळया घटना थांबवावयाच्या असतील तर त्यांच्यावर पण दबावतंत्र वापरलेच पाहिजे. जर आपण त्यांच्यावर दबावतंत्र वापरले नाही, महापौर तुम्ही जर दबावतंत्र त्यांच्यावर वापरले नाही. सभागृहाने जर त्यांच्यावर दबावतंत्र वापरले नाही तर ते काम कसं करतील. त्यांना ही वाटते कुठे नोकरीला जावे तर पिंपरी चिंचवडला जावे. काहीच नाही सगळ शुकशुकाट. सगळं शांत चांगल चालयय. असं जर वाटलं तर ते सुध्दा तितक्याच हलगर्जीपणाने काम करतील. म्हणून आपला कुठेतरी वचक त्यांच्यावर असला पाहिजे. याच्यासाठी सर्व पक्षीय महापौर साहेब तुम्ही त्यांना निवेदन दया. महाराष्ट्र शासनाला निवेदन दया.  मुख्यमंत्र्यांना  निवेदन दया. की इथं जर तम्ही आयुक्तालय वाढवा, चौक्या वाढवा असं करुन नका तर त्याचबरोबर  त्यांना यंत्रणा देखील दिल्या गेल्या पाहिजेत. गुन्हेगारी एवढी वाढलेली आहे.  टिबलसीट मुले गाडीवरुन जातात काय एकमेकांना पाडतात काय, मारतात काय लुटतात काय. स्पाईनरोडला काय चालत तुम्हालाही माहित असेल महापौर साहेब. म्हणजे जवळच उदाहरण मी सांगितलं. हिंजवडी तर सांगितलच सांगितल. पण  तुमच्या घराजवळच

उदाहरण सांगितल . स्पाईन रोडला काय चाललेले आहे. घरकुलची परिस्थिती सुध्दा किती अवघड आहे. सगळी गुन्हेगारी तिथे एवढया मोठया प्रमाणात घरकुलमध्ये होतेय. मग आपण काहीतरी या गोष्टींना आळा घातला गेला पाहिजे. महिलांना संरक्षण मिळाले पाहिजे. चांगल्या पध्दतीने त्यांनी थोडा जरी वचक ठेवला सध्या शहरभर कॅमेरे आहेत. त्यांनी मनात आणले तर तीन जरी सिगनल चुकले तरी त्यांच्या घरी प्रेमपत्र कसं जातं, जात की नाही की महापौर. कॅमेरा बघूनच जात नां. मग तस ॲक्शन का घेत नाहीत. अक्सीडेंट झाला ड्रायव्हर सापडत नाही. गाडी सापडत नाही. मग सीसी टीव्ही फुटेजमध्ये दिसते. त्यावेळेस त्यांना गाडी आणि ड्रायव्हर सापडत नाही. सिगनल तोडलेल्या मुलाला १०० टक्के त्याच्या घरी पत्र जाते. मग हे जातं की नाही. अशाच माध्यमातून महापौर साहेब आपण चांगल्या पध्दतीने निर्णय घेतला पाहिजे आणि तुमच्या कारकीर्दीमध्ये चांगल कडक भूमिका घेऊन शासनाला कळवा की पिंपरी चिंचवड मधील असुरक्षितता वाढत चालली आहे. आणि त्यादृष्टीकोनातून तुम्ही त्यांच्याकडून जास्त फोर्स आणलीतर त्याच क्रेडीट तुम्हालाच मिळणार आहे. तुम्ही चांगल्या पध्दतीने पोलीस यंत्रणा आणली. पोलीस यंत्रणा वाढविली. हया शहराच्या दृष्टीकोनातून चांगल्या पध्दतीने निर्णय घेतला पाहिजे महापौर साहेब. आणि अशा दृष्टीकोनातून सर्वपक्षीय एक चांगला ठराव करा. आणि शासनाला पाठवा नुसते आयुक्तालय आणि चौक्या करुन चालणार नाही. तर त्याच्याबरोबर त्यांनी पोलीस यंत्रणा, पोलीसांना गाडया हा सगळया सुविधा पुरविल्या पाहिजेत. महापौर साहेब मला बोलायला संधी दिली. याबद्दल मी मनापासून आपले आभार मानते. आणि थांबते.

**मा. सिमा सावळे -** मा महापौर साहेब , मा. आयुक्त साहेब. मा. सभागृह खरतर गेल्या आठ दिवसांतल्या या सगळया घटना, ह्दयाला पिळवटून टाकणा-या आहेत. निश्चितचपणे पोलीसांची जबाबदारी याठिकाणी तितकीच मोठी आहे. नव्हे तर ती जबाबदारी पार पाडण्यास पोलीस सुध्दा कुठेतरी अपयशी ठरत आहेत. काही घटनांवरुन असे निदर्शनास येते की तक्रार करायला गेल्यानंतर तक्रार दाखल करुन घेतली जात नाही. साहेब आपल्या माध्यमातून का होईना या वॉर्डस्तरीय स्थानिक नगरसेवक त्याठिकाणी येतात तर त्यांच्या त्या समित्या जवळपास पोलीस स्टेशनला नाहीतच. तरी पोलीस कमिशनरांसमवेत बैठक घेऊन त्या भागातील नगरसेवकांची बैठक घेऊन सामजिक कार्यकर्ते असतील त्यांना सुध्दा त्यामध्ये सामावून घेतले पाहिजे.

त्याचबरोबर सर्व शाळांमध्ये पोलीसांनी त्यांचा जो  पोलीस ताफा किंवा महिला पोलीस शाळांमध्ये त्यांनी तिथे नंबर दिलेले आहेत  आणि त्या शाळांमध्ये म्हणजे या ज्या घटना घडल्या, परवाचा जो विषय होतो तो बारा वर्षाची मुलगी आहे.  आणि आज जो विषय आहे तो एचए ग्राऊंडवरची मुलगी अगदी सात वर्षाची आहे. आणि घरातून पालंकाकडून असेल, नातेवाईकांकडून असेल. या सगळया याच्यामध्ये तर वय लहान असते. कळत नाही काही. तर त्या शाळामध्ये गुडटच, बॅडटच शिकविले जाते की नाही. कुठे शरीराला हात लावला म्हणजे मुलांना अवघड वाटले पाहिजे, असुरक्षित वाटले पाहिजे.  असुरक्षित वाटल्यानंतर त्यांनी काय सांगितलं पाहिजे किंवा ओरडले पाहिजे. तक्रार नोंदविली पाहिजे हे सगळे शिकवितात की नाही शिकवितात. याच्यावरती ज्या ज्या पोलीसांचे ज्या ज्या शाळांमध्ये नंबर आहेत ते पोलीस त्या शाळांमध्ये जिथे पालकांच्या सभा होतात, शाळांच्या सभा होतात. त्यामध्ये काम करतात की नाही करतात याच्यावरती सुध्दा आता वॉच ठेवण्याची आपल्यावरती वेळ आलेली आहे महापौर साहेब. आणि ती आपण नाकारली नाही पाहिजे. कारण आपण समाजाचे देणे लागतो. आणि म्हणून मला असं वाटते की समाजाबरोबर जशी पोलीसांची जबाबदारी आहे. तशीच आपली सुध्दा तितकीच मोठी जबाबदारी आता याठिकाणी झाली आहे. या सर्व घटनांचा मी तीव्र शब्दात धिक्कार करते, निषेध करते. म्हणजे काय  शब्द वापरु तेही कळत नाही. निर्भया प्रकरणानंतर कायदा इतका कडक केला की त्यामध्ये जामीन सुध्दा होत नाही. तरीही मानसिक प्रवृत्ती इतकी खालच्या दर्जाची झालेली आहे. परवा एका घटनेमध्ये एका १४ वर्षाच्या मुलीवरती स्वत:च्या बापाकडून अत्याचार झाला आहे. आज वाचले तीन वर्षाच्या मुलीवरती आजोबाकडून अत्याचार. कोण आहेत ही नाती. म्हणजे नात्यांना सुध्दा काळीमा फासायला लागलेले आहेत मा. महापौर साहेब. आता मुलगा किंवा मुलगी तोही भेद राहिलेला नाही. जीव कासावीस होतो, भिती वाटते. त्यामुळे मा. महापौर साहेब समाजामध्ये जागृती येण्यासाठी आपल्याला जी जी पावले उचलता येतील ती ती पावले आपण उचलणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर पोलीसांबरोबर आपण वेळोवेळी बैठका घेणे, मान्य आहे की आपल्या इथं आयुक्तालय आणलं. की जे अनेक वर्षे झाले नव्हते. आणि आणल्यानंतर हरकत नाही आपल्याला त्यांच्याकडून अपेक्षा करायला पाहिजेत. गुन्हेगारी कमी होईल. मग तुम्ही गुन्हेगारी कमी होताना एकीकडे गुन्हेगारी कमी होईल म्हणतो आणि दुसरीकडे छेडछाडीचे असे प्रकार जर होणार असतील तर याच्यापेक्षा भयंकर आहे, कारण इथं आयुष्यच बरबाद

होतय, परत आयुष्य जगायला संधी नाहीय. कारण एकदा मनावरती जो आघात होतो तो बाकी तुम्ही काही करुन थांबवू शकत नाही मा. महापौर साहेब. आणि म्हणून माझी सर्व नगरसदस्य बंधू आणि भगिनींना विनंती असेल की तुम्ही तुमच्या पोलीस स्टेशनमध्ये आपण सुध्दा आपली जबाबदारी तितक्याच तीव्रतेने निभावू शकलो तर मला वाटत की एक सामजिक बांधिलकी म्हणून आपण त्यांच्याकडून बदल करु शकलो तर खूप चांगले होईल. तसेच मा. महापौर साहेब, जी आता टवाळखोर आहेत, शाळा कॉलेजच्या बाहेर सगळया शाळांमध्ये मोठया मोठया गाडया घेऊन जाणे, शिट्टया मारणे, बाकी सगळे प्रकार चालतात. आपण पण आपल्यातला पोलीस जागा करा. अगदी प्राधिकरणापासून ते दापोडीपर्यंत हातामध्ये दांडके घेऊन उभे राहतात. काही दिवस असे प्रकार केल्यानंतर समाजामध्ये जनजागृती आपण आणू शकलोतर मला वाटत मानसिक प्रवृत्ती एवढया खालच्या दर्जाचा लोक विचार करतात मुलींच्या बद्दल त्यांच्यावर वचक तरी बसेल. काही मुली आत्महत्या करतात किंवा पोलीस तक्रार घेत नाहीत. असे जे काही प्रकार होतात त्यांच्यावर देखील वचक बसेल. आणि एक सामजिक जनजागृती त्याठिकाणी आपण जर मोठया प्रमाणात उभी करु शकलोतर मा. महापौर साहेब मला असं वाटते जे काही निष्पाप जीव वाचेल त्याच्यासारखे पुण्याचे दुसरे काम कुठलेच नसणार आहे आणि ते पुण्याचे काम आपल्याला आपल्या वतीने आपल्या सगळया नगरसेवकांच्या वतीने करण्यात यावे. मा.कमिशनर साहेबांना मी असे सांगेन मा.कमिशनर साहेब तुम्ही पोलीस कमिशनरांना आपण स्पेशल इथं बैठक लावून सगळे नगरसेवक बोलवा. आणि त्या त्या पोलीस स्टेशनला त्यांची जी कमिटी आहे. या कमिटीवरती नगरसेवक सुध्दा असले पाहिजेत. ते त्यांना बंधनकारक करा. सामजिक बांधिलकीचे जे उपक्रम आहेत ते मोठया जोषमध्ये आपण याठिकाणी केले पाहिजेत. ज्या मुलींवरती अत्याचार झालेत त्यांचा निष्पाप बळी गेला त्यांना मी माझ्या कुटूंबियाच्या वतीने, भारतीय जनता पार्टीच्या वतीने आणि समस्त महिला वर्गाच्या वतीने मी याठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते आणि त्या नराधमांचा मी कडक तीव्र शब्दात निषेध करते.

**मा.मिनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह गेल्या आठ दिवसांपूसन पिंपरी चिंचवडमध्ये लहान मुलींपासून ते महिला वर्गापर्यंत म्हणजे मागील महिनाभरापासून म्हणायला हरकत नाही. कारण आजच महिना झाला. राम कदम

साहेबांनी जे वक्तव्य केले होते तेव्हापासून महिलांना असुरक्षित वाटतच होते आणि गेली आठ दिवसांपासून जे प्रकार महिलांच्या बाबतीत, लहान मुलींच्या बाबतीत अत्याचार होतात. ते खरच नींदनीय आहे. आपण फक्त म्हणतो की महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. परंतु महिलांना ५० टक्के न्याय तरी मिळतोय का आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये. आपण आता  सभागृहामध्ये जी कुत्री आणली त्याच्यानंतर इतका मोठा कडक बंदोबस्त पोलीसांनी केला. तसाच जर बंदोबस्त.....

**मा. महापौर -** तुम्ही विषयावर बोला. ताई, तुम्ही विषयावर बोला.

**मा.मिनल यादव -** मा.महापौर साहेब, तसाच जर बंदोबस्त हिंजवडी, आयटी पार्क मध्ये ज्या रात्रीच्या वेळी महिला जातात असुरक्षित वाटत तेवढा जर बंदोबस्त त्याठिकाणी जर केलातर, मी हे एक उदाहरण देतेय महापौर साहेब. तसाच बंदोबस्त इथं जर केला महापौर साहेब, तर त्याची जास्त गरज आहे. महिलांना सुरक्षिततेच्या बाबतीत जास्त उपयोग होईल. त्याचबरोबर महिलांबद्दल जो कायदा आहे. बाललैगिंक शोषण विरोधी जो कायदा आहे, हे सगळे जे कायदे आहेत हे महिलांना माहिती नाहीत. ते आपल्याबद्दल किंवा आपल्या स्वसंरक्षणासाठी तो एक मोठा कायदा आपल्या न्याय व्यवस्थेमध्ये आहे. जर तुम्ही आणि आयुक्त साहेब यांनी पोलीस आयुक्तांबरोबर मिटींग घेऊन प्रत्येक प्रभागामध्ये एकएक महिला पीआय दिली आणि या कायदयाची माहिती जरी प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचवली तर महिलांवर किंवा एखादया प्रभागामध्ये महिलेवर जर असा अन्याय झाला किंवा आजूबाजूला एखादया महिलेवर अन्याय झालातर आपण आवाज उठविला पाहिजे. आपल्या बाबतीत इतकं काही आपण करु शकतो. त्याच्यामुळे  खरच याची गरज आहे फक्त आपण आत्ता श्रध्दांजली वाहून विषय बंद करुन पेपरला बातमी येऊन काहीच उपयोग नाही. हयाच्यामध्ये जर का पुढे येऊन तुम्ही जर का पुढाकार घेतला. प्रत्येक वॉर्डामध्ये अशा काही महिलांसाठी माहिती देण्याचे जर चर्चासत्र ठेवलेतर ते सगळयापर्यंत पोहोचू शकेल. इथं पालिकेमध्ये जर एक तक्रार बॉक्स ठेवला. महिलांच्या बाबतीत जर कुठला गैरप्रकार होत असेल आणि त्याची जर कारवाई त्वरीत आठ दिवसांत केली तरी खूप झाले, डोक्यावरुन पाणी जाईल. तरी महिलांसाठी हया समस्या सुटण्यासारख्या आहेत. त्याचबरोबर महिलांना जर स्वसंरक्षणाचे ट्रेनिंग जर पालिकेकडून मिळाले तर महिलांना त्याचाही जास्त उपयोग होईल. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद महापौर साहेब.

**मा.राजू बनसोडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. मा. सभागृह आताच मंगलाताईंनी जो विषय घेतला आहे. तो खरखरच आजची, काळाची गरज आहे. गुन्हेगारांना पहिली गोष्ट तर धाकच राहिलेला नाही आणि दुसरं म्हणजे पंचनामा करायच म्हणलं तर पंचनाम्यासाठी जायचं म्हटलं तर तिथे चार तास लागतात पोलीसांना जायला. वायसीएममध्ये पंचनामा करण्यासाठी मी पोलीस चौकीमध्ये चार वेळा फोन केला. अशी परिस्थिती बिकट आहे. ही काळाची गरज आहे. गुन्हेगारांवर कोणाचाही धाक राहिलेला नाही. पोलीस कमिशनरांबरोबर बैठक लावावी. त्यांचेशी चर्चा करुन हा विषय तातडीने मार्गी लावण्यात यावा. एवढीच विनंती आहे.

**मा. बाळासाहेब ओव्हाळ -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. मा.सभागृह. महापौर आता मंगलाताईंनी, सिमाताईंनी विषय मांडला. खरोखरच ही समाजाची आजची गरज आहे. आयुक्त साहेब कायदा कडक करुन चालणार नाही. नुसता कायदा कडक करुन काहीही उपयोग होत नाही. कायदा सांभाळणारी व्यक्ती त्याठिकाणी चांगली असली पाहिजे. कायदा सांभाळणारे जर विकणारे असतील आणि लाचार असतील तर ते कायदा सांभाळू शकत नाहीत. दुसरा विषय आज माणसाच्या मनातील मानसिकता बदलली पाहिजे त्याच्यासाठी आपली जी संस्कृती डबघाईला गेली त्यासाठी निदान पिंपरी चिंचवड शहरामध्ये वयाच्या लहानपणापासून शाळेतून आपल्याकडून काहीतरी ट्रीटमेंट मिळली पाहिजे. त्याप्रमाणे आज शाळेमध्ये एकही विषय असा नाही की जो भविष्यात पुढे त्याच्या कामासाठी, त्याच्या लाईफमध्ये, त्याच्या समाजसेवेसाठी काहीतरी उपयोग होईल परंतु संस्कृती घडविण्यासाठी जर आपल्याकडून अस काहीतरी मेडीटेशनसारखा विषय घेतला, जर आपण शाळेमध्ये चालू केलातर चांगले होईल. शासनाकडून याच्यासाठी प्राधान्य दिलेले आहे परंतु त्याची सक्ती केली जात नाही. त्या सक्तीचा वापर केला गेला पाहिजे. असं आयुक्त साहेबांना माझे सेपरेट म्हणणे आहे. दुसरा विषय गुन्हेगारी का वाढतेय पिंपरी चिंचवडमध्ये. आज तुम्हाला सांगतो की पिंपरी चिंचवडमध्ये गुन्हेगारी वाढायला लागलीय कॅफेच्या नावाखाली. कॅफेहाऊस, कॉफीहाऊस म्हणून नाव असतेय आणि त्याच्या आतमध्ये कॉलेजचे मुले आणि मुली एकत्र बसून चाटींग करीत आहेत. त्याच्यावरती व्हिडीओवर नाही तसले व्हिडीओ पहात बसतात आणि त्याचा परिणाम बाहेर जाऊन ही मुले अल्पवयीन मुले सुध्दा अत्याचारासारखे घिलोने कार्य करतात. तुम्हाला सांगतोय मी दोन वर्षापुर्वी

मा.पंतप्रधानांना असं लिहिले होते आणि मा. मुख्यमंत्र्यांना सुध्दा लिहिले होते की वयाच्या १८ व्या वर्षीच्या पुढे मोबाईलवरती ठराविक  वेबसाईट ओपन झाली पाहिजे अन्यथा ती वेबसाईट ओपन नाही झाली पाहिजे हे समजून घ्यायचेय तुम्ही. तर तसं मी पत्र दिले होते. कारवाई चालू आहे म्हणून उत्तर आले, आजपर्यंत काहीही झालेले नाही.  तुम्हाला सांगतो आज ८ ते १० वर्षे वयाच्या मुलांच्याकडे आयफोन असतो आणि तो आयफोन ओपन करुन त्याच्यामधल्या वेगवेगळया विचित्र साईटस पाहून तो मुलगा एक्ससायटेड होतो आणि त्याचे परिणाम त्याची मानसिकता बदलते. ती मानसिकता बदलून अत्याचारसारखे घिलोने परिणाम होतात. त्याकरीता सन्मा. आयुक्त आपण थोडेसे याच्यामध्ये सहकार्य करावे. खूप चांगल्या प्रकारे शाळेतून मार्गदर्शन झाले पाहिजे. त्यामुळे आपल्या संस्कृतीत बदल होईल. दुसरा विषय आज पीआय सिनियर पीआय असतात. अत्याचार का होतात याच्याबद्दल मी बोलतोय. आज पीआय जे आहेत तुम्हाला सांगतो मी स्वत: शांतता कमिटीवर होतो. गेल्यावर्षी दहा मिटींग सुध्दा झालेल्या नाहीत. आता ताईंनी सांगितले की शांतता मिटींग झाल्या पाहिजेत. शांतता कमिटी झाल्या पाहिजेत. या शांतता कमिटीवर जर सिनियर पीआयने इंटरेस्ट घेऊन काम केले तर १०० टक्के रिझल्ट भेटेल अन्यथा भेटत नाही मला एवढंच सांगायचय की महापौर साहेब आपण खरोखरच ताईंनी सांगितल्याप्रमाणे आपल्या पिंपरी चिंचवड शहराच्या सर्व पोलीस स्टेशनचे पीआय, सिनियर पीआय यांना बोलवून त्यांची सर्व नगरसेवकांना घेऊन मिटींग लावून कारवाई करावी, धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आज खरोखर या विषयावर बोलायचे की नाही या द्विदा मनस्थितीमध्ये आम्ही सर्व महिला इथं बसलोय कारण रोज तोच विषय, स्त्रीच्या चारित्र्यहननाचा विषय, स्त्री किती सिक्यूर्ड आहे किंवा नाही याचा विषय आणि त्यात भर म्हणजे आज माझ्या प्रभाग क्रमांक २० मध्ये एचए ग्राऊंडवर सापडलेला सात वर्षाच्या मुलीचा मृतदेह. मी इथं फक्त कायदयाचाच निषेध करणार नाही. तर मी इथ प्रशासनाचा पण निषेध करणार आहे. माझ्या एचए ग्राऊंडमध्ये कंम्प्लीटली डंपींग झोन केला आहे. पूर्ण पीसीएमसीची घाण येतेय. पूर्ण पीसीएमसीचं रॅबीट येतेय, पूर्ण पुण्याचे रॅबिट येतेय. हे वारंवार आम्ही अधिका-यांना जाणून दिलंय. की त्या रॅबिटचा काही तरी विषय करा. आज त्या रॅबिटचे इतके डोंगर साचलेत. आज तिथे एक सात वर्षाची मुलगी सापडलीय उदया

अजून कोण सापडेल ते सांगता येणार नाही. आज कार्पोरेशनच्या ब-याचशा इमारती ज्या आहेत त्या इमारतींच्या इथं सुध्दा वेगवेगळया पध्दतीने कार्यक्रम चाललेले असतात. खर म्हणजे आयुक्त साहेब आल्यानंतर त्यांना माझं पहिले एक लेटर आले होते. माझ्या इथं जिजाऊ सांस्कृतिक भवन आहे. तिथे वेगळया पध्दतीने मुले गांजा ओढण्यापासून दारु पिण्यापासून तिथे काम केले जाते. मग अशा वेळेला जर असे प्रकार अशा ठिकाणी घडत असतील तर प्रशासनाला मी का दोष देऊ नये. हयाचे उत्तर आणि याचा खुलासा आयुक्त साहेब तुम्हाला आज करावा लागणार आहे. कायदा, सुव्यवस्था, नियोजन हे जसं पोलीसांचे काम आहे. तसं आपल्या शहरातील इमारती आहेत, मैदाने आहेत, आपल्या कार्पोरेशनच्या इमारती आहेत त्याचे नियोजन आणि त्याठिकाणी सेक्युरिटी ठेवणं हे आज कार्पोरेशनचे काम आहे. आज काही इमारतींवर रिलायन्सचे टॉवर दिलेत. एअरटेल्स्चे टॉवर दिलेत,  बीएसएनएलचे टॉवर दिलेत आणि त्या लोकांसाठी तिथे वर चढण्यासाठी पुर्णत: त्यांना रिकामे करुन दिलयं. त्यावेळेला तिथे येणारी लोक आहेत, आज माझ्या वॉर्डामध्ये घडलेल्या गोष्टी आहेत की तिथून वरुन बीअरच्या बाटल्या फेकुन मुलींना मारल्या आहेत, छेडछाड केली गेली आणि या गोष्टी पोलींसामध्ये सुध्दा सांगितल्या गेल्यात. हया गोष्टी कमिशनर साहेब तुमच्या कानावरती गेली दिड वर्षापासून घालत आहोत. जर कार्पोरेशन सुव्यवस्था हयाच्याकडे लक्ष देणार नसेल आणि जर असे प्रकार घडले तर मग फक्त पोलीसांनाच याच्यामध्ये का धरायचे आणि यामध्ये कार्पोरेशनला सुध्दा का जबाबदार धरु नये. याचा खुलासा महापौर साहेब आयुक्तांना करायला लावा. आज एचए ग्राऊंडमध्ये इतकी गहनवस्था आहे की तिथे कच-याचे ढीग तर आहेतच. पण पुर्ण पीसीएमसीचे रॅबीट त्या एचएच्या ग्राऊंडवर आहे महापौर. त्या दोन रॅबीटमध्ये जे उंचवटे आहेत त्या उंचवटयाच्या आतमध्ये  कोण बसले किंवा एखादी गाडी जरी जाऊन उभी राहीली तरी तिथे दिसत नाही. वारंवार आम्ही सांगतो की तुम्ही ते क्लीअर करा क्लीअर करा परंतु त्या गोष्टी होत नाहीत, बाकीच्या गोष्टी तर सोडाच. सात वर्षाच्या मुलीचा देह तिथे सापडत असेल आणि त्यापध्दतीने तिथे जर कारस्थान होत असेल तर का नाही तिथे भविष्यामध्ये या गोष्टी घडणार, का नाही तिथे इमारतीमध्ये भविष्यात या गोष्टी घडणार. फक्त कायदयाला नाही धरणार आम्ही. पोलीस आयुक्तालय एक महिन्यापूर्वी झालंय. बसायला, व्यवस्थित व्हायला अजुन एक दोन महिने जातील असं गृहीत धरुन आम्ही चालतो. सगळयांना आम्ही नेहमी सांगतोच. महिला बाल कल्याण अंतर्गत आम्ही रोज

सांगतो. महिला बाल कल्याणकडून आम्ही विविध फॉर्म घेतो शिक्षणमंडळाकडून पण आज आम्ही जसं सिमाताई म्हणाल्यां तसं नगरसेविका म्हणून नाही तर एक आई म्हणून एक महिला भगिनी म्हणून. महिला आणि बाल कल्याण समितीच्या मार्फत किंवा शिक्षणमंडळाकडून आपण मुलींसाठी काय करतो. आपण त्यांना गुडटच बॅडटच शिकवितो का, की फक्त आपण ऊहापोह करतो की शाळामधला पट किती शाळा कुठल्या पध्दतीने चालणार शाळांमधल्या मुली काय आहेत, शाळा मधल्या मुली कोण आहेत. आज फक्त आयुक्त साहेब, तुम्हाला मला उत्तर दयायचय. या सगळयांचा त्रास आम्हाला झालाय. त्या प्रभागाची, २० नंबर प्रभागाची नगरसेविका म्हणून मला आज त्रास होतोय. माझ्या वॉर्डमध्ये एका मुलीचा मृतदेह सापडलाय आणि त्याला तुम्ही का कारणीभूत नसावं हा माझा तुम्हाला प्रश्न आहे. जर ते मैदान क्लीअर असत, त्या मैदानामध्ये रॅबिटचे ढीग नसते तर मला वाटत की त्या मैदानामध्ये काय चाललय ते बाहेरच्या लोकांना दिसलं असतं आणि अशी घटना घडली पण नसती तिथे. आज जर आम्ही वारंवार सांगतोय तुम्हाला या इमारतीकडे लक्ष दया, त्या इमारतीकडे लक्ष दया, या मैदानाकडे लक्ष दया. तर का अधिकारीवर्ग त्याच्याकडे लक्ष देत नाहीत, जात नाहीत. आयुक्तसाहेब मला याचा खुलासा करावा. त्यानंतर मला महापौर साहेब बोलायचे आहे.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. प्रथम आपल्याला धन्यवाद देऊ इच्छितो की मंगलाताई कदम असतील, सिमाताई असतील. आपण इथं हा विषय चर्चेला घेतला. मुळात भावना व्यक्त करण्याची विशेषत: या चर्चेच्या माध्यमातून प्रशासनावर कशा पध्दतीने आरोप ठेवता येईल त्यासाठी चर्चा अत्यंत आवश्यक असते. मुळात सभागृह आहेच चर्चा करण्यासाठी. सामाजिक दुर्देव असे आहे की काही तरी कोणती तरी घटना घडल्यानंतर आपण त्यावर चर्चेच्या माध्यमातून काही तरी विषय देण्याचे काम सातत्याने होत असते. सिमाताईंनी उल्लेख केल्याप्रमाणे दिल्लीत एखादी घटना घडल्यानंतर संपुर्ण भारत देशाला हादरा बसणारे, माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य झाल्यानंतर घटना बदलते, कायदे बदलतात. बाळासाहेबांनी कायदयाचे अतिशय सुंदर विश्लेषण केले. तर कायदयाची नेमकी भिती कोणाला आहे. या सर्व गोष्टींचा उहापोह करीत असताना आता या सगळया घटना पूर्वी गावकोसा बाहेर या घटना घडत होत्या अंधारात घडत होत्या. आता त्या शहरापर्यंत

येऊन पोहोचल्यात. त्याचे कारण असं आहे की कायदयाचा नसलेला अंकुश. या सगळया परिस्थितीचे भान ठेवून आपण चर्चा करणार आहात त्या चर्चेच्या माध्यमातून भविष्यकाळामध्ये किमान आपल्या शहरापुरते आपण साचेबध्द कायदा डोळयासमोर ठेवून आपली नैतिक जबाबदारी स्विकारुन किंबहुना आपली बांधीलकी समजून आपण काय उपाययोजना करणार आहोत. यावर जर आपण भाष्य केले तर मला वाटते ते अधिक योग्य होईल. मा. महापौर आपल्याला पण वैयक्तिकरित्या धन्यवाद देतो. पेपरला बातमी वाचली की आपण शाळांना भेटी चालू केल्या आहेत. मला वाटतं की ब-याच वर्षानंतर हे मला ऐकायला मिळाले की कुणीतरी शाळेला भेटी देतं. एवढे नगरसेवक आपल्या सभागृहामध्ये आहेत. मला वाटतं मुलींची शाळा प्रत्येक नगरसदस्यांच्या वॉर्डामध्ये आहे कारण का महिला भगिनी, महिला नगरसदस्या पण योग्य रितीने संभाषण करु शकतात. जसं आई एका मुलीला सांगू शकते तशा पध्दतीने एक शाळा जर प्रत्येकाने दत्तक घेतली तर मला अस वाटत की काय घडलय यावर कायदा निश्चित त्यावर मार्ग काढेलच. परंतु होणा-या घटनेला कधीही, कदापिही सामोरे जायला लागू नये. अशा पध्दतीचे नियोजन जर आपण केले तर मला अस वाटत की ख-या अर्थाने त्या आपल्या चिमुरडया मुलीला श्रध्दांजली होईल. म्हणून तीन महिन्यानंतर सगळया नगरसेवकांना मुळीच बोलवू नका कारण का अधिकारी आले, सगळे पोलीस, पदाधिकारी आले तर ती जनरल बॉडी होऊन जाईल. हा विषय जो आहे तो सर्वांचा आहे, या सभागृहाचा आहे, या शहराचा आहे. शहराच्या आत्मीयतेचा हा विषय आहे. अत्यंत गांभीर्याने घ्या महापौर. आणि तुम्ही अतिशय चांगल्या पध्दतीने सुरुवात केलेली आहे. आज छोटया छोटया गोष्टीतून अनेक गोष्टी घडत आहेत. खरतर आपल्यापासून सुरुवात केली तर बर होईल. मुलांना बारावीपर्यंत आपण मोबाईल का देतो याचे पहिले आत्मचिंतन आपण केले पाहिजे. आता याच पालकत्व वैयक्तिक जीवनामध्ये निश्चित केले पाहिजे. सुरुवात आपल्यापासून केल्यानंतर ज्या गोष्टी पाहू नये ज्या गोष्टी पाहण्यासाठी अनंत कालखंड जावा लागतो. त्या गोष्टी पौगंडावस्था आल्यानंतर माणूस त्वरीत पाहतो. हया सगळया गोष्टी, अशी कृत्ये करण्यास भाग पाडतात. मला वाटत की पोलीसांनी पोलीसांची विश्वासहार्तता गमाविलेली आहे. कारण हप्ते मोठया प्रमाणात चालू आहेत आणि हप्त्याच्या माध्यमातून त्यांचे धाडस एवढ वाढलेले आहे. मा. महापौर आता एखादा गलिच्छ प्रकार घडल्यानंतर पोलीस चौकीमध्ये गेल्यानंतर ते पहिले बघतात की कोणत्या गरीब घरातून आलेत का. ती वर्गवारी केली

जाते त्यानंतर त्यांचा विषय गांभीर्याने घ्यायचा की नाही त्यावर चर्चा केली जाते. हिंजवडीमध्ये आता मुलींच्या हॉस्टेलवर डायरेक्ट हॉस्टेलच्या आतमध्ये जाऊन मुलांनी विनयभंग केल्यानंतर ती मुलगी पोलीस चौकीमध्ये गेल्यानंतर तो पोलीस म्हणतो तुम्ही आपआपसामध्ये मिटवा. ही कालची घटना आहे. मी काय तुम्हाला दहा वर्षापुर्वीची घटना सांगत नाही आणि आयुक्तालयाकडे पत्रव्यवहार केल्यानंतर आयुक्तही त्याला सस्पेंड करतात. आयुक्तसाहेब, महापौर साहेब, महापौरांनी आयुक्तांना आदेश दयायचे असतात. आयुक्तांनी महापौरांना नाही. महापौर तुम्हाला एक सांगतो आज आयुक्तालय झालेले आहे. बोलवा सगळे अधिकारी, गाडया कमी पडतात. जे दत्तक घेतलेत ना ठेकेदार. पाचपाच कोटी रुपयांची कामे घेतात. त्यांना लावा दोनदोन गाडया दयायला. आमचा सर्वांचा पाठींबा आहे. कायकाय कमी आहे. या शहरातील सुरक्षा व्यवस्था, या शहरामधील अत्याचारावर नियंत्रण ठेवणेसाठी ज्या ज्या उपाययोजना कराव्या लागतील, तरतूद करा स्पेशल.  महाराष्ट्राला एक नवीन पॅटर्न दया. एक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पॅटर्न झाला पाहिजे. सर्व नगरसेवकांनी एकमुखाने या शहरातील संपुर्ण सुरक्षा व्यवस्था ही सक्षम करण्याच्या दृष्टीकोनातून हे पाऊल टाकलेले आहे हा संदेश वाट कोणाची पाहू नका हा संदेश महापौर तुम्ही दया. मिटींग घेऊन ताबडतोब या निर्णयाची अंमलबजावणी करा. ज्या ज्या गोष्टी नाहीत त्या त्या गोष्टी उपलब्ध करुन दया. आम्ही सर्व सभागृहाच्या माध्यमातून अधिकार देतो. आज पक्षनेते अनुमोदन देतील. पण या सगळया परिस्थितीचे गांभीर्य ठेवा. हा विषय चर्चेला ठेवून चर्चा ही संपणारी चर्चा नाहीय. ही मनुष्यप्रवृत्ती किती खालच्या स्तराला गेलेली आहे याचे सविस्तर विवेचन सिमाताईंनी केले आहे आणि त्यावर एकच आहे की आपण पहिले सक्षम रहा आपल्यापासून. महानगरपालिका ही शहराची आहे, ही महानगरपालिका वैयक्तिक कोणाची नाहीय. आणि म्हणून या शहरातील सर्वांगीण भौतिक विकासाबरोबर सुरक्षा व्यवस्था कशा पध्दतीने राहील यादृष्टीकोनातून आपण सर्वांनी नियोजन करावे. महापौर साहेब, तुम्ही दर तीन महिन्यांनी मिटींग घेत चला. आणि महापौर साहेब महापौरांसारखे वागा. आदेश दया, कमिशनर असतील कोणीही असतील ताबडतोब प्रशासकीय आदेश दया, बोलवा त्यांना. तुम्हाला राज्यपालांना सुध्दा बोलाविण्याचे अधिकार आहेत. तुम्ही अधिकाराचे एक पत्र घेवून फिरत चला. तुम्ही बीनधास्त कारवाई करा आणि महानगरपालिकेच्या सर्व महिला सदस्यांना माझी नम्र विनंती आहे. एका दिवसात, आठवडयात, पंधरा दिवसात तुम्ही सगळया शाळांमधील

वीस हजार मुलींना संरक्षण करुन त्यांची मानसिकता तपासून घेऊ शकता. आयुक्तसाहेब लैंगिक शिक्षणाबद्दलचे संपुर्ण प्रबोधन एक चांगला माणूस तुम्ही बोलवा. तुम्हाला कल्पना नसेल आयुक्तसाहेब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या काही शाळांमध्ये आवर्जून तुम्ही जा. शिक्षक थरथर कापतात मुलांना. डायरेक्ट हत्यार दाखवितात, चाकू वगैरे दाखवितात. एक केस झाली तरी चालेल पण समाज सुधारत असेल, आपण नका केस करु. पण आपण फेस करायला पुढे कायदेशीर मार्ग आहेत त्यावर अंकुश ठेवा. शिक्षकांचा दरारा असला पाहिजे. आम्ही कॉलेजला असताना पोलीसांना पाहिल्यानंतर घाबरून पळून जायचो. म्हणजे आम्ही काही गुन्हेगार नव्हतो. पण भिती अशी मनामध्ये असायची. आता पोलीसांचा शर्ट पकडलेला व्हिडीओ व्हायरल केला जातो. याचे कारण त्यांनी विश्वासहार्तता गमाविलेली आहे आणि महापौर साहेब तुम्हाला ही संधी आहे.  अतिशय अमानुष पध्दतीने ज्या घटना घडत आहेत. कदाचित या संधीतून काहीतरी एक दिशा देण्याचे काम तुमच्या हाती आलेले आहे आणि ते सुरक्षीतरित्या आपण चांगल्या पध्दतीने, कारण घटना घडल्यानंतर आपण नियम करतो. घटना घडल्यानंतर आपण चर्चा करतो. घटना घडू नये म्हणून काय करतो यावर कुठेतरी आता आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. आणि म्हणून हा विषय अतिशय गांभीर्याने घ्या. मी तुम्हालाच पहिल्यांदाच धन्यवाद दिलेला आहे तुम्ही महापौर केवळ ब्रीज, झालेल थेटर, झालेले रस्ते पाहणी करण्यापेक्षा या महानगरपालिकेच्या शाळा हया वंचित, अतिशय गरीब परिस्थितीतून ब-याच वेळेस शिक्षक सुध्दा अतिशय गैरमार्गाने फायदा घेतात. मी तुला पास करतो. त्यासाठी सुध्दा आमीष दाखविले जाते, प्रत्येकजण एकएक मुलगी दत्तक म्हणून घ्यायला तयार आहे आपली मुलगी म्हणून. अशा मुली शोधा. मी पहिलीपासून दहावीपर्यंत शाळा चालवितो. ९० टक्के नाही तर ९९ टक्के मुले ही झोपडपट्टीमधील आहेत. मी स्वत: त्यांना प्रशिक्षण देतो. या सगळया परिस्थितीतून ज्यावेळेस आपण जोरात बोलतो आपण काय करतो हा देखील मोठा विषय असतो. आणि म्हणून महापौर तुम्ही अतिशय चांगले कार्य करीत आहात. आणि आयुक्त साहेब तुम्ही नुसते पारंपारिक पध्दतीने पुस्तकी ज्ञानाच्या माध्यमातून किती दिवस हा संसार चालविणार आहेत. अनेक असे पोलीसांचे कौंसलींग करणे गरजेचे आहे. पहिले पोलीसांचे कौंसलींग करा. त्यांना महिन्यातून एकदा कुठेतरी मेडीटेशनला पाठवा. यांची बुध्दी, एकाग्रता संयम नसतो हयांना. कोणीही गरीब माणूस आला की धावून बोलतात. तो म्हणतो केस नको माझ्यावर अत्याचार झाला तरी चालेल पण

यांची बोलणी नको. इतकी अपमानास्पद वागणूक देतात आणि म्हणून बनसोडेंनी सांगितले त्यांनी चांगल्या पध्दतीने खुलासा केला. त्यांना चांगली माहिती आहे. कारण दोपाडीमधील वातावरण मला माहिती आहे कारण मी लहानपणापासून पाहतोय. महापौर साहेब, ही तुम्हाला संधी आहे. एखादी अराजकता होती त्यावर त्यातून आपले नेतृत्व उफाळून निघण्याची एक प्रकारे दुर्दैवी घटना जरी असली तरी आपल्याला काम करण्याची ती एक संधी असते. आणि तुम्ही या घटनेकडे सकारात्मकरित्या दृष्टीकोनातून पाहून भविष्यामध्ये झालेल्या घटना या दुर्दैवी तर आहेतच पण भविष्यामध्ये या घटना घडू नयेत म्हणून तुम्ही आयुक्तांना बरोबर घ्या. आयुक्त साहेब चार प्रोजेक्ट नाही झाले तरी चालतील. परंतु सुरक्षा व्यवस्था चांगली केली पाहीजे. चारचार मुले चांगल्या चांगल्या अलिशान गाडया घेऊन बारावी नापास झालेली मुले कॉलेजच्या बाहेर उभी असतात. करा जप्त कोणाचेही पोरगं असू दया. दया सजा त्यांना महापौर आम्ही सर्व तुमच्याबरोबर आहोत. खरंतर कोण असं फिरतं या शहरामध्ये हे तरी कळेल. हया सगळया गोष्टीचे भान ठेवून सिमाताईंनी सांगितल्याप्रमाणे या सगळया गोष्टींच काही तरी घडल्यानंतर आपण चर्चा करतो परंतु त्याच्यावर आपण निश्चित शोक व्यक्त करुन भविष्याच्या वाटचालीसाठी आपण सक्षम रहावे अशा पध्दतीच्या भावना व्यक्त करतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा.सभागृह खरतर सिमाताईंनी या विषयाचे गांभीर्य बघून ही सभा तहकुबी मांडली. एखादया विषयाचे भाषणतर आपण सगळयांनी केली पाहिजे. परंतु तो विषय खरतर एचएच्या मैदानावरती परिस्थिती ज्यावेळेस बघितली कासारसाईचा विषय झाला, हिंजवडीचा झाला. एचएच्या मैदानावर ज्या पध्दतीने घटना घडली. मी या हाऊसमध्ये येण्याच्या अगोदर त्यांनी मला सांगितल की दादा अत्यंत वाईट घटना घडली एचएच्या मैदानावर. खरतर हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. मला असं वाटतं की विषय संवेदनशील असला तरी प्रत्येकाने या विषयाच्या संदर्भातले राजकारण करण्याची गरज नाही. हा विषय संवेदनशील असल्याने आपण श्रध्दांजली बाबतच बोलले पाहिजे. पण आपण कायदा सुव्यवस्था, पोलीस आयुक्तालय झाल याठिकाणी. मग प्रशासन, पोलीस काय करतात या संदर्भामध्ये खरतर आपण अन्यही विषयाच्या संदर्भमध्ये बोलू शकतो. तर मला याठिकाणी, म्हणजे मंगलाताईं, भाऊसाहेबां, मिनलताई बोलल्या. नंतर सुजाताताईनी भाषण केलं. खरतर कायदा आणि सुव्यवस्था या शहरामध्ये चांगल्या पध्दतीची राखली पाहिजे. ती पोलीसांची १०० टक्के जबाबदारी आहे. आणि भाऊसाहेब

तुम्ही ज्या पध्दतीने सांगितले आणि ताई म्हटल्या की पोलीस आयुक्तालय आल्याच्या नंतरच्या घटना खरतर अशा पध्दतीच्या घटना घडतात ही दुर्दैवाची बाब आहे. खरतर लोकांची मानसिकता बदलली पाहिजे. प्रत्येक माणसाची पुरुषांचीही मानसिकता ही बदलली पाहिजे. म्हणजे घटना कुठे घडेल आणि कधी घडेल. म्हणजे आजच्या परिस्थितीमध्ये बघितले तर कुठल्या नात्यावर विश्वास ठेवावा. एवढी दुर्दैवी आणि दयनीय परिस्थिती खरतर समाजामध्ये निर्माण झाली आहे. म्हणजे समाज ज्या पध्दतीने अधोगतीला जातोय की काय अशी आजची परिस्थिती आहे. अशा पध्दतीची मुलींच्या संदर्भामधील घटना कुठे घडेल हे सांगता येत नाही. कोणाच्या घरामध्ये घडेल. म्हणजे वडील सुध्दा अशा पध्दतीच्या मानसिक विकृतीकडे जातोय, त्यामुळे विश्वास कोणावर ठेवला पाहिजे. खरतर ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्था पोलीस पोलीसांचे काम करतात. खरतर पोलीस आयुक्तालय या शहरामध्ये आले. हे तेवढयासाठी आणलय. मा. मुख्यमंत्री असतील या शहराचे आमचे आमदार असतील. म्हणजे या शहरामध्ये गुन्हेगारी वाढली जातेय. म्हणजे या गुन्हेगारीवर वचक बसला पाहिजे. मला माहिती आहे. काही ठिकाणी पोलीस सुध्दा पोलीस आयुक्तालयाने कारवाई केली. कालच सांगीतलय एका फोनवर पोलीस तुमच्या घरामध्ये येऊन कंम्प्लेंट घेऊ शकतील. अशा पध्दतीची पॉझिटीव्ह मानसिकता आहे, म्हणजे पोलीसांना खरतर पुढच्या काळामध्ये आपण ताकद दयायची गरज आहे. या शहराची गुन्हेगारीकडे जी वाटचाल चालू होती ती थांबविण्याचे काम आपल्याला आयुक्तालयाच्या माध्यमातून पुढच्या काळामध्ये करायचे आहे. खरतर भाऊसाहेब तुम्ही सांगितलं की एखादा प्रोजेक्ट कमी झाला तरी चालेल. खरतर त्याच धर्तीवर आपण याचठिकाणी आयुक्तालयासाठी जागा देतो आपल्याकडे पोलीसांची संख्या अपुरी होती. त्याच्यामध्ये वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करतोय आणि आपल्याला माहिती आहे की गल्लीगल्लीमध्ये, एखादया बिल्डींग बिल्डींगमध्ये पोलीस हे पुरवू शकत नाही. तर आपल्याला पुढच्या काळामध्ये या शहरामध्ये लोकांची मानसिकता बदलण्याच्या दृष्टीकोनातून काम करण्याची गरज आहे लक्षात ठेवा. म्हणजे तुम्ही ज्या पध्दतीने सांगितले की कॉलेजच्या बाहेर जी टारगेट मुलं येतात. मुलींची छेड काढतात. त्या मुलांना एखादया वेळेस पकडून नेले की आपणच आपल्यासारखेच प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी त्यावेळेस सांगतात की साहेब याचा भाचा आहे, याचा पुतण्या आहे. याला आपण पोलीस चौकीमध्ये ठेवू नका. याला आपण त्वरीत सोडून दया. खरतर मी सभागृहाच्या माध्यमातून मा. महापौर आपणाला विनंती करतो बजेटच्या दृष्टीने आपण पुढच्या काळामध्ये पोलीस आयुक्तालयाला फर्निचर किंवा त्याठिकाणी जागा देत असताना पण ज्या पध्दतीने मंगलाताई तुम्ही सांगितलं की त्यांच्याकडे साधनसामग्रीची कमी आहे. तर शासन कधी देईल ते देईल. या सभागृहाच्या

माध्यमातून आपण १०० टक्के मा.महापौर आपण निर्णय करु या की सगळया पोलीस स्टेशनला वाहनांच्या संख्या संदर्भामध्ये असेल, त्यांच्या वॉकीटॉकीच्या संदर्भामध्ये असेल, मार्शलला मिळणा-या टू व्हीलरच्या संदर्भामध्ये असेल या सगळया गोष्टी पुरविण्याची करु परंतु एखादया विषयामध्ये आपण उपसूचना न देता एखादा प्रोजेक्ट होणार नाही अशा संदर्भामध्ये न विचार करता ज्या ज्या गोष्टी भौतिक सुविधा किंवा ज्या ज्या गोष्टी मा. पोलीस आयुक्तालयाला देता येतील त्या देण्यासाठी खरतर या शहरामध्ये, माझ्या भगिनींच्या, माझ्या मुलींच्या संदर्भामधल्या आपण त्यांना संरक्षण देण्याच्या संदर्भामधले अशा पध्दतीचे आदेश देऊन मा. महापौर त्या चिमुरडया मुलीवर जो अत्याचार झालाय. त्याला आपण श्रध्दांजली वाहून ही सभा आपण अर्ध्या तासासाठी तहकूब करावी. अशा पध्दतीची विनंती करतो आणि थांबतो धन्यवाद.

**मा. महापौर -** सर्व नगरसेवक, नगरसेविका याठिकाणी जे अत्यंत दुर्दैवी अशी घटना एचए ग्राऊंडवर घडली, कासारसाईमध्ये घडली. त्या निमित्ताने या शहरामध्ये सर्व माझ्या भगिनी नगरसेविका, माझे सहकारी यांनी अत्यंत दु:खद अशा भावना याठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. हे शहर या शहरातील सर्व नागरीक, निश्चितच माझ्या महिला भगिनी सर्वजण सुरक्षित आणि सुरक्षिततेचे वातावरणामध्ये कसे नांदतील, राहतील अशा पध्दतीच्या उपाययोजना करण्यासाठी म्हणून या विषयाच्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त यांच्या समवेत काही आपण, गटनेते असतील, ज्येष्ठ नगरसेविका असतील, नगरसेवक असतील यांना बरोबर घेऊन लवकरात लवकर त्यांच्याबरोबर आपण मिटींग आयोजित करु. ज्या आपल्या सुचना, आदेश, निर्णय आहेत ते आयुक्तांना सांगून त्याठिकाणी आपलं शहर ही औद्योगिकनगरी कशी सुरक्षित राहील याचा विचार करु या आणि सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन ही सभा आज गुरुवार दि.२७/९/२०१८ रोजी दु. ३.२० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

**( राहुल गुलाब जाधव )**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २२**

**सभावृत्तांत**

**(दि.१९.९.२०१८ (दु.२.०० व ३.०५), दि.२७.९.२०१८ (दु.२.०० वा.) ची तहकूब सभा)**

**दिनांक – २७.९.२०१८** **वेळ – दुपारी ३.२० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२७.९.२०१८ (२.०० वा.) ची तहकूब मा. महापालिका सभा गुरुवार दि.२७.९.२०१८ रोजी दुपारी ३.२० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| **१)** | मा.राहुल गुलाब जाधव | **महापौर** |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | **उपमहापौर** |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा. नितीन ( आप्पा ) प्रताप काळजे | |
| ९) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १०) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |

११) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१२) मा.ऊंडे लक्ष्मण धोंडू

१३) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१४) मा.गायकवाड निर्मला मनोज

१५) मा.सागर बाळासाहेब गवळी

१६) मा.गोफणे अनुराधा देविदास

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.अजित दामोदर गव्हाणे

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे सारिका संतोष

२१) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२२) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) मा.सावळे सिमा रविंद्र

२६) मा.लोंढे नम्रता योगेश

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा.लांडे विक्रांत विलास

२९) मा.गीता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३२) मा.अनुराधा गणपत गोरखे

३३) मा.मंगला अशोक कदम

३४) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३५) मा.अश्विनी भिमा बोबडे

३६) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३७) मा.संजय बबन नेवाळे

३८) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३९) मा.भालेकर प्रविण महादेव

४०) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४१) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४२) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४३) मा.घोलप कमल अनिल

४४) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४५) मा.चिखले सचिन तुकाराम

४६) मा.जावेद रमजान शेख

४७) मा.यादव मीनल विशाल

४८) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४९) मा.प्रमोद कुटे

५०) मा.राजू मिसाळ

५१) मा. शैलजा अविनाश मोरे

५२) मा.बाबर शर्मिला राजू

५३) मा.अमित राजेंद्र गावडे

५४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५५) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५६) मा.ढाके नामदेव जनार्दन

५७) मा.करुणा शेखर चिंचवडे

५८) मा.भोईर सुरेश शिवाजी

५९) मा.अपर्णा निलेश डोके

६०) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६१) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६३) मा.सुलक्षणा राजू धर

६४) मा.शाम गणपतराव लांडे

६५) मा.सुजाता सुनिल पालांडे

६६) मा.कदम निकीता अर्जुन

६७) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६८) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६९) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७०) मा.नढे विनोद जयवंत

७१) मा.पाडाळे निता विलास

७२) मा.काळे उषा दिलीप

७३) मा.कोकणे संतोष अंकुश

७४) मा.पवार मनिषा प्रमोद

७५) मा.बारणे अर्चना तानाजी

७६) मा.अभिषेक गोविंद बारणे

७७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७८) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

७९) मा.निलेश हिरामण बारणे

८०) मा.दर्शले रेखा राजेश

८१) मा.कलाटे राहुल तानाजी

८२) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८३) मा.ममता विनायक गायकवाड

८४) मा.कामठे तुषार गजानन

८५) मा.चोंधे आरती सुरेश

८६) मा.कस्पटे संदिप अरुण

८७) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८८) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८९) मा.सुनिता हेमंत तापकीर

९०) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९१) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९२) मा.कुटे निर्मला संजय

९३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९५) मा.आंगोळकर सागर सुनिल

९६) मा.मुंढे उषा अंकुश

९७) मा.कदम शशिकांत गणपत

९८) मा.लोखंडे चंदा राजू

९९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१००) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०१) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०२) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०३) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०४) मा.संतोष बबन कांबळे

१०५) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०६) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१०९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११०) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा. आष्टीकर – प्र. अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त(२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा. चव्हाण – शहर अभियंता , मा. डॉ. रॉय – आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा. कोळंबे – मुख्य लेखापाल , मा.पाटील, मा. तुपे, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.चितळे, मा.खोराटे, मा. इंदलकर, मा. झगडे - सहा.आयुक्त, मा. लोणकर, मा.राऊत,मा खोत – प्र.सहाय्यक आयुक्त, मा. शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग ), मा. पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा. सवणे, मा.तांबे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा. कांबळे, मा. गट्टूवार, मा. गायकवाड, मा.पाटील,मा. घुबे, मा. पवार - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.विलास मडिगेरी** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आपल्या महापालिकेचे ज्येष्ठ पदाधिकारी आयुबजी पठाण सर या महिन्यामध्ये सेवानिवृत्त होत आहेत. ते दिनांक २४/३/१९८१ रोजी ज्युनियर इंजिनिअर पदावर महापालिकेमध्ये जॉईन झाले. त्यानंतर डेप्यूटी, कार्यकारी अभियंता तसेच जॉईंट सिटी इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी त्यांच्या कार्यकालामध्ये स्थापत्य, पाणीपुरवठा, जल:निसारण, विशेष करुन बांधकाम परमिशन विभागामध्ये त्यांनी खूप वर्षे काम केले आहे. असे एक अतिशय शांत, संयमी स्वभावाचा चांगला अधिकारी म्हणून त्यांची

ओळख आहे, या महापालिकेच्या सेवेत ३७ वर्षे ०५ महिने एवढया मोठया कार्यकालात त्यांनी चांगले कामकाज केले आहे. गेली १०-१२ वर्षे माझी पत्नी नगरसेविका असल्यापासून महापालिकेमध्ये येण्याजाण्याचा संबंध आला. असे फार कमी अधिकारी आहेत की त्या अधिका-यांकडे आम्ही कधीच जोरात आवाजात बोललो नाही. असे फार कमी अधिकारी आहेत त्याच्यामध्ये हे एक चांगले अधिकारी पठाण साहेब आहेत. ज्या विभागात त्यांना कामकाज दिले त्या विभागामध्ये त्यांनी स्वखुशीने दिलेल्या कार्यकाळामध्ये चांगले कामकाज त्यांनी याठिकाणी केले आहे. खर म्हणजे आता सध्या त्यांच्याकडे पाणीपुरवठा, जल:निसारण विभागाची जबाबदारी आहे. महापौर साहेब, आयुक्त साहेब, आपल्याला या माध्यमातून मी याठिकाणी विनंती करु इच्छितो की पाणीपुरवठा आणि या भागामध्ये पुढील काळामध्ये प्रमोशनचे काही डेप्यूटी असतील, एक्झीक्यूटीव्ह असतील ते जॉईंट सिटी इंजिनिअर होतील परंतु पुढच्या काळामध्ये पाणीपुरवठा विभागातून जे सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांची संमती घेऊन जर आवश्यक आपल्याला वाटले तर त्यांना जर मानधनावर आपण घेतले किंवा त्यांना एक कन्सलटंट/सल्लागार म्हणून जर आपण घेतले तर पुढच्या काळामध्ये पाणीपुरवठयाच्या ज्या मोठया अडचणी याठिकाणी शहरामध्ये आहेत. त्या माध्यमातून त्यांचे मोलाचे मार्गदर्शन आपण घेण्याचा प्रयत्न करावा अशा प्रकारची विनंती आहे. एवढया मोठया कार्यकाळात काम करणा-या अधिका-याचा सन्मा. सभागृहाच्या वतीने, महापौरांच्या वतीने त्यांचा सत्कार करुन त्यांना निरोप देण्याचे काम आपण करावे अशा प्रकारची मा. महापौरांना विनंती आहे, धन्यवाद.

**मा. सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह मडिगेरींनी मांडलेल्या विषयाला मी अनुमोदन देतो आणि सभा चालू होण्याच्या आदि मी एका विषयाकडे आर्वजून लक्ष वेधू इच्छितो की आपल्या शहरामध्ये जे थैमान माजलेले आहे आणि या शहरातील सर्व जनता जी भयभीत झालेली आहे ती म्हणजे स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यूच्या आजारामुळे. मा. महापौर साहेब आपण पाहिले की आजपर्यंत २४ पेशंट या स्वाईन फ्लयूने या शहरामध्ये एक्सपायर्ड झालेले आहेत. महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की आता अर्ध्या एक तासामध्ये त्याचा परत एक आकडा वाढला आहे. आता सध्या एक तासामध्ये एक पेशंट एक्सपायर झालेला आहे. शहरातील सर्व हॉस्पिटल्स, रुग्णालये सर्व खचाखच भरलेले आहेत स्वाईन फ्ल्यू आणि

डेंग्यू या आजारामुळे. खरतर ३१ पेशंटवर अतिदक्षता विभागामध्ये  उपचार सुरु आहेत. त्याच्यामधले १० पेशंट मृत्यूशी झुंज देत आहेत आणि एक पेशंट आता एवढयामध्ये गेलेला आहे. सन्मा. महापौर साहेब, शहरामध्ये डेंग्यू असेल, मलेरिया असेल, स्वाईन फ्ल्यू असेल साथीच्या रोगाने हाहाकार माजलेला आहे. याच्याकडे आपण बारकाईने लक्ष देऊन आपल्या महानगरपालिकेच्या तर्फे त्वरीत लवकरात लवकर उपाययोजना लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. महापौर साहेब, या सर्व गोष्टी लक्षात ठेवून याची जनजागृती म्हणा किंवा आज शहरामध्ये अजुन लोकांमध्ये याचा अवेअरनेस कसा वाढविला पाहिजे. याच्याकडे बारकाईने लक्ष दिले गेले पाहिजे महापौर साहेब. मी या सभागृहाच्या वतीने आपणांस विनंती करतो की लवकरात लवकर आपल्या संबंधित विभागाशी चर्चा करुन अतिदक्षता विभागातून सगळया गोष्टी लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम या सभागृहामार्फत करावे, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह प्रथम सचिन चिखले यांच्या विषयाला मी अनुमोदन देतो. याठिकाणी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी सदाशिव खाडे यांची नियुक्ती झालेली आहे. त्यांचेही या सभागृहाच्या वतीने लवकर अभिनंदन करण्यात यावे. कारण ती आपली जुनी संस्था आहे आणि मी त्याठिकाणी तीन वर्षे काम केले असल्या कारणाने खरतर मला अपेक्षित होते पण काही हरकत नाही. तो आपलाच भाग आहे ती संस्था आपलीच आहे. कोणी करणे याच्यापेक्षा सभागृहाने करणे. वाटले तर अनुमोदन एकनाथजी पवार देतील. परंतु हे अत्यंत आवश्यक आहे कारण प्राधिकरण ही व्यावसायिक संस्था आहे आणि आपले अनेक प्रकल्प रकमेअभावी अडकले आहेत. त्याची उत्तम प्रकारे देवाण-घेवाण व्हावी. स्वार्थीमणाने का होईना पण त्यांचा मोठा सत्कार याठिकाणी करावा. त्यांना याठिकाणी सन्मानाने बोलाविण्यात यावे. दुसरी गोष्ट म्हणजे मी अनेक वर्षे या सभागृहामध्ये आहे. परंतु काही कल्पना आपल्याला देखील सुचत नाहीत अनेक वर्षे काम करुन सुध्दा. परंतु राष्ट्रवादीचे नगरसेवक डब्बू आसवानी यांनी स्वयंखर्चाने इको फ्रेंडली गणपतीची संकल्पना राबविली. वर्तमानपत्रातून आपण जागृती करतो. म्हणजे त्यांनी विसर्जनासाठी ८ फूट, ११ फूट, १४ फूट, १६ फूट असे तीन प्रकारचे तळे करुन सत्तावीस लाख त्यांनी स्वखर्चाने इको फ्रेंडली गणपतीचे आणि अतिशय चांगल्या पध्दतीने खरतर पुणे महानगरपालिकेने यासाठी केमिकल दिले. आपल्या

महानगरपालिकेने त्यांचे कौतुक देखील केले. कदाचित आयुक्त पण त्याठिकाणी गेले असतील. परंतु त्याठिकाणी अशा पध्दतीने ख-या अर्थाने सामजिक बांधिलकी ठेवून काम केल्याबद्दल डब्बू आसवानी यांचा देखील अभिनंदनाचा ठराव याठिकाणी सभागृहामध्ये घेण्यात यावा. आणि लवकरात लवकर सदाशिव खाडे यांना या सभागृहामध्ये बोलावून सन्मानाने चांगल्या पध्दतीने त्यांचे स्वागत करावे अशा पध्दतीने मी ठराव मांडतो.

**मा.अजित गव्हाणे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आताच भाऊसाहेब भोईरांनी जो विषय मांडला सदाशिव खाडेंचे अभिनंदन करावे आणि आमच्या डब्बू आसवानींचेही त्याला मी अनुमोदन देतो आणि महापौर साहेब मी याठिकाणी मुद्दाम होऊन उभा राहिलो की विलास मडिगेरींनी जो याठिकाणी पठाण साहेब यांच्या रिटायरमेंट नंतर त्यांचा सत्कार करावा अशी सूचना केली. आयुक्त साहेब आणि महापौर साहेब खर म्हणजे असे फार कमी अधिकारी या महापालिकेत होऊन गेलेले आहेत की ज्यांनी ख-या अर्थाने या महापालिकेत प्रामाणिकपणे सेवा केली. मग ते कुठलेही डिपार्टमेंट असेल म्हणजे १९८१ सालापासून या महापालिकेत पठाणसाहेब काम करतात. अगदी ज्युनियर इंजिनिअर पासून ते जॉईंट सिटी इंजिनिअर पर्यंत त्यांनी काम केले आणि कुठल्याही प्रकारचा आरोप त्यांच्यावर कधी झाला नाही. अतिशय चांगले काम आणि प्रामाणिक काम त्यांनी केले आहे. आयुक्तसाहेब कुठलाही माणूस पठाण साहेबांकडे गेला मग तो सर्वसामान्य असेल किंवा मोठा असेल त्याला इक्वल ट्रीटमेंट देण्याचे काम पठाणसाहेबांनी केलेले आहे. अतिशय चांगली सेवा त्यांनी या महापालिकेत केलेली आहे. खर म्हणजे असे अधिकारी भविष्यामध्ये आपल्या महापालिकेमध्ये अजुन आपल्या शहरामध्येही झाले पाहिजेत आणि पठाण साहेबांचा आदर्श सगळयांकडे निश्चितपणे राहिला पाहिजे. या निमित्ताने मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. आणि पुढच्या काळामध्ये सुध्दा पठाण साहेबांचा उपयोग आपल्या महापालिकेमध्ये करुन घ्यावा अशा प्रकारची इच्छा मी याठिकाणी व्यक्त करतो, धन्यवाद.

**मा.प्रेमकुमार उर्फ बाबू नायर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आताच भाऊसाहेब भोईर यांनी सुचना मांडली की सदाशिव खाडेंचा इथं जाहीररित्या सत्कार होण्याच्या संदर्भात. खरोखर आजच आम्ही सत्कार घेणार होतो. परंतु

प्रदेशाध्याक्षांची मुंबईमध्ये बैठक आहे म्हणून पुढच्या जीबीमध्ये त्यांचा सत्कार आम्ही घेणार आहेत आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अशी एक सूचना आली, आम्हालाही बरे वाटले. पिंपरी चिंचवड महापालिका आणि प्राधिकरणाचा मा.मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली आणि दोन्ही आमदारांच्या मार्गदर्शनाखाली एक चांगल्या पध्दतीने आपण कामकाज करु याच्याबद्दल दुमत नाही. दुसरा महत्वाचा विषय म्हणजे केरळ पूरग्रस्तासांठी इथले सर्व नगरसेवक, कर्मचारी, पदाधिकारी यांनी जे एक महिन्यांचे वेतन दिलेले आहे. तर पुन्हा एकदा सर्व केरळ बांधवाच्या वतीने आणि केरळ राज्यातील सर्व लोकांच्या वतीने मी जाहीर आभार व्यक्त करतो. आपण जी काही पूरग्रस्तांसाठी मदत केली. मी सर्व नगरसेवकांचे, पदाधिका-यांचे मनापासून आभार व्यक्त करतो, धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह खरतर ज्यांना आपण एकतीस तारखेला निरोप देणार आहोत असे आमचे अतिशय चांगले अधिकारी आदरणीय पठाण साहेब रिटायर्ड होत आहेत. खरतर गेली दहा-पंधरा वर्षे त्यांच्याशी आमचा संबंध आला. मला वाटत की चांगला अधिकारी असा असावा. कामाची रुपरेषा कशी असावी. कोणालाही म्हणजे एखादा मोठा माणूस जावो किंवा एखादा गरीबातला गरीब कार्यकर्ता त्यांच्याकडे जावो तरी त्यांनी कधी अशी दुजाभावाची वागणूक कधीही कोणाला दिली नाही. असे चांगले अधिकारी आपल्यातून आज निवृत्त होत आहेत. आमच्या भाऊसाहेबांनी सुध्दा सदाशिव खाडेंचा विषय मांडला. त्याही माध्यमातून आपल्यातून एक असा चांगला कार्यकर्ता प्राधिकरणावर अध्यक्ष झालेला आहे. त्यांचा स्वागताचा ठराव मांडणेत आला आहे त्यालाही अनुमती आहे. आज खरतर डब्बू आसवानी यांनी सुध्दा गणपती विसर्जनाच्या माध्यमातून चांगले काम केले आहे. महापौर थोडेसे लक्ष दयावे. आयुक्त साहेब आपल्यालाही एक गणपतीचा विषय निघाला म्हणून सांगतो. कारण ज्या ज्या ठिकाणी हे गणपती विर्सजन झाले आहे, महापौर आता आपल्याच परिसरामध्ये पहा आपण आज सकाळी दशक्रियेला होतो त्याठिकाणी काय परिस्थिती आहे. त्या परिसरामध्ये अक्षरश: गणपतीच्या मुर्त्या मोशीच्या पलीकडच्या बाजुला कोणीतरी दोनचार ट्रक आणून खाली केलेल्या आहेत. ज्या भावनेने आपण दहा दिवस गणरायाची पूजा-आर्चा केली आज भावभक्तीने त्याची पूजा केली आणि त्याठिकाणी अस्ताव्यस्त विर्सजन झालेले आहे. त्याठिकाणी खूप

अस्ताव्यस्त मुर्त्या पडलेल्या आहेत. तरी साहेब माझी आपल्याला विनंती आहे की मागच्या वेळेस सुध्दा या घटना घडल्या होत्या. त्याविषयी आपण थोडसं लक्ष घालाव. ज्या ज्या घाटावर विर्सजन झालेले आहे त्या विर्सजन घाटावर आपली टीम पाठवून ज्या ज्या मुर्ती पाण्याच्या वर असतील त्या मुर्तींची विल्हेवाट आपण लावावी अशी एक विनंती करतो आणि आदरनीय  आमचे नाना काटे नगरसेवक त्यांनी सुध्दा जवळपास साडेसात हजार मुर्ती त्या फक्त पाण्यात  बुडवून म्हणजे त्याला विर्सजन केले नाही आणि बाजूला ठेवून त्या मुर्ती पुन्हा एकदा ताब्यात घेऊन पुढच्या वर्षी त्या मुर्त्यातून गोरगरीब विदयार्थ्यांना जे काही उत्पन्न होणार आहे ते उत्पन्न गोरगरीब विदयार्थ्यांच्या माध्यमातून करतात असे आमचे आदरनीय नाना काटे यांचेही महानगरपालिकेच्या वतीने स्वागत करतो. आयुक्त साहेब आपल्याला मी विनंती करतो जर पाणीपुरवठयाला असा अधिकारी म्हणजे आता आपण लास्ट मुव्हमेंटला खरतर या शहरामध्ये त्यांनी पाणीपुरवठयाच्या काळामध्ये चांगल्या पध्दतीने काम केलेले आहे. थोडेसे त्यांचे गायडन्स घेऊन कारण उदया परत अधिकारी तिथे बदली होणार आहे. परत पाणीपुरवठा विस्कळीत होणार आहे. त्यांचे गायडन्स घेऊन त्यांची थोडी मदत म्हणून आपल्याकडे त्यांना पाच-सहा महिनेच्या कार्यकाळासाठी जर आपल्याकडे ठेवता आले तर मी ऑन रेकॉर्ड म्हणत नाही, ऑन रेकॉर्ड न ठेवता साहेबांना मला वाटत नाही घरी करमेल. कारण त्यांना गेले अनेक वर्षे कामामध्ये अतिशय व्यस्त असणारा माणूस हा अचानक सेवेतून रिटायर्ड होत असताना त्यांना ते सोडणे तसे शक्य नाही तर त्यांना एक महिना दोन महिने पाणीपुरवठा करीता जर ठेवता आले तर खूप चांगले आहे. त्याबाबत विनंती करतो पुनश्चः एकदा मी पठाण साहेबांना आमच्या राष्ट्रवादी कॉग्रेसच्या वतीने, सर्व नगरसेवकांच्या वतीने शुभेच्छा देतो आणि थांबतो.

**मा.महापौर -** एक अधिकारी कसा असावा. हे पठाण साहेबांकडे पाहिल्यानंतर आपल्याला कळते. गेली ३७ वर्षे आणि ०५ महिने त्यांनी सर्व्हीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये  केलेली आहे. दि.२४/३/१९८१ ला जॉईन झाले तेव्हापासून त्यांनी प्रामाणिकपणे विविध विभागामध्ये काम केलेले आहे. २०१२ ला मी नगरसेवक झाल्यानंतर साहेब जलनि:सारण विभागामध्ये होते. तेव्हा देखील आम्ही नवखे नगरसेवक असलो तरी त्यांनी व्यवस्थितपणे प्रभागांमध्ये देखील चांगले काम केले आहे. आणि आपल्या, माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी सर्व  नगरसेवकांना विश्वासात

घेऊन याठिकाणी काम केलेले आहे. त्यामुळे आज या सभागृहामध्ये त्यांच्या ठरावाचा विषय याठिकाणी मांडणेत आलेला आहे. मी याठिकाणी त्यांचा सत्कार करण्याची तुम्हाला अनुमती देत आहे.

( यानंतर मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभागृह नेता मा. सभापती स्थायी समिती, मा. विरोधी पक्षनेता, सर्व सन्मा. गटनेते व सर्व पदाधिकारी यांनी मा.आयुबखान पठाण साहेबांचा सत्कार केला)

**मा.विलास मडिगेरी -** मा. महापौर साहेब, कै.शांताराम पोटदुखे-माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री, कै.अतुल बाजीराव बालवडकर, कै.लक्ष्मण पंढरीनाथ मानकर, कै.दिलीप भाऊसाहेब मधाळे- निगडी, कै.मच्छिंद्र कोरडे, कै.दिलीप बाबूराव काटे, कै.कांताबाई इंद्रभान जगताप, कै.आनंदीबाई बाळासाहेब पाचारणे, कै.धोंडीबा पांडुरंग सुतार, कै.नंदकुमार त्रिंबक जुन्नरकर-चिंचवड, कै.धनश्री गोपाळ पुणेकर- पिंपरी चिंचवड लिंक रोड यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना आजच्या सभेमध्ये श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा. महापौर साहेब, सुचनेला अनुमोदन देतो.

**मा. महापौर -** श्रध्दांजलीसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

[ सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध्द उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली ]

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर आपल्या महापालिकेचे ब्रीद वाक्य आहे “कटिबध्दा जनहिताय” परंतु त्याप्रमाणे आपल्या महापालिकेकडून, प्रशासनाकडून काम होतेय का, याची पण महापौर साहेब आपण जरा चौकशी करावी. गेली महिनाभर झाले गणपती उत्सव झाला, गौरी झाल्या, आता नवरात्र येईल. चिंचवड गावातला पाणीपुरवठा पुर्णपणे विस्कळीत आहे. तरी त्यादृष्टीने आपण काहीतरी प्रयत्न करावेत. कारण माझ्या प्रभागातल्या महिला या नोकरदार महिला आहेत. त्यांना कामावर जाण्यासाठी पाण्याची पहिली व्यवस्था झाली तर पुढचे सगळे व्यवस्थित होते साहेब. जवळजवळ महिना झाला साहेब आम्ही फालोअप घेत आहोत या गोष्टीचा. पण कुठलीच प्रतिक्रिया नाही, सतत काहीना काही तरी कारणे सांगितली जातात. याच्यावर नक्की काय तो निर्णय व्हावा. मी या पिंपरी

चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिका-यांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करते.

**मा. विनया तापकीर -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर महापौर साहेबांचे आभार मानते त्यांनी मला आता बोलून दिले. मला मगाशीच्या विषयावर चर्चा करायची होती परंतु महापौर साहेब यांनी बोलून दिले नाही, ठीक आहे. आता मी माझ्या प्रभागतले दोन विषय मांडणार आहे. माझ्या प्रभागातला अत्यंत गंभीर स्वरुपाचा विषय आहे. आता माझ्या प्रभागात च-होली गाव ते च-होली फाटा हया रस्त्याचे काम चालू आहे. 20 मीटर डीपीचे. तर अत्यंत संथगतीने काम चालू आहे. काल एक गंभीर असा अपघात तिथे झाला आहे. खणलेल्या खडडयामध्ये आमच्याच नागरीकांची तिथे एक गाडी खड्डयामध्ये खाली खोलवर अशी पडली आणि गंभीर अशी दुखापत त्यांना झालेली आहे. त्यांच्या वाहनाचे ही मोठया प्रमाणामध्ये नुकसान झालेले आहे. त्या ठेकेदाराचा हलगर्जीपणा आणि प्रशासनाचे दुर्लक्ष इथं आमच्या नागरीकांच्या जिवावर बेतलेला आहे. मागील दोन वर्षामध्ये अनेक बळी हया रस्त्याने घेतलेले आहेत. तरी सुध्दा प्रशासन ढिम्म आहे. प्रशासनाचे बिलकूल खरतर अजिबात म्हटंल तरी दुर्लक्ष झालेले आहे अनेक नागरीकांचे अपघात होतात वारंवार प्रशासनाला सुचना देऊनही तिथे दुर्लक्ष केले जातेय. आयुक्त साहेबांनी एकदा व्हिजीट दिली तर फार बर होईल. म्हणजे त्या रस्त्याच्या कामाला गती सुध्दा येईल. महापौर साहेब तुम्ही सुध्दा आवर्जून व्हिजीट करा अशी मी तुम्हाला विनंती करते. आता तुम्ही येथे जे सल्लागार नेमलेत ते कशासाठी नेमलेत इथं प्रश्न उपस्थित होतो. कारण का ते सल्लागार नेमके पैसे खाण्यासाठी आहेत की काम करण्यासाठी आहेत. हयाचं मला अत्यंत वाईट वाटते. कारण कुठलीही सुरक्षाची खबरदारी या ठेकेदारांनी अथवा प्रशासनानी अथवा या सल्लागारांनी घेतलेली नाहीय. तिथे बॅरीकेटस लावले पाहिजे होते. हेडलाईटस लावल्या पाहिजे होत्या. सुचना दिल्या पाहिजे होत्या. बोर्ड लिहिले पाहिजे होते. परंतु काहीही उपाययोजना तिथे या रस्त्यावर केलेल्या दिसल्या नाहीत आणि कधीच केलेल्या नाहीत. असं ढिसाळ पध्दतीचे नियोजन आपल्या प्रशासनाकडून आणि त्या ठेकेदाराकडून होत आहे आणि म्हणूनच आमच्या नागरीकांना आता तिथे रस्त्यावर भिती वाटत आहे. की त्या रस्त्यावर चालावे की नाही. कारण त्यांचे जीव किडामुंगीसारखे झालेले आहेत. मागेपण ड्रेनेजचे काम चालू होते तेव्हा दोन माणसे

मेली. आयुक्तसाहेब त्याच्यावर सुध्दा तुम्ही काहीच केलेले नाही. त्यांचे जीव म्हणजे काय किडा मुंगीसारखे आहेत काय. हयाचा मला खुलासा करावा आणि मी त्या ठेकेदारांच्या ऑफिसला खरतर टाळे ठोकून आलेले आहे. जोपर्यंत आमच्या नागरीकांची सुरक्षाची जबाबदारी प्रशासन आणि ठेकेदार घेत नाहीत तोपर्यंत खरतर मी प्रशासनाचा तीव्र शब्दात निषेध करते. कारण इथे आपण काम करतो ते नागरीकांचा जीव घेण्यासाठी नव्हे. तर नागरीकांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी आहे. परंतु आयुक्त साहेब तुमचे सुध्दा त्या गोष्टीकडे दुर्लक्ष झालेले आहे. गंभीरपणे प्रामुख्याने याचा विचार करावा. खरोखर रस्त्यांवर आता जिथे जिथे कामे चालू आहेत. तिथे खरतर सुरक्षाची खबरदारी घ्यावी आणि नागरीकांचे जीव वाचवावेत हि मी नम्र विनंती करते आणि थांबते.

**मा.महापौर -** डब्बू आसवानी आणि नाना काटे यांनी जे पर्यावरण पूरक गणपती विसर्जीत व्हावेत यासाठी प्रयत्न केलेत त्यासाठी त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्र-१७ दि.१९/०५/२०१८, दि.११/०६/२०१८, दि.२०/०६/२०१८ (दु.१.०० वा.), दि.२२/६/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. राजेंद्र गावडे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २७३ विषय क्रमांक – १
दिनांक - २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.लेखा/१५/कावि/६९६९/२०१८ दि.१३/०६/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९२५
दि.१८/०७/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २५४ दि.६/०९/२०१८

बँक ऑफ बडोदा, पिंपरी चिंचवड विस्तारित शाखा येथे दि.२३/५/२०१८ अखेर आधार निधी खाते क्र.३१०६०२००००००००९ खात्यावर र.रू.१८,१६,०८,३९५/- (अक्षरी र.रू.अठरा कोटी सोळा लाख आठ हजार तीनशे पंच्याण्णव फक्त) शिल्लक आहेत. तसेच मागासवर्गीय कल्याणकारी निधी खाते क्र.३१०६०२००००००१२ मध्ये र.रू.३,२७,५३४५५/- (अक्षरी र.रू.तीन कोटी सत्तावीस लाख त्रेपन्न हजार चारशे पंचावन्न फक्त) शिल्लक आहेत. आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधीमध्ये मागील ३ वर्षामध्ये कुठलाही खर्च झालेला नाही. आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधी बंद करण्यात येईल व उपलब्ध शिल्लक निधी सर्वसाधारण निधीमध्ये वर्ग करण्यात येईल. सदर खात्यांवरील रकमांना FFD सुविधा असल्याने रोजची शिल्लक रक्कम बदलत असते. तरी सदर खात्यामधील रक्कम वर्ग करण्याच्या दिवशी मुदत ठेव, मुदत ठेवीवरील व्याज व जो Effective Balance असेल ती शिल्लक ग्राह्य धरण्यात येऊन शिल्लक सर्वसाधारण निधीकडे वर्ग करण्यात येईल. तरी आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधी ही दोन्ही निधी बंद करून सदर निधीच्या खात्यावरील उपलब्ध शिल्लक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ६ परिशिष्ट ड नियम (३) ३ अन्वये सर्वसाधारण निधीमध्ये जमा करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषय दसरी दाखल करणेत येत आहे.

**मा. अंबरनाथ कांबळे -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. सागर आंगोळकर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आयुक्त साहेब प्रशासनाने हा विषय आणला आहे की मागासवर्गीय कल्याणकारी निधी

हा गेली तीन वर्षे वापरला नाही. मला याठिकाणी विचारणा करायची आहे की हा निधी का वापरला गेला नाही. का आपल्या प्रशासनाचे मागासवर्गीय घटकांकडे दुर्लक्ष तर होत नाहीय ना. इतके दिवस हा विषय स्टँडीगला आम्ही फेटाळलाय आणि आता याठिकाणी पण हा विषय फेटाळला जावा अशी मी विनंती करतो. या संदर्भात माझ्याकडे आणखी एक माहिती आहे की आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असताना राज्य शासनाच्या ज्या योजना आहेत या घरोघरी पोहचवत असताना माता रमाई घरकुल योजनेसह राज्य शासनाची ही योजना आहे ती फक्त आपल्याच पालिकेत राबविली जात नाही. माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही नागरपूरमध्ये असताना ही योजना राबविली गेलेली आहे. आयुक्त साहेब, हया सभागृहामार्फत मी आपल्याला ती योजना सांगू शकतो. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती नवबौध्द घटकातील सर्व घटकांना घरकुल बांधणेसाठी अडीच लाख रुपये घरकूल अनुदान देतेय. ही योजना आपल्या पालिकेत का यूज केली गेली नाही. हया गोष्टीचा मला आपल्याकडून खुलासा हवाय. आज याच प्रकारची योजना २००९ पासून बाकीच्या महापालिकेत चालू आहे. जर आपण सरासरी दरवर्षीचे पन्नास फॉर्म कॅलक्यूलेट केले तर आज ५०० लोक या योजनापासून वंचित आहेत. या योजना न राबविण्यामागे प्रशासन तत्कालीन राज्यकर्ते नागरीकांना माहिती आहे ही योजना आपल्याकडे पोहोचली का गेली नाही. याचा खुलासा आपण आयुक्त म्हणून आज सभागृहापुढे करावा, हि विनंती करतो.

**मा.विकास डोळस -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह हा विषय क्रमांक १ आधारनिधी आणि मागासवर्गीय कल्याणकारी निधी हा जो हेड आहे ते अकाऊंट बंद करुन आज सर्वसाधारण निधीमध्ये वर्ग करुन तो मा.स्थायी समितीमध्ये विषय आला होता. जेव्हा स्थायी समितीसमोर हा विषय आला तेव्हा मला चांगली कल्पना आहे की आपल्या मागासवर्गीय कल्याणकारी योजना आणि हे हेड पुर्णपणे वेगळे आहे. पहिला प्रश्न माझा की हा निधी खर्च का झाला नाही. दुसरा प्रश्न मागासवर्गीयांच्या आणि शोषितांच्या निधीकडे कोणाचा डोळा आहे. सागरने जे विचारले रमाई आवास योजना सर्व महापालिकेत लागू आहे व रमाई आवास योजनेअंतर्गत आपल्या इथ कोणते कोऑर्डीनेटर काम करतात बरोबर आहे ना. माझ्या माहितीप्रमाणे आपल्या इथं कामच करीत नाहीना कोण. हा जो निधी आहे ना या विषयातच माझा प्रश्न आहे. तीन वर्षे झाले हा निधी कसा खर्च झाला नाही. ९५ मध्ये हे हेड निर्माण

केले. चांगल्या कामासाठी हे हेड निर्माण केला होतेना. मग आपल्यावर अशी नामुष्की कशी येते तो बंद करायचा. आपल्याकडे योजना पुरेशा नाहीत का. आता १५ फेब्रुवारीला आपल्याकडे महाराष्ट्र विधानसभेचे जे अनुसूचित जातीची समिती आहे त्यांनी ठराविक प्रश्न विचारले होते. नागरवस्ती विभागाचा या विषयाशी संबंध नाहीय पण योगायोगाने आपण मागासवर्गीय कल्याणकारी योजनांबद्दल बोलणार त्यांचा संबंध येणार. त्यांनी एक प्रश्न विचारला होता की आपल्याकडे मागासवर्गीय कल्याणकारी योजना कोणत्या आहेत. त्याच्यावरती खर्च किती झाला. पाठीमागच्या तीन वर्षाचा खर्च मी तुम्हाला वाचून दाखवितो. २०१४-१५ ला एकूण तरतूद होती तीन कोटी एकवीस लाख खर्च किती झालाय ७१ लाख ८० हजार, सन २०१५-१६ तरतूद पाच कोटी एकोणचाळीस लाख चाळीस हजार खर्च किती झालाय एक कोटी एक्काहत्तर लाख चौदा हजार दोनशे सात, २०१६-१७ तरतूद आठ कोटी खर्च नव्वद लाख त्रेसष्ट हजार पाचशे दहा. प्रशासन काय करतय. झोपा काढण्यासाठी प्रशासन इथ आहे का. जर आपण मागासवर्गीयांचा निधी वर्ग करणार असाल तर पालिकेला भिकेचे डोहाळे लागलेत. आणि तसे लागले असतील तर सभागृहाला जाऊन तुम्ही सांगा की पालिकेला भिकेचे डोहाळे लागलेत. तरी साहेब निधी वर्ग करायला आम्ही कसल्याही प्रकारचा विरोध करणार नाहीत. स्थायीमध्ये विरोध दाखविला होता. तो विषय वेगळया पध्दतीने सभागृहासमोर आला आहे. जर विरोध दाखविला नसता तर आज तो वर्ग करण्यासाठी आला असता. आयुक्त साहेब, नागरवस्ती विभाग हा सामान्यांसाठी आहे. मगाशी भाऊसाहेबांचे भाषण मी ऐकले पहिल्या विषयावरती होते. आपल्या अत्याचारीत मुली आहेत त्यांच्याबद्दल. आपण कोणासाठी काम केले पाहिजे सभागृहामधुन. आपली नैतिक जबाबदारी आहे. की समाजात जो पिडीत आहेत, वंचित आहेत, शोषित आहे. याला कुठेतरी मुख्य प्रवाहात आणण्याचे काम आपण केले पाहिजे ही नैतिक जबाबदारी आपली आहे. ही जबाबदारी आपण विसरलोय. अधिका-यांच्या परफॉर्मन्सच काय आहे आपल्याकडे. म्हणजे इंडयुजव्हल आपण एखादे कामे करतो. त्याची क्वॉलिटी काय आहे. शासन योजना आणते त्याची अंमलबजावणी होत नाही तेव्हा जबाबदार कोणाला धरायचे. बर आपल्याला समजत नसेल तर आपल्या शेजारची महापालिका बघा ना. पुणे महानगरपालिकेच्या योजना बघा. १०० योजना त्यांच्या अशा आहेत की त्या मागासवर्गीयांसाठी आहेत. विधवा महिलांसाठी योजना आहेत, शोषितांसाठी आहेत, वंचितासाठी आहेत. आपल्याला अक्कल नसेल तर त्यांना फॉलो करा ना. का तेवढी

पण अक्कल नाही आपल्याला. मुळात असले विषय यायलाच नाही पाहिजेत. हा विषय दप्तरी दाखल करावा, हि विनंती. मंजुर करुन दप्तरी दाखला करावा.

**मा.मिनल यादव -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब आम्ही नवीन नगरसेवक आहोत आम्हाला थोडीसी माहिती कमी आहे इथल्या सगळया नगरसेवकांपेक्षा. त्याच्यामुळे मला पहिल्यांदा माहिती हवी आहे. हा विषय लेखा विभागातून आलेला आहे बरोबर आहे. तर मला अशी माहिती मिळाली की खर म्हणजे बँक ऑफ बडोदा या खात्यामध्ये दोन ते तीन लाखच अमाऊंट आहे. मग इथं या अजेंडयावर आलेली एवढी मोठी रक्कम आहे ती खरी आहे का खोटी आहे. याचा खुलासा आधी लेखा विभागाने करावा आणि जर ती खोटी असेलतर पुर्ण सभागृहाचा वेळ कशाला वाया घालवायचा. इथं काय सगळे टाईमपासला येतात काय. सगळयांना कामे आहेत प्रभागात. मग असे चुकीचे विषय जर लेखा विभागातून येत असतील तर आधी त्यांच्यावर कारवाई करावी. आणि हा विषय, या अमाऊंटमध्ये जर सत्यता असेल तर गेली तीनएक वर्षे हा जो निधी आहे तो मागासवर्गीयांसाठी वापरला गेला नाही. याची कारणे आम्हाला दयावीत. कारण हा एक मोठा गुन्हाच झालेला आहे. तर मग हा गुन्हा आपण ऍट्रॉसिटी अंतर्गत आयुक्तावर दाखल करायचा का. एवढा निधी जर मागासवर्गीयांसाठी खर्च होत नसेल तर सर्व अधिकारी सगळे काय झोपा काढतायत का. याचा मला पहिल्यांदा लेखा विभागाने खुलासा करावा आणि जर त्याच्यामध्ये सत्यता नसेल तर हा निधी का खर्च झाला नाही. या दोन्हींचा मला आधी खुलासा करावा.

**मा.सुलक्षणा धर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर मागासवर्गीयांच्या बाबतीतील हा विषय आणला आहे. याच्यामध्ये खरच खूप कनफ्यूजन आहे. कारण मी पण माहिती घेतल्यानंतर मलाही अधिका-यांकडून असं कळल की हा नागरवस्ती विभागाचा विषयच नाहीय. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचा जो शिल्लक निधी आहे तो खर्ची पडला नाही. हा विषय नागरवस्तीचा नाही मग हा विषय नेमका कुठल्या विभागाचा आहे. याचे डीटेल्स इनफॉर्मेशन कोणाकडून मिळतील. खरतर इथं आपण लिहील आहे की मागील तीन वर्षामध्ये याचा खर्च झालेला नाही. पण शासनाच्या नियमाप्रमाणे बजेटच्या पाच टक्के खर्च आपल्याला मागासवर्गीय कल्याणकारी योजनासाठी राबवावयाचा असतो. मग आपण हा खर्च

करतच नाहीय का. आपण या नागरवस्ती विभागामार्फत ब-याच योजना राबवतो की ज्या मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी आहेत समाजापासून जो वंचित, शोषित घटक आहे त्यांना लाभ मिळणेसाठी आपण त्या योजना राबवित असतो. तरी त्याच्यामध्ये विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती असेल. पाचवी ते दहावी, बारावीच्या विदयार्थ्यांना, दहावी बारावीच्या विदयार्थ्यांना आहे. त्याच्यानंतर एमबीबीएस, इंजिनिअरींग, एमबीए करणा-या पदवीधारकांनाही आपण त्याच्या माध्यमातून पण निधी देत असतो. मग अशा पध्दतीचा निधी आपल्याकडून खर्च का होत नाही. मग मागासवर्गीय विदयार्थी शिकत नाहीत का. का फक्त महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणा-या विदयार्थ्यांसाठीच अशा प्रकारचा खर्च करायचा आहे याचाही  खुलासा होत नाही. आज बरेचसे मागासवर्गीय विदयार्थी आरटीई अंतर्गत पण प्रायव्हेट स्कुलमध्ये शिक्षण घेतात मग त्यांना या फॅसिलीटी अव्हेलेबल करता येतात की नाही, याचाही खुलासा आम्हाला या विभागाकडून मिळालेला नाही. याची प्रत्येक शाळांमध्ये जर आपण पब्लिसिटी केली तर हा निधी जास्तीत जास्त खर्च केला जाईल. अशा पध्दतीचे निधी खरोखरच जे गरजू घटक आहेत की ज्यांना पुस्तके घेण्यासाठीही पैसे नसतात परंतु त्यांना आरटीई अंतर्गत शिक्षणाचा खर्च मिळतो. परंतु तो खर्च मिळेपर्यंत बराच उशीर झालेला असतो. आणि मग या निधीचा उपयोग देवून त्यांना जर काही पुस्तके किंवा गाईडस वगैरे देता आले तर त्याचा बेनीफीट त्यांना मिळेल. मग अशा पध्दतीने आपल्या अधिका-यांनी हे काम केले पाहिजे. प्रायव्हेट स्कुलमध्ये स्कुल सुरु होण्याच्या आधी मागासवर्गीय पाचवी ते दहावीच्या विदयार्थ्यांना आपण त्यांचा पट घेतला आणि त्यांना ते फॉर्म्स आपण त्या स्कुलमध्ये नेऊन दिले तर त्या पध्दतीचा बेनीफीट त्या विदयार्थ्यांना जास्तीत जास्त देता येईल आणि हा निधी जास्तीत जास्त प्रमाणात आपल्याला खर्च करता येईल. खरतर याच्यामध्ये आणखी हे केलेले आहे की आधारनिधी, मला असं वाटतं की पब्लीसिटी करण्यामध्ये आपण कुठेतरी कमी पडतोय. बाकीच्या ज्या कालबाहय झालेल्या योजना राबविण्यामध्ये आपल्या अधिका-यांना खूप जास्त रस आहे. याच्यामध्ये महिला बाल कल्याणमध्ये तर खूप जास्त इंटरेस्ट आहे. कारण तिथे टेंडर पध्दतीने काम करता येते.  तिथे आपण डायरेक्ट त्यांना बेनिफीट देत असतो. मग त्या योजनामध्ये आपल्या अधिका-यांना किंवा कोणालाही त्याचा फायदा होणार नसल्यामुळे त्यांचा फारसा इंटरेस्ट नाही त्या योजनांची पब्लीसिटी करण्यामध्ये. खरतर आतापर्यंत आपण जेवढया काही योजना राबविल्या, महिला बाल कल्याणच्या असतील

किंवा आणखी ब-याच काही योजना असतील की ज्याच्यामध्ये खरच आयुक्त साहेब आपण म्हणाला होता की अशा काही गोष्टी घेऊ नका की ज्या पब्लीकला नको आहेत. तुम्ही सर्व्हे करा, पब्लीकला नेमके काय हवे आहे त्याच गोष्टीं दया. परंतु आपण तेच तेच वारंवार करीत आलेले आहोत. महिलांना आपण प्रशिक्षण देतो पण इजईट रिअली रिक्वॉयर्ड आताच्या तारखेला ते गरजेचे आहे का. मग देतोय तर खरच तीतक्या दर्जाच आपण देतोत का तेही बघणे खूप गरजेचे आहे आतापर्यंत आपण मागासवर्गींच्या बाबतीत आता विकासभाऊ बोलले की आपण खरच खूप दुर्लक्ष केलेले आहे आणि मलाही असं वाटते की तीनतीन वर्षापर्यंत हा निधी आपण खर्चच करीत नाही. आणि आता आपण विषय आणला की तो वर्ग करावा. आपल्याकडे असे बरेच हेड आहेत की आपण त्याच्यावर खर्चच करीत नाहीत. मग त्या हेडला आपण हात का लावत नाही. मागासवर्गींच्याच निधीला आपण का हात लावणार आणि मग इतर ठिकाणी तुम्ही तसं काही नियोजन केलेले आहे का. का हया निधीच्या माध्यमातून आपण मागासवर्गीयांसाठी काही वेगळे करणार आहोत का. अशा पध्दतीचे आपण काही ठरविले असेल. त्या माध्यमातून आपण तो निधी वर्ग करणार असाल तर तसही सांगावे. कारण काही ठिकाणी परस्पर निधी वर्ग करतात अधिकारी. त्या त्या कमिटीमध्ये असणा-या नगरसेवकांना विश्वासात न घेता पण ब-याचशा गोष्टी, बरचसे निधी कोटीमध्ये अमाऊंट वर्गीकरण होते. पण त्याच्यामध्ये तुम्ही जेव्हा वर्गीकरण करता तर त्याच्यातून आपण पब्लीकला काय देतोय. ते पण वस्तू देता तेव्हा त्या खरच त्यांच्या हिताच्या असतात का. हे पण आपण बघणे गरजेचे आहे. आज खरच या विषयाला आपण सत्ताधा-यांनी विरोध केला त्यांचेही कौतुकच आहे. कारण आपल्याकडे मागासवर्गीय स्टॅण्डींग चेअरमन आहेत आणि त्यांच्या हातून आपण असल काही काम कराव असं अपेक्षित नाही. उलट आपण नियोजनबध्द काम करुन या शहरात जास्तीत जास्त मागासवर्गीयांना या योजनेचा लाभ घेता यावा आणि शासनाच्या बजेटच्या पाच टक्के जो निधी खर्च करायचा असतो त्याचे उल्लंघन होणार नाही. अशा पध्दतीचे नियोजनबध्द काम करावे. मला बोलण्याची संधी दिली याबद्दल आभार मानते, धन्यवाद.

**मा. उषा मुंढे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह कमिशनर साहेब आज जो हा एक नंबरचा विषय आलेला आहे हा मागासवर्गीयांचा विषय आहे.

नागरवस्ती विभागामध्ये चोवीस हजार एवढीच रक्कम शिल्लक आहे. बँक ऑफ बडोदामध्ये आता माझ्या सहका-यांनी सांगितले की एवढी अमाऊंट शिल्लक आहे. तर ती राहिली कशी आणि मागासवर्गीयांचाच निधी शिल्लक राहतो कसा. त्याबाबत तुम्ही खुलासा करावा. ज्या मागासवर्गीय मुलांचे आपण फॉर्म भरतो. त्या फॉर्मसाठी आपण जातीचा दाखला हवा ही अट आपली त्या फॉर्ममध्ये आहे. दुसरी गोष्टी तुम्ही घरकुल दिली त्यावेळेस जातीच्या दाखल्याचा विचार न करता एका तहसिलदाराने दाखला दिला त्यानंतर ती घरकुल तुम्ही मंजुर केली. मग इथं विदयार्थ्यांना निधी देताना का जातीच्या दाखल्याची चौकशी केली गेली. तेवढी चौकशी केली गेली नसती तर एवढा निधी शिल्लक राहिला नसता ना. मागासवर्गीय मुलांच्याबाबतीत विचार करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. आणि तुम्ही त्या मागासवर्गीय कल्याणकारी योजनासाठी अधिकारी हे सक्षम बसवा ना. की जेणेकरुन असा निधी शिल्लक राहणार नाही. कमिशनर साहेब याचा खुलासा करा. नंतर पुढचे विषय घ्या.

**मा. महापौर -** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा.जितेंद्र कोळंबे, [मुख्य लेखापाल] -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह याठिकाणी जो विषय आणला आहे तो विषय असा आहे की आपण हा मागासर्गीय निधी किंवा आधारनिधी हा कुठल्याही प्रकारे बंद करीत नाहीत. आता सध्या दोन बँक अकाऊंट या निधीची आहेत. म्हणजे एक सर्वसाधारण निधीचे बँक अकाऊंट आहे आणि एक आधारनिधी आणि मागासवर्गीयांचे वेगळे बँक अकाऊंट आहे. आपण फक्त त्या बँक अकाऊंटमधील जो निधी आहे तो सर्वसाधारण निधीमध्ये वर्ग करतोय. पण हा होणारा खर्च जो आहे हा संपुर्ण खर्च हा मागासवर्गीय आणि अपंगासाठीच आपण खर्च करणार आहोत. आता सध्या असं झालेले आहे की एकच निधी हा दोन वेगवेगळया बँक अकाऊंटमध्ये ठेवलेला आहे. तरी हया दोन बँक अकाऊंटच आपण एकत्रीकरण करतोय आणि हा जो निधी आहे तो १०० टक्के मागासवर्गीयांसाठीच आणि अपंगासाठीच खर्च करण्यात येईल. एका हेडचे दोन हेड आहेत. त्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी करीत आहोत.

**मा. सिमा सावळे –** मा.महापौर साहेब, तसं विषयामध्ये स्पष्टीकरण का नाही दिले.

**मा. महापौर -** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा. जितेंद्र कोळंबे, [मुख्य लेखापाल] -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह मागासवर्गीय निधीमध्ये आज अखेर दि. २५/०९/२०१८ अखेर ०६,४७,९४,२२६/- रुपये शिल्लक आहेत आणि आधार निधीमध्ये दि. २५/०९/२०१८ अखेर १८,१६,२३,५७९/- रुपये शिल्लक आहेत. हा निधी बंद करीत नाही. हा जो निधी आहे तो सध्या दोन वेगवेगळया बँक अकाऊंटमध्ये आहे. आपण त्याच कामासाठी वापरतो. आता आपण हा निधी दोन अकाऊंटऐवजी फक्त एकाच बँक अकाऊंटमध्ये आणतोय आणि त्याच कामासाठी वापरतोय. म्हणजे होणारा खर्च हा आपण मागासवर्गीयांसाठीच वापरणार आहोत.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह मा. महापौर साहेब, या विषयामध्ये मागासवर्गीय कल्याणकारी निधी आणि आधारनिधी हे दोन्ही निधी महानगरपालिकेच्या फंडामध्ये जमा करणेसाठी हा विषय आहे. महापौर साहेब, हा निधी चांगल्या हेतूने सुरु करण्यात आलेला होता. जे कोणी अधिकारी असतील पदाधिकारी असतील किंवा नगरसेवक असतील त्यांचे मी प्रथम अभिनंदन करतो आणि आभारही मानतो. महापौर साहेब, आधारनिधी मध्ये २५ लाख एवढी शिल्लक आहे आणि मागासवर्गीय योजनामध्ये ५४,०००/- निधी आहे. मी काल बँक ऑफ बडोदामध्ये गेल्यानंतर असे समजले की तो निधी यांनी एफडीमध्ये वर्गीकरण केलेल आहे. याचा पुर्ण खुलासा घ्या कारण यांनी किती टक्क्यांनी हा निधी बँकेमध्ये दिलेला आहे त्याचा खुलासा घ्या. महापौर साहेब, चांगल्या योजना या आपल्या महानगरपालिकेमध्ये यायल्या पाहिजेत. महापौर साहेब, तुमच्या मार्गदर्शनाने या योजना यायला पाहिजेत. अनेक लोकांपर्यंत योजना पोहोचत नाहीत. फक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये आपण चांगले विषय आणतो, चांगले विषय या सभागृहामध्ये चालत असतात. एक वर्षे झाले आज आयुक्त साहेब आपल्या महानगरपालिके मध्ये काम करीत आहेत. पण आयुक्त साहेबांचा अशा चांगल्या योजनामध्ये कसलाच इंटरेस्ट नाहीय. ती म्हण आहे “मांजर दूध डोळे झाकून पिते” त्या पध्दतीने आपल्या या महानगरपालिकेमध्ये अधिकारी असतील त्यांनी कोणत्याही या वर्षात अशा मागासवर्गीय कल्याणकारी योजना तयार केलेल्या नाहीत. महापौर साहेब, हा निधी बंद करण्यापेक्षा नवीन योजना हया निधीतून सुरु करा. गोरगरीबांना शिक्षणासाठी मदत करा, व्यावसायिकांना मदत करा आणि हा निधी बंद न करता हा

निधीचा खर्च आहे त्या खात्यामध्ये ठेवावा. आणि मला जे दोन शब्द बोलायला दिले त्याबद्दल मा. महापौर मी तुमचे आभार मानतो.

**मा. आशा धायगुडे-शेंडगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर आज अत्यंत महत्वाचा विषय आहे तसेच काहींचा त्याला विरोध झाला. परंतु विषय चांगल्या पध्दतीने आलेला आहे. परंतु तुम्ही सगळयांच्या भावनांना मान देऊन आज सभागृहामध्ये चर्चा करुन देत आहात याबद्दल मी तुमचे मनापासून आभार मानते. खरतर महापौर ज्या पध्दतीने महापौरांनी सगळयांना घेऊन बरोबर चालले पाहिजे. त्याच पध्दतीने तुम्ही चालताय. असे प्रकर्षाने आम्हाला जाणवतेय. परंतु सन्मा. महापौर साहेब, जर आपल्याला एवढी मोठी अमाऊंट मागासवर्गीयांची जर का खर्च होत नसेल तर हयाला जबाबदार असणा-या अधिका-याला साहेब, आपण घरी बसविले पाहिजे. सक्तीची रजा त्यांना दिली पाहिजे साहेब. कमिशनर साहेब आपल्या सुध्दा लक्षात आहे यापुर्वी अनेक वेळा पत्रे दिलेली आहेत साहेब की आपल्या सभागृहामधले, आपल्या शहरामधले अनेक डिपार्टमेंट स्थापत्य असेल, जल:निसारण असेल, असे अनेक विभाग आपल्या महानगरपालिकेच्या परिसरामध्ये आहेत. त्या आमच्या नागरीकांशी कुठेना कुठेतरी संबंधित आहेत. परंतु ज्या विभागाशी आमच्या नागरीकांचा थेट संबंध येतो तो विभाग म्हणजे नागरवस्ती विभाग आहे. मग अशा विभागामध्ये तुम्ही अत्यंत असंवेदनशील, असंवेदनशील शब्द आर्वजून वापरतेय. की त्यांना कुठल्याही संवेदना, कसलीही जागृती, त्यांना कसल्याही प्रकारचे नाविन्यपूर्ण काम या शहराच्या नागरीकांसाठी करायचे नाही. मी पुन्हा सांगते की त्याच्याशी नागरीकांशी थेट संबंध असतो. परवाच मला वाटते सत्तारुढ पक्षनेत्यांच्या केबीनला एक शर्मा नावाची व्यक्ती आली होती. ते डोळयाने अंध आहेत त्यांना चालता येत नव्हते. त्यांनी अनेक वेळा आपल्या नागरवस्ती विभागाच्या मॅडमला फोन केला. त्यांना चक्क असं सांगितलं की बाबा मला पुन्हा पुन्हा फोन करायचा नाही. आता पुन्हा जर का फोन केला तर मी फोन रिसीव्ह करणार नाही. वारंवार फोन करुन मला त्रास देऊ नका. शर्मा नावाची व्यक्ती माझ्याच प्रभागातली असल्यामुळे मला माहिती आहे. अशा एक नाही अनेक घटना होत असतील. आज मागासवर्गीयांचा निधी हा खर्च होत नसेल तर याच्यापेक्षा लाजीरवाणी गोष्ट आता आपल्या शहराच्या महानगरपालिकेत कोणतीच नाहीय. आपल्या शहरामध्ये अत्यंत मोठया संख्येने इतर समाजाबरोबर मागासवर्गीय

समाज तितक्याच मोठया संख्येने या शहरामध्ये राहतो. त्यांचे जीवनमान जर का उंचावयचे असेल तर शहराने आणि महापौर तुम्ही सुध्दा प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे. परंतु जर इतक्या असंवेदनशील व्यक्तीकडे कारभार देताय. त्यामुळे तिथे कोणतीही प्रगती अपेक्षीत धरण चुकीच नाही. कोणताही प्रकल्प तिथे होणार नाही. सन्मा. आयुक्तसाहेब त्यांना अनेक वेळा आपण सांगितलंय की हया हया योजना आहेत. आम्हांला सांगताना सांगीतल की मी काहीच नाही, इकडचा निधी तिकडे टाकणार आहे आणि तो निधी बंद करणार आहे. हा विषय नाही साहेब. तुम्ही विषय कसा आणायला पाहिजे होता मग की आपल्याला आधारनिधीमध्ये एवढी रक्कम आहे. मागासवर्गीय खात्यामध्ये एवढी रक्कम आहे. दोन्ही खाती क्लब करुन मागासवर्गीय खात्यावरती आपण एवढी रक्कम एकत्रित करतोय. विषय असा आणला का आमच्याकडे. सभागृहातील कोणत्याही नगरसदस्यांच्या डोळयामध्ये धूळ फेकण्याचा अजिबात प्रयत्न करु नका. आमची पण लोक तितकीच हुशार आहेत. काहीजण मला वाटते की पार बँकेपर्यंत पोहोचलेत. कारण कुठेतरी आम्हालाही आमच्या समाजाबद्दल आमच्या नागरीकांबद्दल आमच्या शहरवासियांच्या बद्दल तितकीच आपुलकी, आत्मीयता आहे. या सभागृहात आम्ही निवडून येतो ते काही फुकट येत नाहीत. आम्ही त्या लोकांच्यासाठी काम करतो. त्यांच्याशी जिव्हाळयाचे आमचे संबंध असतात. तो कोणत्या जातीचा आहे, समाजाचा आहे याच्याशी काही घेण-देण नसतं. परंतु त्याच्यातून मागासवर्गीयांचे जीवनमान उंचावण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्याची जबाबदारी असते आणि म्हणून आम्ही या सभागृहापर्यंत येऊ शकतो. माझ्या प्रभागामध्ये जवळपास ४० टक्के लोक मागासवर्गीय आहेत. मग अशा ठिकाणी तुम्ही योजनेचा असा विषय यायला पाहिजे होता आमच्यासमोर की हयाच्यामधून पैसे आपण वळते करतोय. त्यामुळे हे एकच हेड नाही. तुम्ही सर्वासाधारण निधी असे सांगताय या सभागृहामध्ये. परंतु हा सर्वसाधारण निधी म्हणजे काहीच नाही. इथून पुढे टेंडर काढणेसाठी अकाऊंटमध्ये वळते दाखविणार होता. आणि मला वाटत स्थायी समितीमध्ये आमच्याच नगरसेवकांकडून विरोध करुन तो विषय थांबविला होता. साहेब, मला वाटते की आपल्या इतके महानगरपालिकेचे जितक मोठ बजेट आहे त्या वीस पंचवीस कोटीने आपण काही लहान मोठे होणार नाहीत. तुमच्या माध्यमातून आमच्यापर्यंत विषय असा यायला हवा होता. ही पंचवीस कोटी रक्कम मागासवर्गीयांसाठी साठलेली आहे. त्या रकमेतून आजपर्यंत आपल्याला काही फारसा

उपयोग करता आला नाही. परंतु हया पैश्याचा हया रकमेचा उपयोग हया हया योजनेच्या मार्फत नागरीकांसाठी केला गेला पाहिजे. साहेब, आता अनेकांनी सांगितले की रमाई योजना पुण्याला चालते, आमच्या शहरामध्ये का चालत नाही. अनेकदा रमाई युनिटची, संस्थेची जी लोक आहेत ती आम्हाला येऊन भेटतात. सांगतात की ताई ही योजना पुण्यामध्ये चालते, सगळया शहरामध्ये चालते. सगळया महानगरपालिकेमध्ये ही योजना चालते. परंतु पिंपरी चिंचवड शहर इतकं उदासीन आहे. आज नाही मागे अनेक वर्षापासून रमाई योजना अनेक महानगरपालिकांमध्ये चालते परंतु आपल्याकडे त्याचे इंप्लीमेंट होत नाही. याच्यावरती आपण फोकस का करीत नाही. डेरींग कस करता असा विषय सभागृहामध्ये आणण्याचे. मागासर्गीयांना तुम्ही पायाखाली कुचलणार आहात का. आमच्या अवहेलना करणार आहात का अजून तुम्ही सगळेजण. तुम्ही सरळसरळ सांगायला हवं होतं की हे दोन निधी आम्ही एकत्र करुन एका हेडवर आणतोय. तुम्ही या ठिकाणी खोटं बोलण्याचा अजिबात प्रयत्न करु नका. अठरा कोटी असतील, पंचवीस कोटीची रक्कम होतेय. आमच्या टेंडरसाठी तुम्ही काळजी करु नका. आमच्या टेंडरसाठी भरपूर निधी आमच्या सभागृहामध्ये आहे आमच्या बजेटमध्ये तरतूद आहे. हया पैशावरती, मागासवर्गीयांच्या निधीवरती आम्हाला कुणाला वाईट करु नका समाजामध्ये. आमची बदनामी याठिकाणी करु नका. साहेब याठिकाणी तुम्हाला स्पष्टच सांगते असे विषय आणायचे असतील तर बदल करणार आहात की नाही करणार आहात तेही सांगा आम्हाला. तुम्हाला अनेक वेळा सांगितले आहे की माझ्या प्रभागातून जवळपास हजार ते दिड हजार फॉर्म्स मी नागरवस्ती विभागात सबमीट करते. त्यातल्या पन्नास टक्के लोकांचाच निकाल लागला आहे. मग आम्ही काय इथ टाईम पास करतो का. लोकांना समाधान वाटावं की आम्ही किती भारी काम करतो हे दाखविण्यासाठी आम्ही निश्चित नगरसेवक झालेलो नाहीत. आम्ही काम केल्यानंतर आम्हाला जर रिझल्ट मिळाला तर त्या कामाचे आम्हाला त्याठिकाणी समाधान मिळते. परंतु तशा प्रकारची कोणतीही वागणूक, अत्यंत बेशिस्त, बेलगाम त्यांची जी बोलण्याची पध्दत जी आहे मॅडमची. तुम्ही जर थांबविले नाही तर येत्या आठ पंधरा दिवसाच्या काळात वेगळया प्रकारचे आंदोलनाला तुम्हाला सामोरे जावे लागेल. अनेक वेळा सांगितले की साहेब, त्याठिकाणी संवेदनशील लोक असणे गरजेचे आहे. जे लोकांना कदाचित एखादे काम कमी होऊ दया, जास्त होऊ दया परंतु पहिल्यांदी तुमची भाषा, तुमचा अटीटयूड तुम्ही घरी ठेवून यायच, पालिकेमध्ये काम करीत असताना

तुमचा नागरीकांशी थेट टू थेट संबंध येत असतो. साहेब, मागासवर्गीय लोकांना किती निधी दिला जातो, किती योजना राबविल्या जातात याचा सुध्दा आपण पाठपुरावा केलातर तो आकडा लक्षात येईल. की शहरामध्ये वीस हजार मागासवर्गीय लोक असतील तर आपण दहा हजार लोकांपर्यंत पोहचत नाही. का आमच्या प्रत्येक महिला भगिनींना योजना मिळत नाहीत. काहीच नाही ना विषय. डायरेक्ट सहा हजार रुपये निघणार आहेत. आणि नागरीकांच्या नावावर पडणार आहेत. त्याठिकाणी आमचा किंवा कोणाचा इंटरेस्ट नाहीय. कोणाला काही मिळणार नाही. त्यामुळे त्यावर इंप्लीमेंट करण्याकडे आमच्या अधिका-यांचे दुर्लक्ष आहे हयाचा ठाम निश्चय किंवा ठाम खात्री मला याठिकाणी वाटते. मागील अनेक वर्षे या योजनेवरती काम करते परंतु काही रिझल्ट मिळत नाहीत. किमान आपल्या काळामध्ये त्याच्यावर इंप्लीमेंट करुन लोकांना न्याय देण्याचे काम करणे याठिकाणी गरजेचे आहे म्हणून महापौर साहेब हा विषय दसरी दाखल करणार आहोत. परंतु महापौर साहेब, दसरी दाखल करताना तुम्हाला विनंती करते की यांनी जर का हा विषय सांगितला असता अत्यंत खोटे सभागृहासमोर बोलत आहेत. त्यांनी सरळ सांगायचे होते की दोन हेड एकत्र आणतोय आणि हया हेडवर आणतोय. साहेब, आपण हे पंचवीस कोटी रुपये कोणत्या योजनेअंतर्गत खर्च करु शकतो किंवा महिला बाल कल्याण अंतर्गत चर्चा करुन त्याच्यावर कोणती योजना राबवावयाची त्या पैशांमध्ये याचा निर्णय आपण घेतला पाहिजे. आणि रमाई योजनेचे सुध्दा इंप्लीमेंट आपल्या शहरामध्ये का होत नाही. याबाबत सुध्दा पाठपुरावा करुन निर्णय घेण्यात यावा अशी मी आपल्याला विनंती करते. धन्यवाद, महापौर साहेब.

**मा.नितीन (आप्पा) काळजे -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आज हा मागासवर्गीय कल्याणकारी योजना निधीबाबतीतचा विषय सुरु आहे. मला असं वाटत आयुक्त साहेब, हा निधी कसा राहिला, कुठे वर्ग करायचा व का राहिला. हा विषयच मला असं वाटतं की काही नगरसेवकांना संपुर्ण समजलेला नाही आणि तो विषय आणताना आपण ज्यावेळेस विषय प्रशासन आपल्या सभागृहामध्ये मांडतं आणि नगरसेवक विषय मांडतात. त्या दोन्ही विषयांमध्ये तफावत अशी होते की ज्यावेळेस प्रशासन विषय मांडते. त्यावेळेस त्या विषयाची पुर्ण माहिती न देता तीनचार वाक्यामध्येच विषय हा मांडत असते. आणि त्यामुळे सभागृहाची पण दिशाभूल होते आणि ज्यावेळेस नगरसेवक विषय मांडतो त्यावेळेस त्याला सांगितले जाते की विषय

कसा करायचा आणि जर  एखादे वाक्य राहिले तर प्रशासन म्हणते की नाही तुम्ही हे वाक्य टाकले नाही. त्यामुळे असं करता येणार नाही. मला असं वाटत की आपण कुठलाही विषय मांडत असताना त्याची पुर्ण माहिती आपल्या सभागृहाला दिली गेली पाहिजे. कारण की आजचा हा विषय प्रत्येकाला समजलेला नाही. आज आमचे काही सहकारी नगरसदस्य बँकेत देखील जाऊन आले आहेत. कोण म्हणतं की एफडी केली. कोण म्हणतं की या खात्यावर शिल्लक नाही, आमच्या अंबरनाथ कांबळेंनी सांगितले. मला असं वाटते की सगळयात अगोदर महापौरांना माझी विनंती आहे की हया विषयाची पूर्ण सभागृहाला माहिती दयावी आणि त्या माहितीद्वारे तो निधी नेमका कुठला आहे आणि कुठे वर्ग केला जाणार आहे आणि मूळ विषय त्या विषयावरतीच माहिती दयावी. मगाशी काही अधिका-यांनी माहिती दिली. परंतु ती माहिती देताना सुध्दा विषयाला धरुन माहिती नव्हती असं मला नाही म्हणायचंय, परंतु ते कोणालाही समजलेले नाही. आयुक्त साहेब, मी तुम्हाला अशी विनंती करतो की या विषयी तुम्ही स्वत: योग्य खुलासा करुन या विषयाची माहिती दयावी आणि मला असं वाटते की आता रिवाईज बजेट तुम्हाला करायचे असेल तर त्यावेळेस हा विषय करावा. तोपर्यंत हा विषय दप्तरी दाखल करावा. आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की पहिल्यांदा तुम्ही याचा खुलासा करावा. नगरसदस्यांना तो विषय समजला गेला पाहिजे. अशी विनंती करतो थांबतो.

**मा.सिमा सावळे -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. मगापासून सगळे सदस्य मागणी करतात की संबंधित त्या विभागाचे जे अधिकारी आहेत त्यांचेकडून खुलासा झाला पाहिजे. आपण प्रत्येक विषयाला जर का कमिशनर साहेबांना खुलासा करायला लावला तर मला वाटत की सगळया खात्यांचे एकच अधिकारी होतील. त्यामुळे प्रत्येकाला ज्यांना आपण जी जबाबदारी दिलेली आहे त्यांनी ती जबाबदारी पार पाडावी. खरतर आज स्थायी समितीच्या वतीने मागासवर्गीय निधी हा दप्तरी दाखल करण्याचा आज याठिकाणी जो प्रस्ताव आहे तो महासभेपुढे आलेला आहे, त्यांनी चांगले काम केलय प्रशासनाचा निषेध आणि स्थायी समितीचे अभिनंदन. चांगल काम केल, जागृत नगरसेवक आहेत, सुशिक्षित आहेत,  शिकलेले आहेत आणि शिकलेले असल्यामुळे फरक पडतो. आता मगाशी साहेबांनी सांगितले की एकाच विषयाचे दोन हेड आहेत. पण आपण ज्यावेळेस विषयपत्र देतो ते विषयपत्र आपण

झोपेत तर देत नाहीत ना. विषयपत्र वाचले पाहिजे अधिका-यांचे हे काम आहे. चुका तुम्ही करताय आणि प्रत्येक वेळेला जबाबदार आम्ही कमिशनरांना धरतोय, कारण कमिशनर एचओडी आहेत. मला असं विचारायचंय मा.महापौर साहेब, की या महानगरपालिकेमध्ये सर्वात श्रीमंत महानगरपालिका आशिया खंडातील आहे. याठिकाणी प्रत्येक विभागाला एक विभागप्रमुख दिलेला आहे. त्यांना आपण पाठीशी का घालता, त्यांचे काय काम आहे. त्यांचे काम आहे का की एखादया अधिका-याने त्यांच्या वॉश बेसीनमध्ये हात धुतला म्हणून कमिशनर साहेबांना सांगितले की त्याची खातेनिहाय चौकशी चालू करा आणि कमिशनर साहेब आपण सुध्दा तत्परतेने आदेश काढता. एखादा अधिकारी मॅडमच्या समोर येऊन जर बोलला तर मॅडमने सांगायचे की तू शहाणपणा करु नकोस. तुझ काम नाही मला अक्कल शिकवायच. मग त्यांचा अपमान करण्याचे काम आहे का त्या विभागप्रमुख महिलेच. साहेब, कितीवेळा तुमच्याकडे तक्रारी करायच्या आम्ही. मग तुम्ही आम्हाला समजता काय. कमिशनर आहात तुम्ही. आम्ही सगळया नगरसदस्यांना सांगतो की तुम्हांला जबाबदार धरायच नाही आणि तुम्ही कारवाई करीत नाही. तुम्ही काय समजता नगरसेवकांना, नागरीकांना. नागरीक या शहराचे करदाते आहेत. त्यांना जर का त्या योजनेचा लाभ मिळत नसेल. ते जर का तुम्हाला फोन करीत असतील तर तुम्हाला नुसतं फोन घ्यायला काय हरकत आहे. एखादया अंध व्यक्तीला तुम्ही इतक मुजोरपणे, माजोरेपणे कस सांगू शकता की मला परत तुम्ही फोन करु नका म्हणून. दिसतच नाही साहेब त्यांना, अंध आहेत ते. विषय काय होता की अंध व्यक्तींना आपण मोफत पास देतो आणि त्या व्यक्तीचे ७० ते ७२ वय असेल. त्यांना चालता सुध्दा येत नाही. दवाखान्यात जायच असेल तर माझी पत्नी माझ्याबरोबर कुठेतरी यावी त्यांना दिसत नाही म्हणून. तिचा पास मोफत दयावा एवढीच मागणी. तुमच्या नियमात आहे का हे त्यांना माहिती आहे का, नाही कारण दिसत नाही म्हणून वाचता येत नाही. किती संवेदनशीलपणे तो प्रश्न आपण हाताळला पाहिजे. चुका तुम्ही करणार प्रशासन म्हणून तुमच्या मॅडम करणार आणि हाताळयाची जबाबदारी कुणावर येतेय सत्ताधारी म्हणून आमच्यावर. तर निश्चितपणे आली पाहिजे. जर सत्तेची फळे आम्ही चाखत असूतर त्याची जबाबदारी सुध्दा आमचीच आहे. परंतु तुम्ही जर का मुजोरपणे त्याठिकाणी उत्तरे देत असाल तर तिथे जबाबदार आम्ही कोणाला धरायचे. कारण तुमच्यात तर काही बदल होत नाही. तुम्ही मदत करीतच नाही. तुमच्या डोक्यामध्ये

फीट झालेय की कोणी तरी त्यांना टारगेट करतेय. अहो, कामच करीत नाहीना. मा. महापौर साहेब, आता आमच्या सागरभाऊ आंगाळेकरने विषय केला की रमाई आवास योजनेमध्ये आपण त्याठिकाणी अनुदान देणे लागतो, आहे का आपल्याकडे एक घटना सांगावी. यापूर्वी साहेब, मागच्या २०१२-१७ च्या दरम्यान मी प्रश्नोत्तरे केले होते याच्यामध्ये. यामध्ये या शहरातल्या एका बडया नेत्याने या योजनेमध्ये एका संस्थेच्या नावाखाली या लोकांकडून पैसेही घेतलेत, त्या लोकांना घरेही बांधून दिली नाहीत आणि निधीही कुठे गेला ते आजपर्यंत तपास नाही. का नाही आपण चौकशी लावत. मागासवर्गीय नागरीकांची फसवणूक केली गेलेली आहे. उदया सिमा सावळेच्या नावाखाली कोणी जर कर्ज घेतल असेल, त्या संस्थेच्या नावाने आणि मला तर कर्ज मिळालच नाही आणि यांनीतर फसवूणक केली असे एक नाही, दोन नाही किमान पन्नास शंभर लोकांची फसवणूक झालेली आहे त्याठिकाणी. आपण काय केले, आपण कुठली चौकशी नाही लावलीत. माहिती तरी आहे का आपल्या डिपार्टमेंटचा तो विषय आहे. मग घशापर्यंत आले की मग योजनाच बंद करा. तुमचं कसं झालेय तुम्ही इलाजापेक्षा तुमचा कायदा एवढा भयंकर झाला की तो मांडीपासून पायच कापुन टाकला. पण त्यामध्ये दुरुस्ती आणा चौकशी लावा. कोणी निधी घेतलाय, कसा घेतलाय, कसा लाटला, भ्रष्टाचार झाला का, त्यांना घरे दिली नाहीत का. त्या नेत्यावरती कारवाई करा त्या संस्थेवरती कारवाई करा. पण काहीच करीत नाहीत ना. सरळ सरळ आपण ती योजनाच बंद केली. मा. आयुक्त साहेब, या योजनेचा संपूर्ण आढावा मी घेतला चेअरमन झाल्यानंतर. या योजनेमध्ये जो भरघोस निधी आला होता तो अनुशेष भरुन काढा ना. पण मी स्टँडीग चेअरमन असताना भरुन काढला आणि खुशाल साहेब तुम्ही एकत्रित करुन तुम्ही त्यात टेंडर काढताय. तुम्ही सांगताय, तुम्ही खोटं बोललात आता सभागृहामध्ये आम्ही तुमच्याच विभागाकडून माहिती घेतली. त्यांनी सांगितले की नाहीतरी ताई हा निधी पडूनच आहे. मग काय करायच. मग आम्ही टेंडर काढणार, तुम्हाला कुठलाच निधी सापडला नाही. मागासवर्गीयांचा निधी सापडला. तुम्हाला हाच निधी सापडलाय आणि ऐका ऐकायची तयारी ठेवा. पहीली तुम्ही चुक मान्य करायला पाहिजे की हो शब्दरचना चुकलीय. मग हे काय आणलय. आम्हाला सगळयांना तुम्ही वेडयातच काढताय. योग्य नाही तुमचे असं वागणं. आणि साहेब अनेक निधी तुमच्याकडे पडून असताना तुम्हाला मागासवर्गीयांच्या निधीला हात लावण्याचा अधिकार नाही. याच्यासाठी आम्ही खूप कष्ट घेतलेले आहेत. आम्ही खूप

कष्ट घेतलेले आहेत. एका हेडसाठी दोन अकाऊंटस असतील तर मग इथ शब्दरचना काय यायला पाहिजे होती. ती आलेली नाही आणि म्हणून तुम्ही संभ्रम निर्माण केला आहे. म्हणजे संभ्रम तुम्ही निर्माण करायचा आणि हे शब्द असतीलतर लोकांचे जोडे आम्ही खायचे का. तुम्ही का अभ्यास करुन तो विषय आणत नाहीत. तुमचं काम होतं ना अभ्यास करुन तो विषय आणायचा. तुमची एक शब्दरचना आमचं करीअर बरबाद करतेय. तुम्हाला कळल पाहिजे आपण काय विषय आणतो तो. मा. आयुक्त साहेब, मा. महापौर यापुर्वी काय होते याचा सुध्दा याच्यामध्ये आढावा घेतला पाहिजे. या सगळया निधीमध्ये मा.महापौर साहेब, मागासवर्गीय विदयार्थ्यांना पुस्तके देण्याचा, एमपीएससी, युपीएससीसाठी त्यांनी क्लास लावले असतील त्या क्लासची टयूशन फी देण्याचा आपण निर्णय केलेला आहे कमिशनर साहेब. किती विदयार्थ्यांना आतापर्यंत टयूशन फी दिली. बोलवा बर त्या मॅडमला. एमपीएससी, युपीएससीचे आपल्याकडे केंद्र आहेत. तुम्ही यासाठी जाहीरात तरी दिली आहे का यांच्यासाठी. तुम्ही फॉर्म तरी छापलेत का. काहीच करत नाहीत ना साहेब. आयएएस, आयपीएस, युपीएससीसाठी, स्पर्धा परिक्षेसाठी जे मागासवर्गीय विदयार्थी बसतील त्यांना हा निधी दयावा. त्यांची टयूशन फी दयावी. त्यांना पुस्तके दयावेत. म्हणून त्यांच्यासाठी हया योजना आणल्या होत्या आणि त्यांच्यासाठी हा निधी आहे यांनी जरी प्रायव्हेट क्लास लावला तरी त्यांना हा निधी दयावा. टयुशन फीची जी रक्कम आहे ती पन्नास टक्के का होईना ती रक्कम दयावी आणि ती रक्कम क्लासच्या नावाने दयावी. म्हणून त्या योजनेसाठी आपण तरतूद केली होती. काय केले साहेब आपण इथं. नावीन्य पुर्णतर काही येत नाही, तुमच्या अटीटयूडने माणसे येत नाहीत. मगाशी महिला बाल कल्याणचा विषय होता. आमच्या उषा मुंढे ताई आहेत या समितीमध्ये त्या गेल्या कित्येक दिवस झाल पाठपुरावा करतात, तुमच्या त्या मॅडमचा. त्याठिकाणी महिलांना, मुलीना पाचवीपासून मुलीनां तुम्ही तिथे ज्युडो कराटे शिकविण्याचे प्रशिक्षण देण्याच्या त्याठिकाणी योजना करा. त्यांनी विषय ठेवायचा म्हटंलतर त्या म्हणाल्या नाही नाही तुम्ही नाही विषय ठेवायचा, कमिशनरनी ठेवला तरच मी विषय करेन, काय संबंध. जर मला वाटत असेल माझ्या शहरातील मुलगी, माझी मुलगी, या शहरामध्ये राहणारी मुलगी सुरक्षित रहावी, तिला तिचे एक फायटर जे स्पिरीट आहे ते जीवंत रहावे. तिच्यासमोर कोण छेड काढायला आले तर तिने दोन थोबाडीत मारल्या पाहिजेत. ते जर तिचे स्पिरीट असेल तर कमिशनर तुम्हीच का विषय ठेवायचा. ठेवायचा तर तुम्हाला का कळल

नाही. मार्च महिना संपेपर्यंत तुमच्याकडून विषय का आला नाही विषयपत्रीकेवरती. इथं एखादी नगरसेविका संवेदनशीलपणे एखादा विषय मांडत असेल तर का विषय ठेवू देत नाहीत. साहेब, आशाताईंनी मगाशी तुम्हाला सांगितले, जर त्यांचा अटीटयूड बदलला नाही तर तुम्ही त्यांना विभागातून बदला. तुम्ही एलबीटीत आहेत एलबीटीत बसवा त्यांना. त्या खूप कार्यक्षम आहेत ती कार्यक्षमता तिकडे दाखवा. तिथे कोणतरी गोड बोलणारा, ऐकून घेणारा, फोन घेणारा, तिथे कुष्ठरोगी आलेत म्हणून एका क्लार्कने त्या कुष्ठरोग्याला सेकहँड केला आणि त्याच्या त्या हाताच्या जखमेच लागल असेल त्या क्लार्कला आणि त्यांनी फक्त तुमच्या मॅडमच्या वॉश बेसीनमध्ये हात धुतले असतीलतर आणि तुम्ही सांगता हयाच्यावर कायदेशीर कारवाई करा. रिटायरमेंटला एक वर्ष राहिल्यानंतर अधिका-यांच्या सांगण्यावरुन त्या क्लार्कवर कारवाई करीत असाल तुम्ही किती असंवेदनशील आहात. कशाला पाहिजे तुम्हाला. तुम्ही जर चांदीचा चमचा, सोन्याचा चमचा तोंडात घेवून जन्माला आला असालना तर राजीनामा दया आणि घरी बसा. आमचे काही म्हणणे नाही साहेब. परंतु तुम्ही त्याठिकाणी आल्यानंतर तुमची जी भाषा उर्मटपणाची आहे ती भाषा तुमची बंद झाली पाहिजे. नाही झाली तर आम्हाला बंद करता येईल. दोनदा तीनदा आम्ही तुम्हाला गोडीमध्ये सांगत आहोत. तिथे बसून जे काही चाललेले असतं ना मनमानी कारभार तो थांबवा. मागासवर्गीय निधीबाबतचे मा. महापौर साहेब पुढच्या जीबीला माझे प्रश्नोत्तरे असणार आहेत. मागासवर्गीय निधीचे फॉर्म कधी छापलेत. विदयार्थ्यांना किती पुस्तके दिलेत. काय काय माहिती पाहिजे ती मी आजच सांगतेय. पुढच्या जीबीला फॉर्म आलेत किती छापलेत किती, किती निधी दिला काय काय केलेत. याच्याबद्दल त्यांनी त्यांचे बाढबिस्तार तयार ठेवायचे आहे साहेब. अभ्यास त्यांनी तयार ठेवायचा आहे. कमिशनर साहेब तुम्ही चांगले अधिकारी म्हणून आम्ही तुमची नेहमी पाठराखण करतो. बोलण्यास आम्हाला मजबूर करु नका. काय होत की आता महापौर साहेब सांगत होते कमिशनर साहेब यांनी खुलासा करावा. ज्यांना ज्यांना जे जे अधिकार दिलेले आहेत त्या त्या विभागप्रमुखानी त्यांनी त्यांची जबाबदारी निभावलीच पाहिजे. आणि ते निभवत नसतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. एक वर्षे रिटायरमेंट राहिलेल्या व्यक्तीला तुम्ही नोटीस काढता, तुम्ही काय खुलासा घेतला, काय बघितलत तुम्ही, आम्हाला माहिती आहे. त्याठिकाणी अनिल कु-हाडे म्हणून आहेत. आख्या सभागृहाचे नगरसेवक सांगतील. काही झाले तरी ते आमचा पीकपॉईंट होता तो अनिल कुऱ्हाडे. आम्ही त्याला फोन करतोत, आरे

योजनांचे काय झाले, फॉर्म आलेत का, आमची यादी व्हॉटसअप करते बघबर किती लोक पात्र झालेत हे आम्ही सांगीतल्यानंतर ते संगळ बघायचा. तो सुध्दा तुमच्या जाचाला कंटाळून निघुन गेला. आता जो तिथे आमचा क्लार्क राहीलेला आहे तुम्ही त्याच्याही मागे लागलात, पार बारा वाजवायचेच ठरवलेत तुम्ही आमचे. आणि सत्ताधारी म्हणून आमची पण जबाबदारी आहे ना. आम्ही इथ आहोत ना साहेब. आम्हाला आमची जबाबदारी पार पाडू दया ना. प्रशासन एक भाग आहे. सत्ताधारी म्हणून आम्हाला पण आमची जबाबदारी पार पाडायची आहे आणि मागासवर्गीय निधी खर्च होत नाही म्हणून तुम्ही क्लब करुन तुम्ही अकाऊंट क्लब का करताय. मग विषय तसा यायला पाहिजे होता. परंतु तसा विषय आलेला नाही. आणि म्हणून याठिकाणी विषय दप्तरी दाखल करावा. यापुढे मा. महापौर साहेब पुढच्या जीबीमध्ये मात्र निश्चितपणे आपण या सगळया प्रश्नांची उत्तरे घेऊन संबंधित विभागाला कडक निर्देश दयावेत आणि मागासवर्गीयांची संख्या म्हणजे आता आपल्या सगळयांच्या लक्षात आलं पाहिजे की तीन मतदार संघ आहेत आपल्या इथं चिंचवड, पिंपरी आणि भोसरी. त्यामध्ये एक मतदार संघ राखीव आहे. म्हणजे संख्या किती मोठया प्रमाणात आहे. आणि त्यांचे आपण उत्तराई होण्याचे उपकार नाही करत. कायदयामध्ये तरतूद आहे आणि म्हणून ती आपण कायदयाची अंमलबजावणी करण्याचे काम याठिकाणी आपल्याला करावे लागणार आहे. नव्हे तर जबाबदारीने करावे लागणार आहे महापौर साहेब. आणि म्हणून याठिकाणी अशा प्रकारचे विषय आणताना प्रशासनाने दहा वेळा विचार केला पाहिजे आणि हा सगळा निधी कुठे, कसा खर्च झाला कसे फॉर्म्स छापलेत त्याला काय रिसपॉन्स मिळाला. याची सगळी उत्तरे घेवून पुढच्या जीबीमध्ये यावेत. मा. महापौर साहेब, एवढेच बोलते आपण बोलण्यास संधी दिली त्याबद्दल आपले मनापासून आभार, थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.माधवी राजापुरे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९१६ दि.१८/०७/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २५६ दि.६/०९/२०१८

पिंपरी चिंचवड मनपा मा.महापालिका सभा ठराव क्र.९१० दि.२३/०८/२०१६ अन्वये पिं.चिं.मनपाच्या वतीने पी.एम.पी.एम.एल. ६०:४० या तत्वानुसार घेण्यात येणा-या १५५० बसेस पैकी ५५० वातानुकूलित बसेस ए.एस.आर.टी.यु. या केंद्र शासनाच्या अंगिकृत संस्थेकडून घेण्यास, १०० बसेस पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ६०:४० या तत्वानुसार खरेदी करण्यास व उर्वरित ९०० बसेस मार्केट फायनान्स मेकॅनिझम या प्रमाणे महामंडळाच्या ठरावाप्रमाणे गठीत ४ सदस्य समितीने ठरविलेल्या स्पेसिफिकेशन व सेवास्तर कराराप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे. आज रोजी पी.एम.पी.एम.एल. कडून फक्त २०० बसेस खरेदी झाल्याचे समजते. सुमारे दोन वर्षापुर्वी मान्यता देवून सुध्दा पी.एम.पी.एम.एल. कडून बसेस खरेदीस अत्यंत विलंब होत आहे परिणामी शहरातील सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे पी.एम.पी.एम.एल. च्या मागणीनुसार व स्पेसिफिकेशन नुसार लेखा विभागाकडील बसेस खरेदी या तरतूदीमधून बसेस मनपा मार्फत खरेदी करून पी.एम.पी.एम.एल. ला उपलब्ध करून देणे बाबतचा विषय धोरणात्मक बाब म्हणून मान्यता देणेत यावी.

**मा. सिमा चौगुले -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळेस करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - २७४ विषय क्रमांक – २
दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९१६ दि.१८/०७/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २५६ दि.६/०९/२०१८

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – २७५ विषय क्रमांक – ३
दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/मुका/कावि/५७/२०१८ दि.२४/०७/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३०४४ दि.१४/०८/२०१८

'भारत सरकार च्या नविन व नवीकरण उर्जा' (MNRE) विभागाकडून सौर उर्जा उत्पादितांची 'सोलर एनर्जी कॉर्पोरेशन इंडिया' SECI स्थापन करून विविध राज्यांमध्ये अशा उत्पादित कंपन्यांचे एमपॅनेल (EMPANEL) तयार केलेले आहे. केंद्र शासनाने ज्या महानगरपालिकेचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश केलेला आहे अशा

महानगरपालिकांनी सौर उर्जा प्रकल्पाकरीता रेस्को तत्वावर (RESCO) सौर उर्जा प्रकल्प बसविणेचे काम मंजूर केलेल्या एमपॅनेल मधील कंपनीकड्न करवून घेणेकरीता सुचित केले आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटी अंतर्गत नियुक्त केलेल्या समिती व सल्लागार मे.केपीएमजी यांनी दि.२ मे २०१८ रोजी सेकीच्या एमपॅनेल वरील मे. क्लीनमॅक्स, थिंक एनर्जी पार्टनर, फोर्थ पार्टनर एजन्सी अश्या एकुण ५ एजन्सीस बोलावणेत आले त्यापैकी ३ एजन्सीने प्रकल्पाचे सादरीकरण केले आहे.सदर सादरीकरणातून निवड समितीने नियुक्ती केलेल्या एजन्सीस मे. क्लीनमॅक्स यांचेबरोबर पॉवर परचेस एग्रीमंटस् (PPA) करण्यास पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड (PCSCL) ने कळविले आहे. सदर पॉवर परचेस एग्रीमेन्टस् (PPA) मध्ये नमूद केलेनुसार सदर प्रकल्पा अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील य़शवंतराव चव्हाण हॉस्पिटल (YCM) व जलशुध्दीकरण केंद्र से.२३ (WTP) येथील सौर उर्जा निर्मिती करणेकरीता इमारतींच्या छतावर जागेच्या उपलब्धतेनुसार अंदाजे YCM करीता १४७ KW व WTP करीता ३१२ KW एकूण ४५९ कि.वॅ. इतकी सौर उर्जा निर्माण होणार आहे. सदर प्रकल्पाकरीता YCM व WTP ह्या इमारतींचे छत/टाकी (Sump) पुढील 25 वर्षे वापराकरीता संबंधित एजन्सीस वापरावयास द्यावयाचे आहे. सदर निर्माण होणारी वीज सेकीने मंजूर केलेल्या र.रू.३.६२ प्रती युनिट या दराने २५ वर्षाकरीता मनपास घेणे त्याच इमारतीमध्ये वापरणे बंधनकारक आहे. त्यानुसार सदर काम पुर्ण झालेनंतर प्रत्यक्ष निर्माण होणा-या वीज प्रमाणे र.रू.३.६२ या दराने २५ वर्षा करीता मनपा मार्फत संबंधित एजन्सीस बील अदा करावे लागणार आहे. सदर कामाचा करारनामा (पॉवर परचेस एग्रीमंटस् ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्मार्ट सिटी लिमिटेड व मे.क्लीन मॅक्स यांचेशी करणेत आलेला आहे. सदर प्रकल्पातून निर्माण होणारी सौर उर्जा पिंपरी चिंचवड महानगरपालिका वापरणार असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्मार्ट सिटी लिमिटेड (PCSCL) व मे.क्लीन मॅक्स यांचेशी सेकीने मंजूर केलेल्या दराने र.रू.३.६२ प्रती युनिट या प्रमाणे २५ वर्षाकरीता करण्यात आलेले पॉवर परचेस एग्रीमेंटस् (PPA) माहितीचे अवलोकन केले.

**मा. उषा मुंढे -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.अजित गव्हाणे** - मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह याठिकाणी हा जो सोलरपासून वीज निर्मिती करण्याचा विषय आपण सभागृहासमोर आणलेला

आहे. स्मार्ट सिटीच्या अंतर्गत ही जी शहरे आहेत त्या शहरांना त्या त्या महापालिकेत केंद्र सरकारने बंधनकारक केले आणि सगळया राज्यामध्ये अशा प्रकारची वीज निर्मिती शासन करु इच्छिते. याच्यामध्ये काही गोष्टींचा खुलासा आम्हाला अपेक्षित आहे. आपण रुपये ३.६२ प्रती युनिट दराने वीज घेणार आहोत आणि आपल्याकडे वायसीएमएच आणि डब्ल्यूटीपी याठिकाणी १४७ किलोवॅट आणि ३१२ किलोवॅट एवढी वीज आपल्याला लागते असे या विषयामध्ये म्हटलेले आहे. तर मला या निमित्ताने आपल्याला हे विचरायचे होते की आपल्या शहरामध्ये आपण जी आता वीज खरेदी करतोय ती कुठल्या दराने करतोय आणि अशा पध्दतीने जर आयुक्त साहेब, महापौर साहेब खरच आपल्याला रुपये ३.६२ या दराने खरोखर आपल्याला फायदा होणार असेल तर पुढच्या काळामध्ये आपण महापालिकेच्या वतीने अशा प्रकारची स्वत: वीज निर्माण केली पाहिजे. आणि आपल्या शहरामध्ये अशा पध्दतीची आपल्याला निश्चितपणे याच्यातून फायदा होऊ शकतो असं दिसतय. आणि दुसरी गोष्ट ह्याच्यामध्ये आपण पंचवीस वर्षे वायसीएमएचची जागा त्यांना वापरायला देतोय. वायसीएमचे छत आणि डब्ल्यूटीपीची जागा त्यांना देतोय. याठिकाणी आपण पंचवीस वर्षामध्ये कुठल्याही प्रकारचे एक्सटेंशन करणार नाही का. जर वायसीएममध्ये पुढच्या पंचवीस वर्षामध्ये काही रिन्यूएशन करण्याची वेळ आली तर मजले वाढवावयाची वेळ आली तर मग अशा परिस्थितीमध्ये नेमकी आपली काय भूमिका असणार आहे. तसेच डब्ल्यूटीपी आज ज्याठिकाणी आपले आहे, आता बदलत्या काळाप्रमाणे तंत्रज्ञान बदलत आहे. त्या डब्ल्यूटीपी च्या ठिकाणी जर आपल्याला आणखी काय करायची वेळ आली तर ही जागा आपल्याला पंचवीस वर्षे त्या संस्थेला देणे बंधनकारक आहे. दुसरी गोष्ट रुपये ३.६२ हा दर आता निश्चित केला आहे, याच्यामध्ये पुन्हा काही वाढ होणार आहे का. कारण इथं तसं काही दिसत नाही. वाढ होणार आहे की नाही असं काही दिसत नाही. परंतु त्याचाही खुलासा सभागृहापुढे झाला पाहिजे. अशा प्रकारची अपेक्षा या निमित्ताने माझी आपल्याकडे आहे.

**मा. पंकज भालेकर -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह महापौर साहेब मी आता आपणांस याठिकाणी विनंती करु इच्छितो की या विषयाला अनुसरुन मी आपल्या शहरामध्ये नागरीकांना होणा-या विदयुत पुरवठा विषयक सांगू इच्छितो की खरतर आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातून याठिकाणी शहरामध्ये संपुर्ण

केबलसाठी एमएसईबीचा विषय आपण निश्चितच याठिकाणी आणला पाहिजे. कारण का की गेली बरेच दिवस आपल्याकडे महापालिकेने ओव्हर हेड टू अंडरग्राऊंडची योजना महानगरपालिकेनी सुरु केली. नंतर ती एमएसईबीकडे वर्ग करणेत आली. त्यानंतर अशा काही अंडरग्राऊंड लाईट त्याठिकाणी झालेल्या आहेत त्या सगळया डक्ट नसल्यामुळे आज याठिकाणी आपल्या नागरीकांना वीजेच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. हे कधी कधी बारा तास तर कधी चोवीस तास फॉल्ट न सापडल्यामुळे त्याठिकाणी आपल्या शहरात नागरीकांना निश्चित महापौर साहेब आपण स्मार्टसिटीकडे वाटचाल करीत आहोत. पण या स्मार्ट सिटीकडे वाटचाल करीत असताना हयाच्यामध्ये डक्टची व्यवस्था करणेत यावी. असे मी याठिकाणी महापौरांना आणि आयुक्तांना सुचित करतो. डक्टीन आपल्या संपूर्ण शहरात झाले पाहिजेत. की जेणेकरुन त्या डक्टमुळे आपल्याला येणा-या विदयुतपुरवठा खंडीत होण्याच्या समस्यांना सामोरे जाण्यास अडचणी येणार नाहीत. आणि मला याठिकाणी सांगायचं की एमएसईबीची अंडर ग्राऊंड सिस्टीम महापालिकेकडून नंतर ती शासनाकडे गेली. शासनाच्या माध्यमातून परत एमएसईबीमार्फत राबविण्यात येईल. आणि त्यानंतर ६० ते ७० टक्के भाग आपला हा अंडर ग्राऊंड राहिलेला गेली दिड दोन वर्षात न झाल्यामुळे आपल्या महानगरपालिकेने त्या संदर्भातील माहिती घेऊन, कारण की नागरीक आपले आहेत. या नागरीकांना सुविधा देण्याचे काम ही आपले आहे. त्यामुळे आपल्या महानगरपालिकेकडून विलंब व्हायला नको. राहिलेले काम आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आले तर ते निश्चित करावे एवढी मी याठिकाणी सूचना करतो. मला बोलण्याची संधी दिली याबद्दल मी महापौरांचे आभार मानतो, धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आता हा जो विषय आहे सौर उर्जा प्रकल्प याचे मला जास्त काही नॉलेज नाही परंतु थोडेफार आम्ही पण सौर उर्जा पॅनेल बसविलेले आहेत. आयुक्त साहेब, आपण आता ३०० किलो वॅट, १४७ किलोवॅट यासाठी डब्ल्यूटीपीची आणि वायसीएमची जागा देणार. साधारणपणे एक किलोवॅट उर्जा निर्माण करायला चाळीस रुपये खर्च येतो. समजा तीनशे किलोवॅट उर्जा आपण निर्माण केली तर एक कोटी वीस लाख रुपये खर्च येईल. आपण आपली जागा आपल्या बाकीच्या गोष्टी त्यांना युटीलाईज करायला देणार. वायसीएमएचचे टेरेस त्यांना बावीस-पंचवीस वर्षे देणार आपण त्यांना ते टेरेस वापरायला देणार आहेत. आज

आपण रुपये ३.६२ पैशांनी त्यांचेकडून वीज घेणार. हा सगळा जर विचार केला तर साधारणपणे पंचवीस वर्षामध्ये १० महिन्याचा हिशोब जरी केला तरी बेचाळीस लाख इतकी बचत होते. तीन वर्षात संबंधित व्यक्ती प्रोजेक्ट करणारे पस्तीस महिन्याच्या आतमध्ये ते पैसे वसुल होतील. जर आपल्याकडे इनफ्रास्ट्रकचर आहे, पैसे आहेत. सगळया गोष्टी ऍव्हॅलेबल असताना आपल्याला त्यांच्याकडून रुपये ३.६२ पैशांनी वीज न घेता आपण जर आपल्या पैशांनी एक कोटी वीस लाख रुपये जर ३०० किलोवॅटला खर्च केला, १४७ किलो वॅटला केला तर आपण ५८ लाख रुपये खर्च केला तर पंचवीस वर्षे आणि आपल्याकडे असे बरेचसे टेरेस आहेत. आता ही बिल्डींग आहे. मेन बिल्डींगच्या टेरेसमधे जर आपण असं प्रत्येक ठिकाणी जर केलं आणि जर वीज आपण एमएसईबीला दिली. एमएसईबी त्या बदल्यात आपल्याला आपली वीज देणार आहे आणि जे युनिट आपण त्यांना देणार आहे तेवढे मायनस होऊन बाकीचे बील येणार आहे. आज आपल्या महापालिकेच्या प्रत्येक सभागृहामध्ये, प्रत्येक ऑफिसमध्ये, प्रत्येक ठिकाणी आपले अधिकारी जागेवर नसताना किंवा त्यावेळेला विनाकारण लाईट चालू ठेवतात. असे कार्पोरेशनचे बरेच ऑफिसेस आहेत. प्रभाग वगैरे. जर तिथे सेंट्रल प्रणाली आपण करुन घेतली तर त्याच्यामध्ये पण आपली वीज बचत होईल. मला एकच म्हणायच की आयुक्तसाहेब आपण रुपये ३.६२ पैशांनी ठीक आहे स्मार्टसिटीमध्ये कंपनी कैंद्राकडून आली आहे. पण ठीक आहे हे कुठे तरी विचार करायची गोष्ट आहे. महापालिकेचे पैसे आहेत म्हणून आपण कुठेतरी घालवायचे का. म्हणजे साधारणपणे एका पॅनलची दहाबारा वर्षे गॅरंटी असते. आणि त्यावर फक्त कचरा पडतो, धूळ बसते ते फक्त पुसायचे असते. पंचवीस वर्षापर्यंत ते चालू शकते. मग आपले ३.६२ पैशांनी जर हे प्रोजेक्टमधून आपल्याला साधारणपणे त्या प्रोजेक्टसाठी आपण चार ते पाच करोड रुपये आपण देणार आहोत. आणि जे पैसे वाचतील म्हणजे पाच करोड रुपयामध्ये पंचवीस वर्षामध्ये असे आपण प्रत्येक ठिकाणी, किती ठिकाणी आपल्या महापालिकेच्या जागा आहेत. आपल्या महापालिकेच्या बिल्डीग्ज आहेत तिथे आपल्याला हे सगळे प्रोजेक्टस करता येतील. त्याच्या अनुषंगाने विचार करावा. मलाही जास्त यातलं कळत नाहीय. जेवढ काय कळतय तेवढ मी सांगितलय. नाहीतर इथं परत माझ अज्ञान निघायच. म्हणून मी हे बोलतोय. एवढं बोलतो आणि थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.राहुल कलाटे -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह महापौर साहेब आज याठिकाणी हा जो विषय आहे तो स्मार्टसिटीकडून आला का विदयुत विभागाकडून. आयुक्त साहेब, मी तुपे साहेबां कडून माहिती घेतली. ते पोमण साहेब सांगतील असे सांगतात. पोमण साहेब म्हणतात तुपे साहेब सांगतील. तुम्ही हे नीट पहा. मी त्यांना म्हटलं मला तुम्ही डिटेल्स डाक्यूमेंटस दया. तर त्यांनी ही मंजुरीची कॉपी पाठवून दिली आहे. आपल्याकडे टेरेस आहे. आज या सोलरमध्ये प्रचंड कॉम्पीटीशन आहे. जे तुम्ही एकीकडे गर्व्हनमेंटकडून विशेष काय यात मध्ये मिळत नाही. तुम्ही आता याच्यात काय सांगताय. डब्ल्यूटीपीचा आहे ३१२ किलावॅटचा आणि एक तो तुमचा आहे तो वायसीएमचा १४७ किलोवॅटचा. साहेब, मार्केटमध्ये काय रेट आहे. म्हणजे आज तुम्ही सांगताय दोन कोटी दहा लाख रुपये एवढा खर्च करणार आहे तो आहे पीपीपीवर. आणि एकाचा खर्च आहे एक कोटीचा. साहेब, आपण जर कोटेशन घेतले तर बेचाळीस हजार हा मार्केटमधला एकदम चांगल्या प्रतीचा आजचा रेट आहे. एकूण ३१२ किलोवॅटचा हा आहे. म्हणजे आज हयाला आपण मार्केटपेक्षा सत्तर लाख रुपये जास्त देत आहोत. तुम्ही हे १४७ याच्यात जर पाहिले तर याला आपण मार्केटपेक्षा पंचावन्न लाख रुपये जास्त देत आहोत. म्हणून मी साहेबांना म्हणलो की आम्हाला याचे डिटेल्स दया. ते म्हणतात की स्टँडीगला मंजुर झाले आहे. जीबीला मंजुर झाल्यानंतर आम्ही त्याच्यावर अग्रीमेंट करणार आहोत. म्हणजे हयाच्यामध्ये एक्स्टेंशनचा क्लॉज आहे का. आज आपण जर सोलर सिस्टीम आपल्या टेरेसवर बसविली. परंतु त्यांनी उर्जा निर्माण नाही केलीतर त्याला ठराविक रेटनुसार फाईन पण झाला पाहिजे. त्याच्यापुढे काय करणार. म्हणजे विनाकारण हा विषय तुम्ही इथं कशासाठी आणला आहे. तुम्हाला एवढी घाई झाली आहे का महापालिकेची आता कॅपॅसिटी नाही का साहेब स्वत: घेण्यासाठी. मग याच्यात काय झालय आपण म्हणतो ना एवढे इनव्हेस्ट करतो आणि रिटर्न घेतो. म्हणजे दिड कोटी इनव्हेस्ट करायची आणि त्याला महिन्याला दोन लाख रुपये दयायचे. पक्षनेते महापालिकेने हा इनव्हेस्टमेंटवर नवीन धंदा सुरु केला आहे का याची शंका आम्हाला येते आहे. कारण का की कुठलेही डिटेल्स याच्यामध्ये नाहीत. जर साहेब सोलरचे पॅनल जर आपण घेतलेतर त्याची गॅरंटी किती वर्षे असते. त्याच्यामध्ये किती कॉम्पीटीशन आहेत. ब्रॅडेडची प्राईस काय, चायनाची प्राईस काय आहे. इथं ब-यापैकी सभागृहामध्ये एक व्यावसायिक आहे. सोलर उर्जामध्ये टेक्नीकली लोकांची पण माहिती घेतली या

दोघांचतर बिलकूल समन्वय नाही. पोमण साहेब असतील तुपे साहेब असतील. डिटेल माहिती दोघं एकमेकांकडे ढकलतात. आज महापालिका काय रेटने वीज घेते. महापालिका पाच रुपये पंच्चावन पैशांनी वीज आपण डब्ल्यूटीपीला घेतो. सहा रुपये सहासष्ठ पैशानी आपण स्ट्रिट लाईटला घेतो, नऊ रुपये ऑफिससाठी घेतो. साहेब, आज आपल्याकडे एवढा मोठा प्रीमायसेस आहे. हा रेट जर जमिनीवर काऊंट केला तर वेगळा रेट. टेरेसवर काऊंटींग केला तर वेगळा रेट. त्याचे पॅनेल त्याचे आर्यूमान हया सर्व गोष्टींची एवढी कॉम्पीटीशन आहे की आज घेतलेले सोने शंभर दिवसांनी घ्यायला गेल तर तुम्हाला गॅरटी नाही की त्याची प्राईस किती येईल. आणि तुम्ही त्याच्यासाठी दोन कोटी दहा लाख रुपये इनव्हेस्ट तो करणार आणि त्याला तुम्ही दर महिन्याला देणार, आपल्याला काय अपेक्षित आहे. समजा असं मत पडत की हे रुपये १५,५७,२५१/- डब्ल्यूटीपीचे मिनीमम युनीट असेलतर ४,३०,१८०/- जर केले तर तीन रुपये बासष्ठ पैसे केलेतर आपलेही पैसे वाचलतील. पण हेच जर आपणच केले तर म्हणजेच आपण इकडे एका बाजूला प्रचंड मोठया प्रमाणात ठेके काढतोय. ठीक आहे त्याच्यातून आपल्या शहराची कामेही होतात. पण एका बाजूला आपल्याकडे आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे तुम्ही शहरातल्या सगळयाच महापालिकेत करा. आणि याचे जीबीला मंजुर झाल्यानंतरच तुम्ही अग्रीमेंट करुन पुढे प्रोसेस पुर्ण करणार. आपण या सर्व गोष्टींचा विचार बारकाईने करावा. कुठेही इन्व्हेस्टमेंटला रिटर्न देणारी संस्था नाही. हे तुम्ही याठिकाणी सिध्द करा. कारण याच्यामध्ये कुठेही उदया आम्हीही असे सोलर बसवितो. काही वर्षापूर्वी आम्ही देखील सोलरमध्ये होतो. त्यामुळे तुम्ही याच्यातले बारकावे नीट तपासावेत. एवढीच मी आयुक्तसाहेब आपल्याला आणि महापौरांना विनंती करतो.

**मा. महापौर –** तुपे साहेब खुलासा दया.

**मा.तुपे [सहशहर अभियंता विदयूत] -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. भारत सरकारच्या नवीन व नवीकरण ऊर्जा एमएनआरई या विभांगांतर्गत सेकी सोलर एनर्जी कार्पोरेशन ऑफ इंडिया यांच्यामार्फत सोलर कंपन्या इम्पॅनेल केलेल्या आहेत. आणि त्यानुसार तीन रुपये बासष्ट पैशाने प्रती युनिट असा सलग २५ वर्षे त्यांनी कोणतीही वाढ न देता शासकीय नियमाप्रमाणे वीज पुरवठा करावयाचा आहे. याबाबत सन्माननीय सदस्य अजित गव्हाणे यांनी विचारणा केली होती की तीन

रुपये बासष्ट पैशाने दर आहे. तर त्याकरीता सध्या आपल्याला महापालिकेला किती दर पडतोय. तर त्याकरीता महापालिकेचे जे जलशुध्दीकरण केंद्र प्लॉंट सेक्टर क्रमांक २३ मध्ये आहे. तिथे आपल्याला जो दर पडतो तो पाच रुपये पंच्याऐंशी पैसे प्रती युनिट असा पडतो.

**मा. राहुल कलाटे -** ते सगळे आम्ही डॉकेटमध्ये वाचले आहे. त्याच्या व्यतरीक्त सांगानां. तुम्ही अग्रीमेंटबाबत माहिती आम्हाला सांगा.

**मा. तुपे, [सहशहर अभियंता] -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. याच्यामध्ये पंचवीस वर्षामध्ये कोणतीही भाववाढ न देता त्यांना हे करायच आहे. त्याच पध्दतीने आपण सन्माननीय राहुल कलाटेंनी जी विचारणा केली होती की हे काम नक्की कोणाच्या अंतर्गत आहे. तर हे काम स्मार्टसिटीच्या अंतर्गतच करण्यात येत आहे तसेच महापालिकेने पण एकूण १४ ठिकाणी याबाबतची निविदा काढलेली आहे आणि २५१ किलोवॅटच्या प्रकल्पाकरीता महापालिकेने निविदा मागविली आहे. त्यानुसार याबाबतचा करारनाम्यानुसार याच्यामध्ये जर १०० टक्के जी वीजनिर्मिती होईल ती संपूर्ण वीज महापालिकेला वापरावी लागेल. त्याचबरोबर याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचे वेटींग चार्जेस असणार नाहीत. त्यानंतर याच्यावर कुठल्याही प्रकारची शॅडो येणार नाही. यापध्दतीची काळजी महापालिकेला घ्यायची आहे. त्याचप्रमाणे पंचवीस वर्षे या इमारती किंवा त्या पाण्याच्या टाकी सेक्टर क्रमांक २३ मध्ये हे टिकतील याद्दष्टीने आम्ही स्थापत्य विभागाचा अभिप्राय घेतलेला आहे.

**मा. सिमा सावळे –** मा.महापौर साहेब, एकूण संस्था किती आल्या. त्यांचे रेटींग कस ठरले ते सांगा ना.

**मा.तुपे, [सहशहर अभियंता] -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. स्मार्टसिटी आणि रेटींग बाबतची, निविदेबाबतची माहिती पोमण साहेब देतील.

**मा. पोमण [मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी] -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. हा जो सेकी रेस्को मॉडेल आहे हा विषय स्मार्ट सिटीमार्फत राबविण्यात आलेला प्रकल्प आहे. भारत सरकाचे जे एमएनआरई हे डिपार्टमेंट आहे त्यांनी सोलर एनर्जी कार्पोरेशन इंडीया त्याला सेकी म्हणतात. सोलर एनर्जी

कार्पोरेशन इंडिया स्थापन करुन विविध राज्यामध्ये अशा कंपन्यांचे एमपॅनेल तयार केलेले आहेत आणि केंद्र शासनाने त्याचा समावेश स्मार्ट सिटीमध्ये केलेला आहे. हयाच्यामध्ये आपला स्पॅन सिटीअंतर्गत हे आपण घेतलेले आहे. याच्यामध्ये सौर ऊर्जा प्रकल्पासाठी मंजुर एमपॅनेल केलेल्या ज्या संस्था आहेत त्याच्यामध्ये २ मे २०१८ रोजी आपण महाराष्ट्रासाठी या एमपॅनेल केलेल्या पाच संस्था होत्या त्या पाच संस्थांना आपण निमंत्रित केलेले होते. त्याच्यापैकी तीन संस्था याठिकाणी उपस्थित राहिलेल्या होत्या. त्याच्यामध्ये मे. क्लीनमॅक्स एनर्जी प्रा. लि, थींक एनर्जी पार्टनर, आणि फोर्थ पार्टनर एनर्जी प्रा. लि. या तीन संस्थांना आपण याठिकाणी इव्हायोलेशन केलेले आहे. त्यांचे प्राप्त कागद पाठवलेले आहेत त्या कागदपत्रांचे त्यांचे प्रेझेंटेशन होते. यामध्ये क्लीनमॅक्स एनर्जी प्रा. लि यांना ३६.०४२ गुणांक आहेत. थींक एनर्जी पार्टनर आहे त्यांना २६.५०० गुणांक आहेत आणि फोर्थ पार्टनर एनर्जी प्रा. लि. आहेत त्यांना ३१.६६२ असे गुणांक आहेत.

**मा. आशा शेंडगे-धायगुडे –** मा.महापौर साहेब, ते गुणांक कोणी दिले ते सांगायचे.

**मा. पोमण [मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी] -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. हे जे गुणांक देण्यासाठी आपल्याकडे जी स्मार्ट सिटीअंतर्गत कन्सलटंट कंपनी आपण केपीएमजी कंपनी आहे. त्यांच्यामार्फत प्रेझेंटेशन हे मा. आयुक्त यांच्याकडेही सादर केलेले होते आणि त्याच्यानुसार डीव्हायडेशन करुन गुणांक देण्यात आलेले आहेत आणि नंतर आपण सदर कंपनीबरोबर पॉवर परचेस अग्रीमेंट केलेले आहे. पॉवर परचेस अग्रीमेंट करुन त्यांना आपण कामकाज करण्यासाठी विदयुत विभागामार्फत तो विषय आणलेला आहे. तो स्थायी समितीमार्फत शहर सुधारणामार्फत मा. स्थायी समितीकडून विषय आणलेला आहे.

**मा.अजित गव्हाणे -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. यामध्ये तुपे साहेबांनी खुलासा करताना सांगितले की आपण काही ठिकाणी अशा पध्दतीने करतो. याच्यामध्ये मुख्य आमच्या सगळयांच्या मनामध्ये प्रश्न असा आहे की त्याच्यामध्ये ज्या काही ठराविकच कंपन्या आहेत त्यातल्या तीन कंपन्यांनी याच्यामध्ये सहभाग घेतला होता. त्यांनी गुणांक पण याठिकाणी सांगितले. आमच्या सगळयांच्या मनामध्ये प्रश्न हा आहे जर हया तीन कंपन्यांनी याच्यामध्ये सहभाग

घेतला असेल म्हणजे या व्यवसायामध्ये अनेक लोक येतात देशभरामध्ये तर त्याच्याशी जर तुलना केली, मला वाटते की सगळयांच्या शंकांचे निरसन होऊ शकते. मुख्य हेतू हा आहे की खरतर याची स्पर्धा झालेली आहे का आणि आमची अपेक्षा अशी आहे की अशा पध्दतीने महापालिकेचा फायदा होणार असेल आणि पूर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये अशा पध्दतीने आपण हा प्रकल्प राबवावा आणि आपल्या महापालिकेच्या वतीने राबवावा. तरी आपल्या महापालिकेला त्याच्यामध्ये फायदा होईल. तरी तो खुलासा तशा पध्दतीने व्हावा.

**मा. महापौर -** आयुक्त साहेब यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त –** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. सभागृह. आता अनेक नगरसदस्यांच्या मनामध्ये या विषयाबाबत शंका आहे त्याचे मी सविस्तर निरसन करतो. एमएनआरई हा केंद्र शासनाचा विभाग आहे आणि देशभरामध्ये सौर ऊर्जेची चांगल्या रितीने अंमलबजावणी करावी या हेतूने एमएनआरई अंतर्गत सेकी ही पब्लीक सेक्टर अंडरटेकींग निर्माण करण्यात आलेली आहे. सोलर एनर्जीचा वापर करुन इलेक्ट्रीसिटी निर्माण करणे हे त्या एजन्सीजच प्राथमिक ऑबजेक्टीव्ह आहे, उद्दिष्ट आहे. सेकीने अनेक राज्यामध्ये सौर ऊर्जा प्रकल्प निर्माण करण्याच्यासाठी देशभर पातळीवरती निविदा प्रक्रिया राबवून रेस्को मॉडेल हे पीपीपी तत्वावर कॉम्पेटेटीव्ह पध्दतीने कॉस्ट डिसकव्हर केलेलं आणि त्याचे पंचवीस वर्षाची प्रक्रिया करणारे एक मॉडेल तयार केले. ज्याच्यावरती आंतरराष्ट्रीय एजन्सी, राष्ट्रीय एजन्सी या सगळयांची स्पर्धा होऊन हे रेट राज्यानुसार डिसकव्हर करण्यात आलेले आहेत. हे रेट डिसकव्हर केल्यानंतर तो दर महाराष्ट्रासाठी लागू झालेला आहे. त्या दरावर काम करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात काम करण्यासाठी काही एजन्सीजची एमपॅनेलमेंट देखील याच मॉडेल अंतर्गत सेकी या संस्थेने आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवर निविदा प्रक्रिया करुन एमपॅनेल एजन्सीजन केलेली आहे. हा जो शासनाचा निर्णय आहे त्याच्या अनुषंगाने त्याची कार्यप्रणाली अशी आहे की प्रत्येक लोकल बॉडीला स्वत:ची यंत्रणा न वापरता डायरेक्ट एमपॅनेल एजन्सीजकडून काम करुन घेता यावे यासाठी ही सुलभ यंत्रणा निर्माण करणेत आलेली आहे. अनेक कार्पोरेशन्सकडे या संदर्भात निधी स्वत:चा इनव्हेस्ट करण्यासाठी नसतो आणि त्यामुळे पीपीपी तत्वावरती याची संपूर्ण प्रणाली ही राष्ट्रीय पातळीवरती स्पर्धात्मक रितीने हा दर डिसकव्हर करण्यात आलेला आहे. त्यामुळे आपल्या

हातामध्ये केवळ महाराष्ट्र राज्यासाठी एमपॅनेल करण्यात आलेल्या एजन्सीजला सादरीकरण करण्याचे सांगण्यात आले. की ज्याच्यामध्ये दरावरती कुठल्याही प्रकारचे निगोसिएशन अपेक्षित नव्हते. केवळ त्यांनी आतापर्यंत राबविलेले महाराष्ट्र राज्यामध्ये कुठले कुठले प्रकल्प आहेत. ते किती काळात त्यांनी अंमलबजावणी केली. अंमलबजावणी करण्याची त्यांची क्षमता या तीन बाबींची आपण पडताळणी करुन एजन्सीची निवड केलेली आहे. त्यामुळे ही जी एजन्सी आलेली आहे ती आपण आपल्या इकडच्या आपण प्रोबेटोसाईजस अनेक शोधलेल्या होत्या. पण हया मॉडेलवरती आपल्याला पटकन रिझल्ट दाखविण्याच्या हेतून आपण या दोन साईटवरती पिंपरी चिंचवड स्मार्टसिटीच्या लि.च्या माध्यमातून आपण अंमलबजावणी करण्याचा निर्णय स्मार्ट सिटीअंतर्गत घेण्यात आला आहे. सभागृहासमोर विषय आणण्याचा हेतू असा की ज्या ठिकाणी हे काम करायचे आहे ती संपूर्ण मालमत्ता ही महानगरपालिकेची असल्याने आपलीच मान्यता घेतल्याशिवाय आम्ही तिथे अंमलबजावणी करु शकत नाही आणि हा आपला पहिला प्रकल्प होता की आपण तिथे अंमलबजावणी करीत होतो. एवढया प्रकल्पासाठी तात्काळ आम्ही हा विषय मुव्ह केलेला होता आणि त्याच्या अनुषंगाने आज इथं हे विषयपत्र आलेले आहे. आपली महानगरपालिकेची देखील क्षमता आहे. आपण स्वत: अशा प्रकारचे सोलर ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प तयार करु शकतो. मात्र त्याकरीता सौर ऊर्जा हा जो विषय आहे हा अनेक नगरसेवकांनी आता सांगितल्याप्रमाणे त्याच्यामध्ये नवनवीन तंत्रज्ञान कायमस्वरुपी येत असते. त्याच्यामध्ये आपल्याकडे सोलर्स पॅनेल जे आहेत त्यांची लाईफ, त्यांची क्वॉलिटी त्याच्यामध्ये येणा-या अडचणी या सगळयांचा विचार करुन एस्टॅब्लीश पंचवीस वर्षापर्यंत ठोक पध्दतीने आपल्याला गॅरंटीट दराने उत्पन्न मिळावे या हेतूने कुठल्याही प्रकारचे कॉम्प्लेसिटीज किंवा त्याच्या मेटेनन्सची अडचण त्या त्या लोकल बॉडीवर पडू नये या हेतूने लॉंगटर्म प्लॅनिंग करुन ही निविदा प्रणाली कारण्यात आलेली आहे. हयाच्यामध्ये कॉस्ट, रिस्क या सगळयांचा विचार करुन हा कॉम्पेटेटीव्ह पध्दतीने दर निर्माण केला असल्याने मला हा दर स्वीकारण्यामध्ये अडचण वाटत नाही. तथापि, महानगरपालिका पिंपरी चिंचवड ही एक नाविन्यपूर्ण उपक्रम करणारी महानगरपालिका असल्याने आपण स्वत:च्या कॅपॅसिटीज वाढविण्यासाठी अनेक प्रकल्प छोटया छोटया साईजचे आपल्या स्वत:च्या हिंमतीवर देखील करत आहोत. या दोन्हींची अंमलबजावणी झाल्यानंतर कुठला जास्त चांगला आणि किफायतशीर आपल्यासाठी आहे हे आपल्याला

कळू शकेल आणि त्याच्यानंतर भविष्यामध्ये कुठल्याही पध्दतीने याची अधिक व्यापक स्वरुपामध्ये अंमलबजावणी करायची याचा निर्णय आपल्या समवेत निश्चितपणे घेण्यात येईल. मात्र हे दोनच प्रकल्प सध्या आपण या पध्दतीने प्रस्तावीत करीत आहोत. याला मान्यता मिळावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आता आयुक्त साहेबांनी खुलासा केला. साहेब प्रती युनिट आपण तीन रुपये बासष्ट पैशांनी त्या कंपनीली देणार आहोत. तुम्ही सांगितल्याप्रमाणे एमएनआरई केंद्र सरकारच्या मार्फत, सेकीच्या मार्फत आपण टेंडर पब्लीश केले. याच्यामध्ये या ज्या संस्था आहेत त्या एक तर तीनच संस्था आपल्याकडे आल्या. तीन संस्थेनी टेंडर भरल. आपल्या महानगरपालिकेची जागा आपण त्यांना उपलब्ध करुन देतो. त्याचे भाडे आपण घेणार आहोत का, घेणार नसूतर आपण भाडं का मागत नाही. वायसीएमची जागा आपण त्यांना देतोय. अस कस काय. ज्यावेळेस आपण तीन रुपये बासष्ट पैशांनी त्यांना पंचवीस वर्षासाठी देणार आहेततर माझ्या माहितीप्रमाणे या प्रकल्पातून एक दोन ते तीन वर्षामध्ये त्यांचे पैसे निघून जातील. आपली महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. आपण जर भाडयाची मागणी त्यांच्याकडे केली तर बर होईल साहेब. तुपे साहेब, आपण असं काही करु शकतो का. एखादा सोलर एनर्जीचा प्रोजेक्ट आपण राबविताना कुठलीही लँड आपल्याला घ्यावी लागते. त्या लँडची किंमत जर का आपण आता पाहिलीतर कोणी पण संस्था ती घ्यायला तयार होईल. तरी आपण असली कुठली भाडयाची मागणी त्यांच्याकडे केली होती का. मला वाटत की साहेब हा विषय तहकूब ठेवावा. पुढच्या वेळेस आपण हा विषय घेऊ. महापौर साहेबांना अशी मी सुचना करतो की हा विषय तहकूब असू दया. पुढच्या वेळेस जर याच्यामध्ये काही भाडे वगैर ऍड करता आले तर आपल्याच शहराला याचा फायदा होईल. याच्याकडे आपण पहावे.

**मा.एकनाथ पवार -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. खरतर स्मार्टसिटीच्या माध्यमातून हा विषय म्हणजे मागच्याही जीबीला आला होता. मा. दत्ताकाका यांनी सांगितले होते की महापालिकेच्या ज्या जागा आहेत त्या संदर्भात आपण त्यादिवशी खरतर तुम्ही त्यादिवशी नव्हते. तर आपण वायसीएम आणि डब्ल्यूटीपी याठिकाणी आपल्याला हा जो सोलर एनर्जी प्रकल्प करण्यासाठी घाई करीत

होतो आणि कधी कधी प्रत्येक विषयामध्ये म्हणजे केंद्र शासनाने आपल्याला गाइडलाईन्स स्मार्टसिटीच्या माध्यमातून घालून दिलेले आहेत. आणि खरतर यामध्ये सगळया नगरसदस्यांच्या मनामध्ये शंका घेण्याचे काही कारण नाही. खरतर तीन रुपये बासष्ट पैसे हा जो रेट आहे. म्हणजे आज जरी आपण म्हटलं की हा रेट वेगवेगळया पध्दतीचे रेट आहेत की वायसीएमचासाठी रेट वेगळा आहे, डब्ल्यूटीपीसाठी रेट वेगळा आहे. कमर्शियलसाठी आता वेगळा आहे. हा जर पुढच्या काळामध्ये रेट जर बघितला तर दरवर्षाच्या काळामध्ये तर विजेच्या वाढीचे प्रमाण मला असं वाटत की २५ वर्षाच्या नंतर ही वीज ब-याच प्रमाणामध्ये राहुलदादा वाढत जाणार आहे. आपण खरतर हा एक रेट आहे म्हणजे २५ वर्षानंतर एका युनीटचा रेट तो ७० रुपयापर्यंत पुढच्या काळामध्ये कदाचित जाऊ शकतो. अशी एकदंरीत परिस्थिती होऊ शकते पुढच्या २५ वर्षासाठी. खरतर स्मार्टसिटीच्या माध्यमातून केंद्र शासनाचे, राज्य शासनाचे असे अनेक विषय पुढच्या काळामध्ये खरतर या सभागृहामध्ये चर्चेला येणार आहेत आणि महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की या संदर्भामध्ये शंका, कुशंका सगळयांच्या असू शकतात. तरी माझी विनंती आहे तुपेसाहेब आणि पोमण साहेब तुम्हाला याठिकाणी. एकाने विषय सांगायचा आणि मग अर्धवट विषय एकमेकांच्या अंगावर ढकलण्याचे काम खरतर कुणीही करु नका. म्हणजे एखादयाने ओनरशीप घेतली पाहिजे तर १०० टक्के ओनरशीप घेतली पाहिजे. म्हणजे सोलरचा हा जो विषय आहे टेंडर त्यानी काढल दोघांनी माहिती दया. खरतर दोघांपैकी दोघेही सक्षम अधिकारी आहेत. दोघांनी वेगवेगळया पध्दतीची माहिती सांगितली तर सभागृहामधल्या सन्माननीय सदस्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे या संदर्भात कदाचित आयुक्त साहेबांना आपलं मत व्यक्त करावं लागलं, स्पष्टीकरण कराव लागलं. मा. महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो की हा विषय मंजुर करुन पुढचा विषय घ्यावा.

**मा.राहुल कलाटे -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. मा. आयुक्त साहेब तुम्ही जो खुलासा दिला आहे त्या खुलाशामध्ये काय म्हणाले आहेत की ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वत:ची कॅपॅसिटी नाही करण्याची त्यांच्यासाठी ते बंधनकारक आहे. तुमची कॅपॅसिटी आहे ना मग कशाला विनाकारण तीन रुपये देताय. तुम्ही एका बाजूला म्हणताय स्मार्ट सिटीचा विषय आहे. एका बाजूला म्हणताय आयुक्तांनी कशाला उत्तर दिले. आयुक्तांचा विषय आहे तो. तुम्ही असं करीत असताना

महापौर साहेब मला एकच म्हणायच आहे की तुमची कॅपॅसिटी आहे. तुम्ही काय म्हणताय की केंद्राकडून विषय आलाय. तुमची कॅपॅसिटी आहे. तुम्ही कॉम्पीटीशन चांगली हेल्दी घेऊ शकता. असं असताना तुम्ही कशासाठी हे घेताय आणि घाई का करताय. होऊ दया ना कॉम्पीटीशन. आणखी चांगल्या एजन्सी येतील.

**मा.दत्तात्रय साने -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. खरतर हा सोलरचा विषय अनेक दिवसांपासून चर्चेमध्ये आहे. महापौर साहेब, एक तर याच्यावर निविदा यायला पाहिजे होत्या किंवा काय त्या पध्दतीने आलेल्या नाहीत. मला वाटत की सोलरच्या कंपन्या फक्त महाराष्ट्रातच आहेत. महाराष्ट्राबाहेर आहेत की नाहीत मला माहीत नाही. आयुक्त साहेब, या दोन ठिकाणी आपण स्पॉट देतोय उदया जर वाटल आपल्याला की त्या वायसीएमएच काहीतरी डेव्हलपमेंट करायचय तर त्यामध्ये आपण डेव्हलपमेंट करणार आहोत का. उदया आम्हाला वाटल किंवा ठरवलं की ते वायसीएम आम्हाला रिन्यूएशन करायचय. किंवा त्याच्यामध्ये काय बदल करायचाय. मग आता आम्हाला अजुन एक प्रश्न पडतोय की सर्वात श्रीमंत महानगरपालिका आपली आहे. मग हे तिकडून आणण्यापेक्षा आपण आपला हा प्रोजेक्ट का राबवू शकत नाही. आपण त्याला पैसे दयायचे. आता मला वाटत की संजोग वाघेरेंनी आपल्याला सविस्तर आकडेवारीसह दिलंय. आपण किती त्यामध्ये आपले पैसे वाचवू शकतो. म्हणजे काय आपली श्रीमंत महानगरपालिका आपण दुस-याला लुटायला दिली का. कोणाला तरी डोळयासमोर ठेवून हा प्रकल्प आणलायं का. असं या निमित्ताने मला वाटतंय. साहेब, महानगरपालिकेची जागा आपली आहे आणि आपण काही न घेता हा प्रकल्प राबवतोय. महापौर साहेब, जर हा विषय आपल्याला मंजुर करायचा असेल तर आमचा राष्ट्रवादीचा या विषयाला विरोध आहे. कारण आम्ही महिनाभर ओरडून सांगतोय हा विषय चुकीचा आणला आहे कोणाला तरी डोळयासमोर ठेवून आणलायं. आयुक्त साहेब, तुम्ही म्हणलय पंचवीस वर्षे. उदया पंचवीस वर्षे आपला भरवसा आहे काय. या भरावशाच्या बाहेर जाऊन आम्ही बोलतो याची गॅरंटी नाही. पण जो प्रकल्प आपण राबविणार आहोत त्याचा जर भरवसा तुम्हाला नसेल तर आम्ही कशासाठी खर्च करायचा. म्हणून आयुक्त साहेब, महापौर साहेब, या विषयाला आमचा राष्ट्रवादीचा विरोध आहे. आमचा विरोध नोंदवून तुम्हांला करायचा असेलतर करु शकता, पण हा विषय चुकीचा आलेला आहे.

लोकांना डोळयासमोर ठेवून आणलेला आहे. एवढ बोलून याठिकाणी थांबतो धन्यवाद, महापौर साहेब.

**मा.आशा शेंडगे-धायगुडे -** मा महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. या विषयामध्ये आपण पंचवीस वर्षाची निविदा म्हणजे पंचवीस वर्षे त्यांना काम दयायचे आहे. असं आपण याठिकाणी म्हणतोय मला एक सांगा. आपण एक ग्रंथालय एका संस्थेला दिले होते. आपली जागा त्यांना दिली आणि नंतर त्यांनी सामान टाकले. तो ते ग्रंथालय चालवत नव्हता काही नव्हता. आपण ते काढायच होते. परंतु मला अस वाटतं की ते करीत असताना त्यावेळच्या तत्कालीन कमिशनरांशी या योजनाविषयी किमान २५ ते ३० पत्रव्यवहार करावा लागला. कारण का एक छोटयाशा साधारणत: ४०० ते ५०० स्क्वेअर फूट जागा असेल त्याच्यासाठी. आज आपण इतका मोठा करारनामा त्यांच्याबरोबर करतोय पंचवीस वर्षासाठी. समजा उदया काही कारणासाठी ती संस्था बंद पडली तर आपण त्यांच्यावर काय कारवाई करणार. तेव्हा आपलीच जागा आपल्या ताब्यात घेण्यासाठी आपल्याला अडचण येते त्यामुळे आपल्याला असले विषय काही करायचे नाहीत. या विषयाची आम्हाला संपूर्णत: माहिती दयावी त्यानंतर हा विषय मंजुर करावा अशी मी आपल्याला विनंती करते आणि कमिशनर साहेब, महापौर साहेब, ख-या अर्थाने पंचवीस वर्षे नाही त्यांनी तीन वर्षात ही योजना बंद केली ते म्हणाले आम्हाला परवडत नाही. त्यांचेकडे काही मोठा भाग नादुरुस्त झाला तर आपण काय करणार आहोत याचा खुलासा आपण करावा. धन्यवाद, महापौर साहेब.

**मा.सिमा सावळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह, मा. महापौर साहेब खरतर राज्य लेव्हलवरती सेकीने निविदा मागविल्या बरोबर आहे साहेब राष्ट्रीय लेव्हलवर त्या निविदा मागविल्या आणि म्हणे पाच लोक आली. आख्या राज्यामध्ये पाच लोक ना. पाचमध्ये आपल्या इथं रेटींगमध्ये तीन आले. आता रेटींग करण्याची जी सिस्टीम आहे ती सिस्टीम एकदा समजून सांगितली पाहिजे. ती संस्था किती ठिकाणी काम करते, किती ठिकाणी प्रोजेक्ट केलेले आहेत, किती ठिकाणी सक्सेस झाले आहेत. हा केंद्र शासनाचा उपक्रम आहे त्या उपक्रमाचे मी मनापासून स्वागत करते. परंतु त्याचबरोबर या संस्थेने किती ठिकाणी यशस्वीरित्या प्रोजेक्ट राबविला ते सुध्दा या सभागृहाला माहिती होणे गरजेचे आहे. साहेब, उपक्रमास आमचा विरोध नाही. उपक्रमाला आमचा अजिबात विरोध नाही. मा.पंतप्रधान यांनी सुचविलेला

हा उपक्रम आहे त्याला आम्ही विरोध कसा करणार. परंतु त्याचबरोबर या शहराचे नागरीक म्हणून या सभागृहाचे जबाबदार सदस्य म्हणून त्यांना निश्चित विचारण्याचा अधिकार आहे. यांनी किती ठिकाणी प्रोजेक्ट केले. किती ठिकाणी या संस्थेलाच काम मिळालेले आहे आणि रेटींग सिस्टीम नेमकी काय आहे. मग अस तर नाही ना की पाच लोकांना पाच महानगरपालिका मिळाल्या. एका ठिकाणी क्लीनमॅक्स बसली, एक ठिकाणी थींक एनर्जी बसली, फोर्थ पार्टनर एका ठिकाणी बसली पाच ठिकाणी पाच एकत्र तर दिल्या नाहीत का. अस तर झालं नाहीय ना. आपल्या इथ या एनर्जीला आपण क्लीनमॅक्स यांच्याबरोबर पॉवर परचेस अग्रीमेंट करण्यास याठिकाणी मंजुरी देतोय आपल्या माहितीकरीता विषय आलेला आहे मा. महापौर साहेब. विषय असा आहे की याच्यापुर्वी यांनी किती ठिकाणी प्रोजेक्ट केलेत आणि केलेतर ते सक्सेसफुल आहेत का आणि नसेल तर पाच जणांमध्ये सम-समान वाटप झाले का. म्हणजे ठिकठिकाणी यांना काम मिळाल का. देण्याबद्दल विरोध माहिती नाही परंतु माहिती तर पुर्ण दिली पाहिजे. आता याठिकाणी विरोधी पक्षनेत्यांनी त्यांचा विरोध नोंदविला. ते सुध्दा या कमिटीवरती सदस्य आहेत स्मार्टसिटीवरती. मग त्यांचा विरोध आपण याठिकाणी ऐकणार आहेत का. अध्यक्ष महोदय, कमिशनर, साहेब तुम्ही स्मार्ट सिटीचे अध्यक्ष आहात, मग तुम्ही त्यांचा विरोध ऐकला नव्हता का. महापौर साहेब, तुम्ही विषय समजून घ्या एक तर मुळात काय की तुम्ही व्हिप देताय विषय तहकूब आणि इथं विषय तुम्ही मंजुर करताय. आम्हाला सगळयांना वेडयात काढायच ठरवल का तुम्ही. बाकी कोण बोलेल नाही मी तर बोलणार, असं नाही चालणार. जर तुम्हांला तहकूब करायचा तहकूब, मंजुर करायचाय तर मंजुर करुन टाका ना. आमचे काही म्हणणे नाही पण ज्येष्ठ सदस्यांची तुम्ही गय करणार नसाल तर ते खपवून घेणार नाहीत. अजिबात नाही, ही कुठली पध्दत आहे. विषय क्रमांक २ चर्चा करुन मंजूर होता तो तुम्ही तहकूब केला आणि हा विषय तहकूब आहे तो तुम्ही मंजुर म्हणताय. व्हिप काढताय, मग इथं बसणारे सगळे वेडे आहेत का. असं योग्य नाही ना. मंजुर करायचा तर मंजुर करा ना तुम्ही. आमची काही चोरी आहे का. आमचा काही विरोध नाही याला. पण तुम्ही ज्यावेळेस आम्हाला मुर्खात काढण्याचा प्रयत्न करता त्यावेळेस विरोध करावसा वाटतो. हे कशासाठी करता. आम्ही सुध्दा स्मार्टसिटीमध्ये सदस्य होतो. आम्हाला माहिती आहे ना. मा.महापौर साहेब, विषय असा आहे की याठिकाणी अशा प्रकारचा विषय सभागृहामध्ये आणून दबावतंत्र वापरुन तुम्ही मंजुर करणार असाल तर

त्याला वेगवेगळे फोरम आहेत आम्हाला विरोध करायला. आणि मग तिथे विरोध केल्यावर म्हणू नका तुमची पक्षाच्या विरोधात भूमिका कशी. आमचा विषयाला विरोध नव्हता आणि नसणार. परंतु मुर्खात काढून जर अशा प्रकारचे विषय करणार असाल तर पुढच्या स्टेप या विरोधाच्या असणार हे आजच याठिकाणी सांगते आणि थांबते.

**मा. एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. मा. महापौर साहेब, खरतर या विषयाच्या संदर्भामध्ये सर्व सन्मा सदस्यांना विशेषत: माझी बहीण सिमाताईंच्या मनामध्ये असं वाटलं की विषय तहकूब आहे. खरतर हा विषय मागचा मी व्हिप केला, मी महापौरांना सांगीतल होतं की, पहिल्यांदा एक गोष्ट बोलताना सांगितली या सभागृहामध्ये ज्यावेळेस एखादा विषय असेल त्याचे काय करायचं मी मा. महापौरांना आणि मा. कमिशनरांना मी त्यांना सांगितले की हा विषय आपल्याला वीस तारखेला करता येईल का. आपल्याला विषयाची किती अर्जन्सी आहे. कारण आपण मागच्या वेळेसची जीबी खरतर तहकूब केली होती. त्यावेळेस घाईघाईने आपण हा विषय म्हणत होतो की स्मार्टसिटीच्या संदर्भामधला हा जो विषय होता. याठिकाणी केंद्रशासनाकडून आपल्याला निधी मिळणार होता. तो निधी खरतर वाया जाणार होता. त्यामुळे पहिल्यांदा आपण त्यावेळेस सांगितले होते की हा विषय अर्जंटली आपण करुन घ्या. बाकीच्या ज्या कुठल्या कुठल्या जागेवर आपल्याला स्मार्टसिटीचे प्रोजेक्ट करायचे आहेत. त्याच्या मान्यतेसाठी आपल्याला कमी जास्त जागा मिळेल. खरतर मा. महापौरांशी बोलून मी त्यांना सांगितलं की हा विषय आपल्याला मंजुर करायचा आहे. तहकुब हा माझ्याकडून व्हिप देताना झाला. खरतर हा ट्रान्सफरंटचा भाग आहे. या सभागृहामध्ये काही अशी परिस्थिती नाही की या विषयामध्ये कुठेतरी दडपून ठेवायचे आहे किंवा काही तरी वेगळे करायचे आहे. खरतर या शहरामध्ये स्मार्टसिटीचा निधी ज्यावेळेस केंद्रशासनाकडून आपल्या शहराला मिळतो. त्यावेळेस केंद्र शासनाचे सुध्दा काही निर्णय आपल्याला ऐकावे लागतात. मी या पध्दतीने विचार करेन. हे खरं आहे की ज्या महापालिकेची आर्थिक कॅपॅसिटी नाही त्याठिकाणी केंद्रशासनाच्या माध्यमातून होईल. पण सगळया गोष्टी जर केंद्रशासनाने आपल्याला स्मार्टसिटीच्या माध्यमातून सांगण्याचा जर प्रयत्न केला तर त्याचे प्रत्येक गोष्टीमध्ये आपण विरोध करायला जर लागलो तर मला असं वाटतं की ते चुकीचे आहे. याच्यामध्ये केंद्रशासन एखादी गोष्ट आपल्याला नॉर्म्स घालून देते की अशा पध्दतीने या

या कंपनीकडून एखादा प्रोजेक्ट राबविला गेला पाहिजे याचा अर्थ केंद्रशासनावर आपण अविश्वास दाखवितो. याचा अर्थ असा होतो की केंद्रशासनाचे आपल्याला काहीही गाइडन्स नसताना मला माहिती आहे आपल्या महापालिकेची याच्यापेक्षा खूप मोठी कॅपॅसिटी आहे आणि एखादी गोष्टीचा सभागृहामध्ये निर्णय काय करायचा मा. महापौरांचा आणि माझा खरतर या शहराच्या विकासासाठी, या शहराच्या भवितव्यासाठीच आपण सगळया गोष्टी करतोय. म्हणजे हा विषय तहकूब तर होता. खरतर तहकूब असल्यानंतर सर्व सन्मा. सदस्यांनी या चर्चेमध्ये सहभागी होतात, खरतर माझा आणि महापौरांचा थोडासा तरी अधिकार आहे ना. एखादा विषय मंजुर करायचा की एखादा विषय तहकूब करायचा. ब-याच वेळेला एखादा विषय अशाही पध्दतीचे झालेले आहेत की आपण मंजुर करत असताना काही तहकूबही केलेले आहेत. तुमचं म्हणणं काही नाही. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवा. मा. महापौर मी आपल्याला विनंती करतो की या विषयाच्या संदर्भामधला उहापोह चर्चा खूप झालेली आहे. कमिशनर साहेब माझी तुम्हाला विनंती आहे की जे जे केंद्रशासनाचे आणि राज्य शासनाचे गाईडन्स आपल्याला स्मार्टसिटीच्या माध्यमातून आहेत. त्या सगळयांचे स्मार्टसिटीच्या सदस्यांनाही या सभागृहातल्या सगळया सदस्यांना आपण दाखवावे. महापौर साहेब, ही चर्चा खूप झालेली आहे या विषयाची. हा विषय मंजुर करुन मा. महापौर पुढचा विषय घ्यावा.

**मा. महापौर –** आयुक्त साहेब खुलासा करा.

**मा. आयुक्त –** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. सभागृह मी आताच आपल्यासमोर या रेस्को मॉडेल बद्दल सभागृहाला सविस्तर माहिती दिलेली आहे. गुणांकनांच्या बाबतीतली माहिती आपण मागितली होती त्याची सविस्तर माहिती मी आपल्याला देतो. ही योजना राबवित असताना दोन गोष्टी आपल्यासमोर होत्या. याच्यामध्ये पहिली गोष्ट अशी होती की स्मार्टसिटी प्रकल्पामध्ये आपण शेवटच्या टप्प्यामध्ये सामाविष्ठ झालो आणि लवकरात लवकर कुठलेतरी लो हॅगींगप्रूफ प्रोजेक्ट आपल्याला तात्काळ अंमलबजावणी करता येतील अशी कुठलीतरी याच्यामध्ये रुफटॉप सोलरचा प्रोजेक्ट आपल्याला तात्काळ अंमलबजावणी करणे शक्य होते. हे अंमलबजावणी करण्यासाठी आपल्याकडे सेकी रेस्को मॉडेल हे राष्ट्रीय पातळीवर निविदा प्रक्रिया करुन ॲचिव्ह केलेला दर असल्यामुळे निश्चितपणे आपल्या हाताशी होते आणि म्हणून तो निर्णय

त्यावेळेला घेण्यात आलेला होता. त्यावेळेला जुन अखेरपर्यंत कमीट करण्याची केंद्र शासनाची मुदत होती त्यामुळे त्यावेळेला आपण तात्काळ ती प्रक्रिया पुर्ण केली. त्यानुसार आपल्याला पॉवर परचेस अग्रीमेंट करण्यासाठी आणि एक्झिक्युट करण्यासाठी ऑक्टोबर अखेरपर्यंत मुदत आहे. आपल्याला अंमलबजावणी करायची असेल तो निर्णय लवकरात लवकर घेणे आवश्यक आहे हे करीत असताना पाच एजन्सी होत्या. त्या पाच एजन्सीला आपल्याकडून डायरेक्ट पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. या पत्रव्यवहाराला तीन एजन्सीजने रिस्पॉन्स दिला. त्या तीन एजन्सीजला आपण फॉरमॅट दिलेला होता त्या फॉरमॅटमध्ये त्यांनी त्यांचा प्रस्ताव दाखल करणे गरजेचे होते. या प्रस्तावाची सविस्तर छाननी करणेत आली. त्याच्यामध्ये कंपनीची प्रोफाईल, कंपनीचा टर्नओव्हर आणि त्यांची फायनान्सीयल पोजीशन, त्यांचा अन्यूएल रेव्हेन्यूव, प्रॉफीट आणि नेटवर्क त्यांच्याकडे असलेली मॅनेजमेंट एक्सपरटाईज, त्यांचेकडील इनव्हेस्टमेंट पोटॅनशियल, आतापर्यंत केलेल्या कामांची रुपरेषा, अंमलबजावणी, त्यांचे स्वत:चे असलेले आरएनडी एफटर्स, त्यांचे फायनल सिलेक्शन कशा पध्दतीने करतात त्याची निवड प्रक्रिया, इनर्व्हटर कुठल्याप्रकारे निवडला जातो त्याची निवड प्रक्रिया, कॅपॅसिटीसाठी लागणारे आवश्यक तंत्रज्ञान त्यांचेकडे उपलब्ध आहे की नाही आणि आपले जे स्पेसिफीक सोल्यूशन आपण मागितले त्याच्यासाठी राबविण्याची त्यांची क्षमता या दहा मुद्दयांवरती त्यांचेकडील स्कोरींग करणेत आलेले आहे. याच्यामध्ये एक बाब ही कंपनी निवडण्यामध्ये महत्वाची ठरलेली आहे की अन्य कंपन्यांच रुफटॉप सोलरमधलं त्यांनी कुठलेही पुरावे आपल्याकडे सादर केलेले नव्हते. त्यांचे ग्राऊंड इन्स्टॉलेशनचे मोठया प्रमाणामध्ये पुरावे त्यांनी सादर केलेले होते. या कंपनीकडे रुफटॉप सोलर एस्टॅब्लीश करण्याचे पुरावे त्यांनी सादर केलेले असल्यामुळे त्यांना गुणांकामध्ये अधिक लाभ झालेला आहे. आपल्याला फायनान्शियल मुद्दयावरती निगोशिएशन करणं किंवा कुठलीच बाब याच्यामध्ये नव्हती. कारण सेकी रेस्को मॉडेल हे स्टॅंडर्ड मॉडेल आहे. याच्यामधल्या कॉस्ट, याच्यामधल्या रिस्क, या सगळया गृहीत धरुन नॅशनल पातळीवरती हा पूर्ण रेट रिव्हाईज करणेत आलेला आहे. आपल्याला फक्त एवढाच निर्णय घ्यायचा की रेस्को मॉडेलला आपण जायच किंवा नाही. जायच असं ठरविल्यानंतर आपल्याला काही बंधने आहेत ते म्हणजे आपल्याकडून जागा विनामूल्य उपलब्ध करुन देणार आणि समजा अनेकांच्या मनात असा संदेह आहे की उदया त्यांनी काही डिफॉल्ट केला तर आपण

त्यांच्यावरती कंट्रोल काय ठेवणार. संपूर्ण पॉवर परचेस अग्रीमेंट आणि रेस्को टर्म्समध्ये असे म्हटलेल आहे की फोर्स ग्रॅज्यूएल हे जे तत्व आहे की त्याच्यानुसार कुठल्या केसेस मध्ये अन अफॉरटेबल डिफॉल्ट आहे आणि दुसरं पार्टीच्याकडून झालेला डिफॉल्ट. उदाहरण जर दयायच झाल तर त्यांना एवढया क्षमतेने आपल्याला वीजपुरवठा करणे बंधनकारक आहे. ते त्यांनी आपल्याला सप्लाय केला पाहिजे. मेंटेनन्स करण्याकरीता त्यांना लॉंगटर्म देणं आपल्या पुर्ण अग्रीमेंटमध्ये नमुद आहे. पण त्याच्या व्यतिरिक्त अनअव्हायडेबली त्यांनी जर आपल्याला काही कारणास्तव जर वीज पुरवठा बंद केला आणि तो जर त्यांच्या दिलेल्या मुदतीत त्यांनी रिस्टोर नाही केला तर व्यूथफूल डिफॉल्ट ऑन द सप्लाय होऊ शकतो. आणि व्यूथफूल डिफॉल्टवरती त्यांचे टर्मिनेशन करण्याचे अधिकार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला या संपूर्ण प्रक्रियेमध्ये आहेत. व्यूथफूल डिफॉल्टच्या वेगवेगळया केसेस त्याच्यात सविस्तरपणे नमुद आहेत आणि व्यूथफूल डिफॉल्ट झाल्यास जर त्यांनी आपल्या प्रिमायसेसमधून संपूर्ण इन्स्टॉलेशनसह त्यांना बाहेर काढण्याचे आणि त्यांचे काम संपुर्ण बंद करण्याचे अधिकार आपल्याला या संपूर्ण करारनाम्यामध्ये दिलेले आहेत. त्यामुळे जर कुठेही अशी परिस्थिती उदभवल्यास त्याचा विचारही या संपूर्ण करारनाम्याच्या प्रक्रियेमध्ये केलेला आहे. मात्र त्या त्या वेळेला आपल्याला मुदतीत काम पूर्ण करण्याचे असल्याने याच्यावरती सविस्तर चर्चा स्मार्टसिटीच्या मिटींगमध्ये झालेली आहे. पुनश्च: माझी सभागृहाला विनंती आहे की आपल्याला मुदत कमी असल्याने हा विषय सभागृहाने मान्य करावा. ही संपूर्ण नॅशनल लेव्हलची प्रक्रिया असल्यामुळे दोनच प्रकल्प आपण करतो आहोत. अन्य ठिकाणी आपण स्वत: देखील करणार आहोत आणि त्याची पाहणी करुन भविष्याची स्ट्रॅटर्जी आपण ठरवू. आपल्या कमिटीने पडताळणी केलेली आहे. त्याचेच ते दहा मुद्दे सांगितलेत की कुठल्या पध्दतीने गुणांकन केले आहे. पाच एजन्सीज एमपॅनल आहेत त्यातल्या आपल्याला निवडायच्या आहेत. मला सभागृहाने मान्यता दिल्याशिवाय मी पुढे जाऊच शकत नाही. म्हणून मी याची मान्यता घेतो आहे. नियमानुसार मी महानगरपालिका सभागृहाची मान्यता घेण्यासाठी हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

**मा.सिमा सावळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. कमिशनर साहेब आता आपण या संस्थेचे सगळे काही गुणधर्म सांगितलेत ते केंद्र शासनाने

बघितले आहेत. बघितले नाहीत का आणि बघितल्यानंतरच त्यांनी पाच संस्था निवडण्याचा अधिकार दिला आहे. आमचे म्हणणे असे आहे की ज्यावेळेस रेटींग सिस्टीम लावतो, तुम्ही आता टेंडर केलेय का, नाही. डायरेक्ट आपण काम देतोय. ज्यावेळेस रेटींग सिस्टीम केली ती रेटींग सिस्टीम तुम्ही सभागृहासमोर आणणे गरजेचे होते मग पारदर्शकता राहीली असती. रेटींग सिस्टम नाही ना कळाली साहेब आम्हाला. मला काय कोणालाच कळाली नाही. आणि रेटींग सिस्टीममध्येच गोम आहे. साहेब रेटींग सिस्टीममध्येच गोम आहे ना. आहे ना साहेब आहे. रेटींग सिस्टीम आम्हाला कळाली नाही. सभागृहात कोणालाच कळाली नाही. त्यामुळे पॉवर परचेस अग्रीमेंट तुम्ही कस करता, काय करता, का घेताय, का देताय. त्यामुळे संस्थेवरती आमचे ऑबजेक्शन आहे. प्रोजेक्टला आमचा विरोध नाही. परंतु त्याच्या रेटींग सिस्टीम १०० टक्के सभागृहाला कळण्याचा अधिकार आहे. कारण की तुम्ही पॉवर परचेस अग्रीमेंट त्यांच्याबरोबर करताय आणि म्हणून कळालं नाही. परंतु हे जर तुम्ही रेटींग सिस्टीम सगळया सदस्यांना पाठविले असतेतर तेही चालले असते. ते ही आपण केलेलं नाही साहेब, आपण पॉवर परचेस अग्रीमेंट करण्याच्या आधी सगळया सदस्यांना रेटींग सिस्टीम कळली पाहिजे. यांनाच का दयायचं. उदया जर का हे बंद पडलं. तर सगळे आमच्यावरती खापर फोडतील. कारण का मान्यता तुम्ही सभागृहाकडून घेताय. आणि तुम्ही आम्हाला हे कळवून दयायला पाहिजे. तो आमचा अधिकार आहे. तो एकटया महापौरांचा, सभागृह नेत्यांचा नाही. या सभागृहात आलेल्या सगळया सदस्यांचा अधिकार आहे. पॉवर परचेस अग्रीमेंट कुठल्या रेटींग सिस्टीममधून होते. ते आम्हाला कळलं पाहिजे. त्याचे प्रेझेंटेशन ठेवा परंतु ते कळलं पाहीजे. धन्यवाद, महापौर साहेब.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.कमल घोलप-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ४

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/०६/कावि/९२५१/२०१८ दि.१०/०८/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३०५८
दि.१४/०८/२०१८

शहर अभियंता यांनी, स्थापत्य फ क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.३१/७/२०१८ चे प्रस्तावान्वये स्थापत्य फ मुख्यालयायांचे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील स्थापत्य “विशेष योजना” या लेखाशिर्षावरील प्रस्तावात नमुद चालू कामांना तरतुद कमी पडत आहे. सदर चालू कामांवर मार्च २०१८ अखेर पुरेशी तरतुद करणेत आली होती. तथापी सदर रस्त्याचे काम स्थानिक जागा मालक यांनी अडविले होते. त्यामुळे कामांवरील रक्कम खर्च होऊ शकली नाही. सद्यास्थितीत जागा मालक यांनी काम करण्यास परवानगी दिलेली असून त्याप्रमाणे काम करणेत आलेले असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रु.४३,५०,०००/- (अक्षरी र.रू. त्रेचाळीस लाख पन्नास हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी. (वाढ/घट र.रू.४३,५०,०००/-)

**मा.शैलजा मोरे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब**,** मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- स्थापत्य उदयान विभागामधील मनपाच्या सन २०१८-१९ च्या नवीन अंदाजपत्रकात नागरिकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने स्थापत्य उदयान विभाग या लेखाशिर्षातील कामांची प्रशासकीय मान्यता व तरतूद अत्यंत कमी असल्याने स्थापत्य उदयान विभागाअंतर्गत कामांची निविदा काढलेनंतर संपुर्ण व्याप्तीचे काम होणे शक्य होणार नाही त्यामुळे खालील समावेश केलेल्या कामाची सन २०१८-१९ मध्ये खर्च होणारी आवश्यक तरतूद

वृक्षसंवर्धन विभागाकडून वाढवून मिळत आहे. तसेच अंदाजपत्रकातील रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रक पान क्र. | अंदाज पत्रक अ.क्र. | मूळ प्रशासकीय मान्यता | सुधारित प्रशासकीय मान्यता | सन २०१७-१८ ची मूळ तरतूद | वाढ | घट | सन २०१८-१९ साठी लागणारी आवश्यक तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रावेत से.क्र.३२ येथील उदयान विकसीत करणे. | स्थापत्य उदयान विभाग | २८० | २४४ | ९००००० | ७०००००० | ५७६००० | ३०००००० | ० | ३५७६००० | रक्कम रु. ३०.०० लक्ष वाढीव तरतूद वृक्षसंवर्धन विभाग पान क्र. ६-७ अ.क्र.३३ पाणीपुरवठा विषय विविध कामे करणे या कामातून वर्ग करण्यात येत आहे. |

तसेच प्रभाग क्र. १ चिखली हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठया प्रमाणात विस्तारलेला आहे. तसेच दाट लोकवस्तीचा भाग असून, पाणीपुरवठा विभागाच्या २४X७ योजनेअंतर्गत व जलनिस्सारण विभागाच्या अमृत योजनेअंतर्गत प्रभागातील रस्त्यांची मोठया प्रमाणात खोदाई चालू आहे. त्यामुळे रस्ते पुर्ववत करणेसाठी डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तसेच नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तसेच प्रभागाच्या विकासाच्या व शहराच्या सुशोभिकरणाच्या दृष्टीने नागरिकांना मुलभूत सोई सुविधा देणे आवश्यक आहे. तरी खाली उल्लेख केलेल्या कामांच्या निविदा कार्यवाही करणसाठी सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील कामास वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ मधील उपलब्ध तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | एकूण आवश्यक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वाढ करावयाची कामे | | | | | | | |
| | भांडवली कामे | | | | | | | |
| १ | प्रभाग क्र.१ चिखली येथील सोनवणेवस्ती, शेलारवस्ती व इतर परिसरातील पाणीपुरवठा विभागाच्या २४X७ योजनेअंतर्गत होणा-या खोदाईमुळे रस्ते पुर्ववत करणेसाठी अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करुन एमपीएम पध्दतीने करणे. | २०३ | ५ | पथ इ फ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत विविध कंपन्यांच्या/मनपा च्या सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे चर बुजविणे | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| २ | प्रभाग क्र. १ चिखली येथील पाणीपुरवठा विभागाच्या २४X७ योजनेअंतर्गत होणा-या खोदाईमुळे रस्ते पुर्ववत करणेसाठी मोरेवस्ती व इतर परिसरातील उर्वरीत रस्ते मजबुतीकरण करुन एमपीएम पध्दतीने करणे. | २०३ | ६ | पथ इ फ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत विविध कंपन्यांच्या/मनपा च्या सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे चर बुजविणे | ० | ५०००००० | ० | ५०००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रभाग क्र. १ चिखली म्हेत्रेवस्ती व इतर परिसरातील पाणीपुरवठा विभागाच्या २४X७ योजनेअंतर्गत होणा-या खोदाईमुळे रस्ते पुर्ववत करणेसाठी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | २०३ | ७ | पथ इ फ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत विविध कंपन्यांच्या/मनपा च्या सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे चर बुजविणे | ० | १००००००० | ० | १००००००० |
| ४ | प्रभाग क्र. १ चिखली येथील रामदासनगर व केशवनगर व इतर परिसरातील २४X७ योजनेअंतर्गत होणा-या खोदाईमुळे रस्ते पुर्ववत करणेसाठी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | २०३ | ८ | पथ इ फ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत विविध कंपन्यांच्या/मनपा च्या सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे चर बुजविणे | ० | १००००००० | ० | १००००००० |
| ५ | प्रभाग क्र.१ चिखली येथील पाटीलनगर व धर्मराजनगर व इतर परिसरातील २४X७ योजनेअंतर्गत होणा-या खोदाईमुळे रस्ते पुर्ववत करणेसाठी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | २०३ | ९ | पथ इ फ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत विविध कंपन्यांच्या/मनपा च्या सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे चर बुजविणे | ० | १५०००००० | ० | १५०००००० |
| | घट करावयाचे कामे | | | | | | | |
| | विशेष योजना | | | | | | | |
| ६ | प्रभाग क्र. ११ मधील मंजुर विकास योजनेतील ताब्यात आलेले रस्ते विकसीत करणे. | ३६ | १३६ | ९) रोड पेव्हमेंट मॅनेजमेंट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणाअंतर्गत कामे करणे. | १२५००००० | | ५०००००० | ७५००००० |
| ७ | फ प्रभागात ठिकठिकाणी सुशोभिकरण काम करणे. | ३८ | १८६ | ९) रोड पेव्हमेंट मॅनेजमेंट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणाअंतर्गत कामे करणे. | १००००००० | ० | ५०००००० | ५०००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | प्रभाग क्र. ११ मधील महाबली चौक ते जुन्या आरटीओ ऑफीसपर्यंत कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे. | ३८ | २०६ | ९) रोड पेव्हमेंट मॅनेजमेंट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणाअंतर्गत कामे करणे. | १००००००० | ० | ५०००००० | ५०००००० |
| ९ | प्रभाग क्र. ११ मधील (आरक्षण क्र. १/११३) कुदळवाडी येथील शाळा इमारतीची उर्वरीत कामे करणे. | ५३ | ६४ | २४)शाळा मैदाने आणि क्रिडासंकुल उभारणे व दुरुस्ती करणे. | १५५६५००० | ० | ७५००००० | ८०६५००० |
| १० | प्रभाग क्र. ११ कृष्णानगर येथील स्वामी विवेकानंद बॅंडमिंटन हॉल परिसरातील आवश्यकतेनुसार स्थापत्यविषयक कामे करणे. | ५३ | ७० | २४)शाळा मैदाने आणि क्रिडासंकुल उभारणे व दुरुस्ती करणे. | १००००००० | ० | ५०००००० | ५०००००० |
| ११ | प्रभाग क्र. ११ मधील पुर्णानगर येथील से.क्र. १८ सीडीसी मधील मोकळी जागा क्र. ४ पर्यटन केंद्राच्या धरतीवर विकसीत करणे. | ५६ | ५५ | २५ ब) पर्यटन विकास आराखडा | २००००००० | ० | १००००००० | १००००००० |
| १२ | अखर्चित रक्कम | | | | ७५००००० | | ७५००००० | ० |
| | एकूण | | | | ८५५६५००० | ४५०००००० | ४५०००००० | ८५५६५००० |

एकूण र.रु.४,५०,००,०००/- (अक्षरी र.रु. चार कोटी पन्नास लाख फक्त) इतके वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच १) प्रभाग क्र. २ मधील बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वरुढ पुतळा उभारणे व अनुषंगिक कामे करणे (पान क्र. ३७ अ.क्र. १५९) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आला असून या कामाचे नावांमध्ये “प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वरुढ पुतळा उभारणेकामी अनुषंगिक कामे करणे” असा बदल करणेस मान्यता देणेत यावी.

२) प्रभाग क्र. ५ जाधववाडी कुदळवाडी मधील डि.पी. रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ५०/४-२०१७-१८) या चालू असलेल्या कामामधुन नवीन प्रभाग क्र.२ मधील डि.पी. रस्त्यांची कामे करणेस मान्यता देणेत यावी.

३) प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे (पान क्र. ५५/अ.क्र.२७) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश असून या कामास रक्कम रुपये १६ कोटीचे खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

४) तसेच मा.महापालिका ठराव क्र. २०२ दि.२२/०६/२०१८ अन्वये प्रभाग क्र. २ मधील स्थापत्य विषयक (१ ते ६) १) पान क्र. २५ अ.क्र. १५०, २) पा.क्र. २६, अ.क्र.१५१, ३) पान क्र. १२, अ.क्र. ६६, ४) पान क्र. १२, अ.क्र.६९, ५) पान क्र. १९ अ.क्र १००, ६) पान क्र. १७ अ.क्र. १७५) या कामाना सन २०१८-१९ साठी लागणारी तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे तथापि, सदरची तरतूद अखर्चीत कामामधुन शिल्लक असलेल्या रकमून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

आहे व प्रलंबित बिले त्वरीत अदायगी बाबत वाढीव तरतुदीची  मागणी केलेली आहे. विभागाची तातडीने बिले अदा करावयाची बाब विचारात घेता सन २०१७-१८ अखेर सुमारे र.रू.७२५ कोटी शिल्लक राहिले असल्याची शक्यता आहे. यापूर्वी अखर्चीत र.रू.५०० कोटी वितरीत करण्यात आलेले आहेत. वार्षीक लेखे अंतिम व्हायचे असल्याने उर्वरीत रक्कम निर्धारीत करता येत नसली तरी सुमारे र.रू.२२५ कोटी शिल्लक राहण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/ महसुली/ विशेष योजना प अंदाजपत्रक यातून र.रू.२,११,५६,८३,१००/- वर्गीकरण करणेबाबतचे विषयपत्र लेखा/६/कावि/७१७४/२०१८ दि.१८/०६/२०१८ अन्वये मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेचे मान्यतेकामी सादर करण्यात आलेले होते. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२८२४ दि.१९/०६/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.२३६ दि.२०/०७/२०१८ अन्वये मा.महापालिका सभा ठराव क्र.२३६ दि.२२/०६/२०१८ मधील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अनुक्रमांक ५,६,७ ची कामे वगळुन ठराव मंजुर करणेत आलेला आहे. अनुक्रमांक ५,६,७ र.रू.९ कोटी आहे. र.रू.९ कोटी पैकी र.रू.३ कोटी शिल्लक आहे. सदरची शिल्लक रक्कम रू.३ कोटी धन्वंतरी स्वास्थ्य योजना करीता वर्गीकरण करून वाढीव देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाच्या अंदाजपत्रकात पानांक ३१९ वरील अ.क्रं. ०२ चे नावात बदल करणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे कामाचे नावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक | | नावात करावयाचा बदल |
|---|---|---|---|---|
| | | पानांक | अनु. क्र. | |
| १ | वॉर्ड क्र. १० मध्ये बर्डव्हॅली या उदयानांत फ्लोटींग म्युझीकल संगीत कारंजे व मल्टीमिडीया लेजर व एलईडी लाईट बसविणे व अनुषंगीक कामे करणे. | ३१९ | २ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे बर्डव्हॅली येथे लेजर शो करीता आवश्यक कामे करणे. |

तसेच मनपाचे ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विदयुत विभागाकडील देखभाल दुरुस्ती कामाकरीता तसेच अस्थायी अस्थापनेवरील प्रशिक्षणार्थी यांना वेतना करीता तरतूद अपुरी पडत असल्याने तसेच “सांगवी उप विभागातील ट्रॅफिक सिंग्नलची वार्षीक

देखभाल दुरुस्ती करणे सन २०१७-१८” हया चालू कामाचे नाव अंदाजपत्रकात समाविष्ट करुन त्यास खालीलप्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकात समावेश करावयाचे | | मुळ तरतूद | तरतूद वर्गीकरण व करावयाची | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पानांक . | अ.क्र. | | वाढ | घट |
| १ | परिशिष्ट ब अस्थापना खर्च स्थायी अस्थापना | ह क्षेत्रिय विदयुत विभाग | स्थायी अस्थापना | महसुली अंदाजपत्रक २ पानांक १८० | ४५ | ४५०००००० | ० | २३०००००० |
| २ | परिशिष्ट ब अस्थापना खर्च अस्थायी अस्थापना | ह क्षेत्रिय विदयुत विभाग | अस्थायी अस्थापना | महसुली अंदाज पत्रक २ पानांक १८१ | ४५ | २००००० | ३००००० | ० |
| ३ | हायड्रोलीक गाडया भाडयाने घेणे | ह क्षेत्रिय विदयुत विभाग | हायड्रोलीक गाडया भाडयाने घेणे | महसुली अंदाजपत्रक २ पानांक १११ | ९ | १०००००० | २०००००० | ० |
| ४ | प्रभाग क्र. ३२ मधील सांगवी गावठाण परिसरातील दिवे दुरुस्ती करीता अर्धकुशल कर्मचारी नेमणुक करणे व स्ट्रीट लाईट यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे. | ह क्षेत्रिय विदयुत विभाग | किरकोळ देखभाल दुरुस्ती | अंदाज पत्रक ३ पानांक ६९० | ३८ | ७५०००० | ० | २००००० |
| ५ | सांगवी उपविभागातील ट्रॅफिक सिग्नलची वार्षीक देखभाल दुरुस्ती करणे सन २०१७-१८ | ह क्षेत्रिय विदयुत विभाग | किरकोळ देखभाल दुरुस्ती | अंदाज पत्रक ३ पानांक ६९१ | ४९ | ० | २००००० | ० |
| | | | एकूण | | | ४६९५०००० | २५००००० | २५००००० |

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २८० विषय क्रमांक – ८

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/०६/कावि/९८४७/२०१८ दि.२९/०८/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१०४
दि.२९/०८/२०१८

शहर अभियंता, "ग क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य यांनी दि.४/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये “थेरगाव मध्ये डांगे चौकात श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळया भोवती म्युरल्स करणे तसेच सभोवतालचा परिसर सुशोभिकरण करणे” या कामास मा.स्थायी समितीने र.रु.३,४८,१३,४४७/- इतका सुधारीत खर्चास मान्यता मिळाली आहे. सदरचे कामास सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु.१५,००,०००/- इतकी तरतुद असुन सदरचे उर्वरीत काम पुर्ण करणेसाठी र.रु.१,१५,००,०००/- इतक्या तरतुदीची आवश्यकता आहे. सदर कामास मा.आयुक्त यांचे मंजुर प्रस्तावान्वये दि.३०/१०/२०१८ पर्यंत मुदत वाढ मंजुर करण्यात आली आहे. सदरचे काम वाढीव मुदतीमध्ये पुर्ण करणेत येणार असुन त्यास अंदाजपत्रकातील उपलब्ध असलेली र.रु.१५,००,०००/- इतकी तरतुद कमी पडणार आहे. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रु.१,००,००,०००/- (अक्षरी र.रू. एक कोटी फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अनुराधा गोरखे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ९

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.लेखा/०६/कावि/९७८९/२०१८ दि.२८/०८/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१०७

दि. ५/०९/२०१८

शहर अभियंता "अ क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य यांनी दि.९/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये स्थापत्य अ मुख्यालय या विभागाकडील सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील या स्थापत्य विषयक कामांसाठी अपुरी तरतूद आहे. स्थापत्य विशेष योजना, भांडवली व महसुली कामे या लेखाशिर्षातर्गत प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतुदी र.रु.२५,७०,०००/- (अक्षरी र.रू.पंचवीस लाख सत्तर हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देण्यात यावी. (वाढ/घट र.रू.२५.७०,०००/-)

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करण्याबाबत मा.स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश नसलेले व काम करणे आवश्यक असलेले काम खालीलप्रमाणे आहे. सदर कामाचा प्रथमत: अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे आवश्यक असल्याने खाली नमुद केलेल्या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस व सदर कामाच्या नावासमोर दर्शविलेली अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम २०१८-१९ |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २४ मधील पवारनगर चौक ते थेरगाव फाटा २४ मी.रुंद रस्त्याचे सुशोभिरिणाची कामे करणे. | १०,००,००,०००/- |

तसेच प्रभाग क्र. १० अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत असून सदर इमारतीमध्ये पार्कींग व्यवस्था अपुरी पडत असल्यामुळे पिंपरी

चिंचवड महानगरपालिकेची मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात Mechanical Parking System बसविणे आवश्यक आहे.

सबब खालील प्रमाणे नवीन कामाचा अंदाजपत्रकात समावेशास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये Mechanical Parking System बसविणे व इतर अनुषंगिक काम करणे. | २०,००,००,०००/- |

तसेच क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मलनि:सारण विषयक काही महसुली कामांसाठी अंदाजपत्रकीय रक्कम राहूल गेली असल्याने खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ ची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ चा मुळ अंदाज (तरतूद) | सन २०१८-१९ ची आवश्यक अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | च-होली मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र. २ मध्ये वार्षीक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणे. | ७५० | १ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | ० | ३०००००० | ६०००००० |
| २ | कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र. ६ मध्ये वार्षीक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणे. | ७५० | २ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | ० | २०००००० | ४०००००० |
| ३ | कासारवाडी | ७५० | ३ | किरकोळ | ० | २०००००० | ४०००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र. ८ मध्ये वार्षीक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणे. | | | देखभाल दुरुस्ती | | | |
| ४ | कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र. ९ मध्ये वार्षीक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणे. | ७५० | ४ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | ० | २०००००० | ४०००००० |
| | एकूण | | | | ० | ९०००००० | १८०००००० |

उपलब्ध तरतूदीनुसार वरील कामांसाठीच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करण्याबाबत मा.स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश नसलेले व काम करणे आवश्यक असलेले काम खालीलप्रमाणे आहे. सदर कामाचा प्रथमतः अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे अवश्यक आहे. तरी खाली नमुद केलेल्या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस व सदर कामाच्या नावासमोर दर्शविलेली अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण येथील अंतर्गत रस्ते आवश्यकतेनुसार कॉंक्रीटीकरण करणे. | ७,००,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण सर्व्हे नं. ९ येथे वाहनतळ विकसीत करणे. | ५,००,००,०००/- |

तसेच

| अ.क्र. | कामाचे नाव | पान | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८- | आवश्यक असणारी | सन २०१८- |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्र. | | | १९ अंदाज पत्रकात असणारी रक्कम अंदाजपत्रकातील रक्कम | अंदाजपत्रकीय रक्कम | १९ मधील तरतूद |
| १ | प्रभाग क्र.१७ सेक्टर क्र. २६ मध्ये नाटयगृह प्रकल्पाची उर्वरीत कामे करणे. | ५६ | ४६ | पर्यटन विकास आराखडा | १०५००००० | ३००००००००० | ७०००००० |

याप्रमाणे मान्यता देणेत यावी. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. २३६ दि.२०/०७/२०१८ च्या ठरावातील प्रस्तावात नमूद केलेल्या प्रभाग क्रं.२६ च्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कम चुकले असल्याने खालील प्रमाणे दुरुस्त करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | ठरावातील अनु.क्र. | कामाचे नाव | ठरावातील अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ८१ | प्रभाग क्र. २६ वाकड येथील कावेरी चौक, सब-वे ते पिंकसिटी कॉर्नरपर्यंत डी.पी. रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करणे. | २२००,००,०००/- | ३०,००,००,०००/- |
| २ | ९३ | प्र.क्र. २६ वाकड पिंपळे निलख येथे विवीध ठिकाणी विरंगुळा केंद्र तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | २०,००,००,०००/- | २,००,००,०००/- |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षातील खालील नमुद केलेल्या कामाच्या नावात दुरुस्ती/बदल करुन सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देणेत यावी.

| अनु. क्र. | अंदाजपत्रक | | अंदाजपत्रकातील कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | सुधारीत बदल करावयाचे नाव | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पान क्र. | अनु.क्र. | | | | | | | |
| १ | ३५ | १२५ | प्रभाग क्र. २५ ताथवडे येथील सर्व्हे नं. ९९ व १०० मधुन वाकड गावाकडे जाणारा २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. | १५२८५०० | प्रभाग क्र. २५ ताथवडे गावठाणापासून जीवननगर मार्गे सर्व्हे नं. ९९ व १०० मधुन पुनावळेकडे जाणारा २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. | ४००००००० | १०१९००० | २०००००० | ० |
| २ | २८ | २०९ | प्रभाग क्र. २५ वाकड येथील काळाखडक ते वाकड पोलीसस्टेशनकडे जाणारा विकास आराखडयातील २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. | १०००००००० | - | - | ० | २०००००० | ० |
| ३ | मुख्य अंदाज पत्रक क्र. १, पान क्र. २४४ | ३ | पाणीपुरवठा विशेष योजना निधी-रावेत येथील जुन्या बंधा-याचे खालील बाजूस नवीन बंधारा बांधणे. | - | - | - | ५००००००० | ० | ४००००००० |
| | | | एकूण | १०१५२८५०० | | ४००००००० | ५१०१९००० | ४००००००० | ४००००००० |

**मा.बापू उर्फ शत्रूघ्न काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.अनुराधा गोरखे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – २८१ विषय क्रमांक – ९

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/०६/कावि/९७८९/२०१८ दि.२८/०८/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१०७
दि. ५/०९/२०१८

शहर अभियंता "अ क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य यांनी दि.९/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये स्थापत्य अ मुख्यालय या विभागाकडील सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील या स्थापत्य विषयक कामांसाठी अपुरी तरतूद आहे. स्थापत्य विशेष योजना, भांडवली व महसुली कामे या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतुदी र.रु.२५,७०,०००/- (अक्षरी र.रू.पंचवीस लाख सत्तर हजार फक्त) वर्गीकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/घट र.रू.२५.७०,०००/-) तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करण्याबाबत मा.स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश नसलेले व काम करणे आवश्यक असलेले काम खालीलप्रमाणे आहे. सदर कामाचा प्रथमत: अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे आवश्यक असल्याने खाली नमुद केलेल्या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस व सदर कामाच्या नावासमोर दर्शविलेली अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम २०१८-१९ |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २४ मधील पवारनगर चौक ते थेरगाव फाटा २४ मी.रुंद रस्त्याचे सुशोभिरिणाची कामे करणे. | १०,००,००,०००/- |

तसेच प्रभाग क्र. १० अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत असून सदर इमारतीमध्ये पार्कींग व्यवस्था अपुरी पडत असल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात Mechanical Parking System बसविणे आवश्यक आहे.

सबब खालील प्रमाणे नवीन कामाचा अंदाजपत्रकात समावेशास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये Mechanical Parking System बसविणे व इतर अनुषंगिक काम करणे. | २०,००,००,०००/- |

तसेच क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मलनि:सारण विषयक काही महसुली कामांसाठी अंदाजपत्रकीय रक्कम राहूल गेली असल्याने खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पानांक | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ ची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ चा मुळ अंदाज (तरतूद) | सन २०१८-१९ ची आवश्यक अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | च-होली मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र. २ मध्ये वार्षीक ठेकेदारी | ७५० | १ | किरकोळ देखभाल | ० | ३०००००० | ६०००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणे. | | | दुरुस्ती | | | |
| २ | कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र. ६ मध्ये वार्षीक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणे. | ७५० | २ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | ० | २०००००० | ४०००००० |
| ३ | कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र. ८ मध्ये वार्षीक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणे. | ७५० | ३ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | ० | २०००००० | ४०००००० |
| ४ | कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र. ९ मध्ये वार्षीक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबरची देखभाल दुरुस्ती करणे. | ७५० | ४ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | ० | २०००००० | ४०००००० |
| | एकूण | | | | ० | ९०००००० | १८०००००० |

उपलब्ध तरतूदीनुसार वरील कामांसाठीच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करण्याबाबत मा.स्थायी समिती सभेच्या सूचना आहेत. सबब सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश नसलेले व काम करणे आवश्यक असलेले काम खालीलप्रमाणे आहे. सदर कामाचा प्रथमतः अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे अवश्यक आहे. तरी खाली नमुद केलेल्या कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस व सदर कामाच्या नावासमोर दर्शविलेली अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण येथील अंतर्गत रस्ते आवश्यकतेनुसार काँक्रीटीकरण करणे. | ७,००,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण सर्व्हे नं. ९ येथे वाहनतळ विकसीत करणे. | ५,००,००,०००/- |

तसेच

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम अंदाजपत्रकातील रक्कम | आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ सेक्टर क्र. २६ मध्ये नाटयगृह प्रकल्पाची उर्वरीत कामे करणे. | ५६ | ४६ | पर्यटन विकास आराखडा | १०५००००० | ३०००००००० | ७००००० |

याप्रमाणे मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. २३६ दि.२०/०७/२०१८ च्या ठरावातील प्रस्तावात नमूद केलेल्या प्रभाग क्रं.२६ च्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कम चुकले असल्याने खालील प्रमाणे दुरुस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | ठरावातील अनु.क्र. | कामाचे नाव | ठरावातील अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ८१ | प्रभाग क्र. २६ वाकड येथील कावेरी चौक, सब-वे ते पिंकसिटी कॉर्नरपर्यंत डी.पी. रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करणे. | २२००,००,०००/- | ३०,००,००,०००/- |
| २ | ९३ | प्र.क्र. २६ वाकड पिंपळे निलख येथे विवीध ठिकाणी विरंगुळा केंद्र तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | २०,००,००,०००/- | २,००,००,०००/- |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षातील खालील नमुद केलेल्या कामाच्या नावात दुरुस्ती/बदल करुन सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता देणेत येत आहे.

| अनु. क्र. | अंदाजपत्रक | | अंदाजपत्रकातील कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | सुधारीत बदल करावयाचे नाव | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पान क्र. | अनु.क्र. | | | | | | | |
| १ | ३५ | १२५ | प्रभाग क्र. २५ ताथवडे येथील सर्व्हे नं. ९९ व १०० मधुन वाकड गावाकडे जाणारा २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. | १५२८५०० | प्रभाग क्र. २५ ताथवडे गावठाणापासून जीवननगर मार्गे सर्व्हे नं. ९९ व १०० मधुन पुनावळेकडे जाणारा २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. | ४००००००० | १०१९००० | २००००००० | ० |
| २ | २८ | २०९ | प्रभाग क्र. २५ वाकड येथील काळाखडक ते वाकड पोलीसस्टेशनकडे जाणारा विकास आराखडयातील २४.०० मी. रुंद डी.पी. रस्ता विकसीत करणे. | १०००००००० | - | - | ० | २००००००० | ० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | मुख्य अंदाज पत्रक क्र. १, पान क्र. २४४ | ३ | पाणीपुरवठा विशेष योजना निधी-<br><br>रावेत येथील जुन्या बंधा-याचे खालील बाजूस नवीन बंधारा बांधणे. | - | - | - | ५०००००० | ० | ४००००००० |
| | | | एकूण | १०१५२८५०० | | ४०००००००० | ५१०१९००० | ४००००००० | ४००००००० |

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी-** मा.महापौर साहेब, विषय कमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २८२ विषय क्रमांक – १०

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/९७८८/२०१८ दि.२४/०८/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१०८ दि. ५/०९/२०१८

प्रशासकीय व कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सर्व प्रेक्षागृहे यांचे कामकाज स्वतंत्रपणे न ठेवता भौगोलिक क्षेत्रानुसार तेथील क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखली देणे आवश्यक असल्याने आदेश क्र. प्रशा/२/कावि/७१७/२०१७दि. २९/९/२०१७ अन्वये ह क्षेत्रिय कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले असुन तेथील कर्मचा-यांचे आस्थापना व वेतनविषयक कामकाज हे "ह" क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त आदेशानुसार व पत्र प्रशा/२/कावि/१०५/२०१८ दि. ५/४/२०१८ अन्वये आचार्य अत्रे रंगमंदिर व नटसम्राट निळु फुले रंगमंदीर येथील सन २०१८-१९ साठी महसुली जमा व महसुली खर्च याबाबत अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदी या "ह" क्षेत्रिय कार्यालय प्रशासन अंदाजपत्रकात लेखाशिर्षासह वर्ग करणे आवश्यक आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील आचार्य अत्रे प्रेक्षागृह लेखाशिर्ष ६ जमा र.रु ३३,३५,०००/- लेखाशिर्ष १५ खर्च र.रु १,०४,६१,९४०/- निळुभाऊ फुले नाट्यगृह लेखाशिर्ष ६ जमा र.रु.४७,१०,०००/- लेखाशिर्ष १६ खर्च र.रु.८९,०२,३८०/- लेखाशिर्षावर वर्गीकरण करावे लागेल. वरीलप्रमाणे क्षेत्रिय अधिकारी ह क्षेत्रिय कार्यालय यांना प्रस्तावित केलेनुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील आचार्य अत्रे प्रेक्षागृह लेखाशिर्ष ६ जमा र.रु ३३,३५,०००/- लेखाशिर्ष १५ खर्च र.रु.१,०४,६१,९४०/- निळुभाऊ फुले नाट्यगृह लेखाशिर्ष ६ जमा र.रु.४७,१०,०००/- लेखाशिर्ष १६ खर्च र.रु.८९,०२,३८०/- प्रस्तावात नमूद प्रमाणे या रक्कमा व लेखाशिर्ष "ह क्षेत्रिय" कार्यालयाकडे वर्गीकरण करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, विषय कमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २८३ विषय क्रमांक – ११

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/०६/कावि/९७९०/२०१८ दि.२८/०८/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१०९
दि. ५/०९/२०१८

शहर अभियंता, इ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य यांनी दि.९/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१८-१९ अंदाजपत्रकातील स्थापत्य “भांडवली कामे" या लेखाशिर्षावरील प्रस्तावात नमूद प्रमाणे चालू कामात तरतूद कमी पडत आहे. सदर चालू कामांवर मार्च २०१८ अखेर पुरेशी तरतूद करण्यात आली होती. तथापि सदर रस्त्याचे काम स्थानिक रहिवाशी यांनी अडविले होते. त्यामुळे रक्कम खर्च होऊ शकली नाही. सद्यस्थितीत जागा मालक यांनी काम करणेस मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे काम करणेत आलेले असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रु.२०,००,०००/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२०,००,०००/-)

**मा.अंबरनाथ कांबळे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, विषय कमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १२

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०३१३/२०१८ दि.५/९/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१३० दि. ५/०९/२०१८

सह शहर अभियंता, विद्युत विभाग यांनी दि.३१/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये तरतूद वर्गीकरणाबाबत व कामांची वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमांना प्रशासकीय मान्यता घेणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील विद्युत मुख्य कार्यालयांतर्गत असलेल्या क्षेत्रिय कार्यालयांना कामांचे आवश्यकतेनुसार अंदाजपत्रकात करणेत आलेल्या तरतूदीपेक्षा वाढीव रकमांची आवश्यकता आहे. याकामी चालू कामांतील शिल्लक रकमा व आवश्यक नसलेल्या/ रद्द कामांवरील शिल्ल्क तरतूद रकमा इतर कामांवर वर्ग करता येईल. तसेच ज्या कामांना मुळ प्रशासकीय रक्कम कमी आहे त्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणेची आवश्यकता आहे, याकामी भांडवली अ अंदाजपत्रक, प अंदाजपत्रक, महसुली अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ व घट करता येईल. तसेच पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकरीता आवश्यक असलेल्या कामाकरीता रक्कम ही प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे उपलब्ध करुन देता येईल. त्याकामी विभागा अंतर्गत र.रु.७,७८,८४,७९१/- वर्गीकरण करणेस व उपरोक्त कामांची वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमांना प्रशासकीय मान्यता देणेत यावी. (वाढ/घट र.रू. ७,७८,८४,७९१/-) तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयांतर्गत फ क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रस्तावात नमूद केलेल्या कामांवर सन २०१८-२०१९ करिता तरतूद कमी असल्याने या कामा करिता स्थापत्य मुख्य कार्यालयाने तरतूद उपलब्ध करून दिली आहे त्यानुसार अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट र.रू.२३,००,०००/- करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - तसेच प्रभाग क्र. २८ मधील नाशिक फाटा ते वाकड या बीआरटीएस रस्त्यावर गोविंद गार्डन चौक येथे सबवे बांधणेचे काम स्थापत्य विभागामार्फत चालु आहे.सदर ठिकाणी उच्चदाब विज वाहिनी सब वे ला अडथळा करीत असल्याने, सब वेचे काम थांबलेले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी नागरीकांना वाहतुक कोंडीस सामोरे जावे लागत आहे. याकरीता सदरची अडथळा करणारी उच्चदाब विज वाहिनी त्वरीत हलविणे करीता विदयुत विषयक कामे करणे अत्यावश्यक आहे. याकरीता प्रभाग क्र. २८ मधील नाशिक फाटा ते वाकड या बीआरटीएस रस्त्यावर गोविंद गार्डन चौक येथे सबवे बांधणे या कामांतर्गत विदयुत विषयक कामे करणे. या कामाचा विदयुत विभागाचे अंदाजपत्रकातील "स्थापत्य प्रकल्पांतर्गत विदयुत विषयक कामे करणे" या लेखाशिर्षावर समावेश करुन सदर कामाकरीता आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. ९० लक्ष देण्यास तसेच सदर कामाकरीता आवश्यक तरतूद रक्कम रु. ५० लक्ष ही गोविंद गार्डन चौक येथे सबवे बांधणेचे काम मनपा अंदाजपत्रकातील "केंद्रशासन पुरस्कृत योजना" या लेखाशिर्षावरील पानांक ५२३ अ.क्र. २९ वरील, कामाचे प्रशासकीय मान्यता र.रु. १० कोटी तसेच तरतूद र.रु. ६.५० कोटी यामधुन वर्ग करणेस मान्यता देणेत यावी. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रं.२३६ दि. २०/०७/२०१८ च्या ठरावातील प्रस्तावात नमूद केलेल्या प्रभाग क्रं.२६ च्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कम चुकले असल्याने खालील प्रमाणे दुरुस्त करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | ठरावातील अनु क्र. | कामाचे नाव | ठरावातील अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ८१ | प्रभाग क्र. २६ वाकड येथील कावेरी चौक, सबवे ते पिंकसिटीकॉर्नर डी.पी.रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करणे. | २२००,००,०००/- | ३०,००,००,०००/- |
| २ | ९३ | प्र.क्र.२६ वाकड पिंपळेनिलख | २०,००,००,०००/- | २,००,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | येथे विवीध ठिकाणी विरंगुळा केंद्र तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | | |

**मा. नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.
**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २८४ विषय क्रमांक – १२
दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०३१३/२०१८ दि.५/९/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१३० दि. ५/०९/२०१८

सह शहर अभियंता, विद्युत विभाग यांनी दि.३१/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये तरतूद वर्गीकरणाबाबत व कामांची वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमांना प्रशासकीय मान्यता घेणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील विद्युत मुख्य कार्यालयांतर्गत असलेल्या क्षेत्रिय कार्यालयांना कामांचे आवश्यकतेनुसार अंदाजपत्रकात करणेत आलेल्या तरतूदीपेक्षा वाढीव रकमांची आवश्यकता आहे. याकामी चालू कामांतील शिल्लक रकमा व आवश्यक नसलेल्या/ रद्द कामांवरील शिल्ल्क तरतूद रकमा इतर कामांवर वर्ग करता येईल. तसेच ज्या कामांना मुळ प्रशासकीय रक्कम कमी आहे त्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणेची आवश्यकता आहे, याकामी भांडवली अ अंदाजपत्रक, प अंदाजपत्रक, महसुली अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ व घट करता येईल. तसेच पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकरीता आवश्यक असलेल्या कामाकरीता रक्कम ही प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे उपलब्ध करुन देता येईल. त्याकामी विभागा अंतर्गत र.रु.७,७८,८४,७९१/- वर्गीकरण करणेस व उपरोक्त कामांची वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे (वाढ/घट र.रू. ७,७८,८४,७९१/-) तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयांतर्गत फ क्षेत्रिय

कार्यालयाकडील प्रस्तावात नमूद केलेल्या कामांवर सन २०१८-२०१९ करिता तरतूद कमी असल्याने या कामा करिता स्थापत्य मुख्य कार्यालयाने तरतूद उपलब्ध करून दिली आहे त्यानुसार अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट र.रू.२३,००,०००/- करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. २८ मधील नाशिक फाटा ते वाकड या बीआरटीएस रस्त्यावर गोविंद गार्डन चौक येथे सबवे बांधणेचे काम स्थापत्य विभागामार्फत चालु आहे.सदर ठिकाणी उच्चदाब विज वाहिनी सब वे ला अडथळा करीत असल्याने, सब वेचे काम थांबलेले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी नागरीकांना वाहतुक कोंडीस सामोरे जावे लागत आहे. याकरीता सदरची अडथळा करणारी उच्चदाब विज वाहिनी त्वरीत हलविणे करीता विदयुत विषयक कामे करणे अत्यावश्यक आहे. याकरीता प्रभाग क्र. २८ मधील नाशिक फाटा ते वाकड या बीआरटीएस रस्त्यावर गोविंद गार्डन चौक येथे सबवे बांधणे या कामांतर्गत विदयुत विषयक कामे करणे. या कामाचा विदयुत विभागाचे अंदाजपत्रकातील “स्थापत्य प्रकल्पांतर्गत विदयुत विषयक कामे करणे” या लेखाशिर्षावर समावेश करुन सदर कामाकरीता आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. ९० लक्ष देण्यास तसेच सदर कामाकरीता आवश्यक तरतूद रक्कम रु. ५० लक्ष ही गोविंद गार्डन चौक येथे सबवे बांधणेचे काम मनपा अंदाजपत्रकातील “केंद्रशासन पुरस्कृत योजना” या लेखाशिर्षावरील पानांक ५२३ अ.क्र. २९ वरील, कामाचे प्रशासकीय मान्यता र.रु. १० कोटी तसेच तरतूद र.रु. ६.५० कोटी यामधुन वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रं.२३६ दि. २०/०७/२०१८ च्या ठरावातील प्रस्तावात नमूद केलेल्या प्रभाग क्रं.२६ च्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कम चुकले असल्याने खालील प्रमाणे दुरुस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | ठरावातील अनु क्र. | कामाचे नाव | ठरावातील अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ८१ | प्रभाग क्र. २६ वाकड येथील कावेरी चौक, सबवे ते पिंकसिटीकॉर्नर डी.पी.रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करणे. | २२००,००,०००/- | ३०,००,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ९३ | प्र.क्र.२६ वाकड पिंपळेनिलख येथे विवीध ठिकाणी विरंगुळा केंद्र तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | २०,००,००,०००/- | २,००,००,०००/- |

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सीमा चौगुले -** मा.महापौर साहेब, विषय कमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १३

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.वि/मुका/तां.वि/३४७/२०१८, दि.१६/०७/२०१८
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१५
दि.२८/०८/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सन २०१२-१३ पासून ऊर्जासंवर्धनाच्या दृष्टीकोनातून जुने सोडियम व्हेपर/मेटल हालाईड दिवे/टि-५(९६ वॅट) काढून एलईडी दिवे बसविणेची कामे सुरू आहेत. महापालिकेच्या उर्जा संवर्धनाच्या दृष्टीने सोडियम व्हेपर/ /टि-५/सीएफएल/मेटल हालईड दिव्याच्या ऐवजी रस्त्याच्या प्रकारानुसार आवश्यक प्रकाश प्रमाण राखणेकरीता (लक्स लेव्हल) उर्वरीत एलईडी व्यतिरिक्त दिव्यांच्या ठिकाणी योग्य क्षमतेचे एलईडी दिवे बसविणेकामी सर्वे करणे, डीपीआर बसविणे व पर्यवेक्षण करणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.ऊर्जा नियोजन प्रा.लि.पुणे यांची नेमणूक करणेत आली आहे. मे.ऊर्जा नियोजन प्रा. लि. पुणे यांनी सर्वेचे कामकाज पुर्ण केलेले असून प्राप्त सर्वेनुसार अहवाला नुसार सुमारे ३८७५५ इतके विविध क्षमतेचे एलईडी दिवे विविध रस्त्यावर बसविणेत आलेले असून अद्यापपर्यंत

सुमारे ३६१३४ दिवे सोडियम व्हेपर/ /टि-५/सीएफएल/मेटल हालाईड (MH) या प्रकारचे आहेत. सदरचे काम स्वखर्चातून किंवा ईस्क्रो माध्यमातून करावयाचे नियोजन मनपाचे होते. तथापि ईस्क्रो तत्वावर एलईडी दिवे बसविणेसाठी राज्य शासनाने ईईएसएल सोबत करारनामा केलेला आहे. त्यानुसार राज्य शासनाने त्यांचेकडील दि.१२ जानेवारी २०१८ चे शासन निर्णयानुसार सर्व नागरी संस्थानी पथ दिव्यांसाठी फक्त एलईडी दिवे बसविणे व त्यासाठी ईईएसएल सोबत करारनामा करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार मे.ईईएसएल कडून विहित केलेल्या तक्त्यामध्ये माहिती मागविणेत आली होती. मनपाने सादर केलेल्या माहितीनुसार मे.ईईएसएल कडून प्रकल्प प्रस्ताव (Project Proposal) व करारनामा मसुदा (Draft Agreement) पाठविला आहे. त्याबाबत सविस्तर माहिती खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे. सद्यस्थितीत मनपा हद्दीत एकूण दिव्यांची संख्या सुमारे - ७४८८९ इतकी आहे. एकूण विद्युत भार - १०.०६ MW एलईडी बसविण्यात आलेल्या दिवाबत्तीची संख्या - ३८७५५, एलईडी बसविण्यात आलेल्या एलईडी विद्युत भार -३.२७ MW, ईईएसएल कडून एलईडी बसवावयाच्या दिव्यांची संख्या - ३६१३४ एवढी आहे. वार्षिक दिवाबत्तीचे वीजबील अंदाजे र.रू.२७.३९ कोटी (सर्व दिवे चालू स्थितीत गृहीत धरून) ईईएसएल मार्फत ईस्क्रो तत्वावर (cost sharing based) जुने पारंपारिक फिटींग काढून एलईडी फिटींग बसविणेत येणार आहे. फिटींग्सची वॉरंटी ७ वर्षे (इन्शूरन्सह) आहे. मध्यवर्ती नियंत्रीत कक्षातून दिवे नियंत्रीत करणारी यंत्रणा (CCMS) चादेखील अंतर्भाव आहे. बसविलेल्या एलईडी दिव्यांची देखभाल व दुरूस्ती काम ईईएसएल मार्फतच करण्यात येणार आहे. होणा-या उर्जा बचतीकरीता राष्ट्रिय बँकेत उर्जा बचत स्वंतत्र खाते उघडावे लागेल. होणा-या उर्जा बचत व देखभाल व दुरूस्ती कामावर लागणारा खर्च बचतीतून एन्यूटी बेसीसवर ईईएसएल यांना अदा करावा लागेल.

ईईएसएल ने सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावानुसार खालील बाबी दिसून येतात –

1. सदरचा प्रकल्प ईस्क्रो तत्वावर राबविणेत येणार असून सुरवातीस महापालिकेस कोणताही खर्च करावा लागणार नाही.
2. सध्यस्थितीतील दिव्यांचा तसेच एलईडी बसविणेत आलेनंतर दिव्यांच्या प्रकाश तीव्रतेचा संयुक्तीक पाहणी करून अहवाल तयार करणेत येणार आहे.
3. नॅशनल लाईटींग कोड नुसार रस्त्यावर आहे तशीच किंवा त्यापेक्षा जास्त

सुधारित लक्स लेवल ठेऊन दिव्यांचे वॅटेज निश्चित केले जाणार आहे.

4. एलईडी फिटींगची वॉरंटी कालावधी देखभाल व दुरूस्तीसह सात वर्षाचा असून प्रत्यक्ष होणा-या वीजबचतीतून ॲन्यूटी बेसीसवर ईईएसलला प्रतिवर्षी निर्धारित केलेली रक्कम वर्षाकरिता अदा करावी लागणार आहे.
5. सदर कामामध्ये एलईडी फिटींग बसविणेत येत असलेल्या ठिकाणी ब्रॅकेट, क्लॅम्प साहित्य व वायर कामाचा समावेश आहे.
6. सदर कामामध्ये एलईडीसह व सीसीएमएस यंत्रणा बसविणे कामाचा समावेश आहे.
7. मनपाने उर्जा बचतीतून प्राप्त झालेली रक्कम भरणेकरीता राष्ट्रिय बॅंकेत स्वतंत्र रित्या एस्क्रो खाते (escrow) उघडून सुरवातीला ॲन्यूटीच्या (प्रतिवर्षी निर्धारित केलेल्या रक्कमेच्या) तीन महिन्यांची रक्कम सदर खात्यात मनपाला जमा करावी लागणार आहे.
8. एलईडी दिवे बसविलेनंतर दिव्यांची संपूर्ण देखभाल दुरूस्ती ईईएसएल मार्फत करण्यात येणार आहे मात्र पायाभूत सुविधेकरीता जादा होणारा खर्च मनपास करावा लागणार आहे.

तरी मे.ईईएसएल यांचेकडून पारंपारिक दिवे बदलून एलईडी दिवे बसविणे व तदनंतर होणा-या वीजबचतीतून ॲन्यूटी बेसीस वर निर्धारित रक्कम पुढील *7* वर्षांकरिता प्रतिवर्षी मे.ईईएसएलला ईस्क्रो खाते काढून अदा करणेसाठी करारनामा करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.चंदा लोखंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रामंक – २८५ विषय क्रमांक – १३

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.वि/मुका/तां.वि/३४७/२०१८, दि.१६/०७/२०१८
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१५
दि.२८/०८/२०१८

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सागर गवळी -** मा.महापौर सहोब, विषय क्रमाक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १४

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१५/२०१८
दि.२५/०६/२०१८
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.२४५ दि.२०/०७/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २६१ दि.६/०९/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागा मार्फत महानगरपालिका हद्दीमधिल ओला व सुका कचरा संकलन करण्यात येत असून प्रत्येक प्रभाग स्थरावर कचरा संकलनासाठी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठी छोट्या वाहनांची व्यवस्था महानगरपालिके मार्फत करण्यात आलेली आहे. तथापी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठीची वाहने पार्किंग करण्यासाठी स्वतंत्र

व्यवस्था नाही. त्यामुळे महानगरपालिका हद्दीमध्ये महानगरपालिकेच्या नियोजन प्राधिकरण कक्षेमधिल काही आरक्षित जागांमध्ये “ट्रान्सफर स्टेशन” या प्रयोजनार्थ जागा आरक्षित करणे आवश्यक वाटते. त्यास अनुसरुन मा. आयुक्त यांचा दिनांक २८/०७/२०१७ चे मंजूर प्रस्तावानुसार, तसेच आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २२/०३/२०१७ चे पत्रान्वये मागणी मौजे भोसरी (कासारवाडी) आ.क्र.३१ एस.टी.पी. अंतर्गत स.नं.५१४, मौजे सांगवी मधिल हरितपट्ट्यातील स.नं.८४, व मौजे भोसरी आ.क्र.४०५ अंतर्गत स.नं.२१० या ठिकाणी ४०० चौ.मी. क्षेत्राची जागा, तसेच मौजे पिंपळे निलख आ.क्र.३७४ गार्डन अंतर्गत स.नं.६५ मधिल ४०० चौ. मी. क्षेत्राची जागा १२.०० मी. रुंद पोहच रस्त्यासह महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये “ट्रान्सफर स्टेशन” या प्रयोजनार्थ आरक्षित करणेचा फेरबदल बाबत सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करणेस मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-या विषयातील ट्रान्स्फर स्टेशनसाठी मौजे पिंपळे निलख आ.क्र.३७४ गार्डन अंतर्गत स.नं. ६५ मधील ४०० चौ.मी. क्षेत्राची जागा १२.०० मी. रुंद पोहच रस्त्यासह गार्डनसाठी आरक्षित असल्याने सदरची जागा ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठी वाहने पार्किग करिताचे “ट्रान्सफर स्टेशन” आरक्षणाचे फेरबदलातून वगळण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड  महानगरपालिका, हद्दीतील मौजे पुनावळे येथील मंजूर विकास योजनेतील स.नं. १,२,६,८,९,१० व ११ मधील १८ मी. रुंद रस्ता (औंध-रावेत बीआरटी ते मुंबई-बेंगलोर हायवे) व मौजे पुनावळे येथील मंजूर विकास योजनेतील स.नं. ४४,५० व ५१ मधील १८ मी. रस्ता (मुंबई-बेंगलोर हायवे ते पुनावळे) प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्याचे काही क्षेत्र मनपाच्या ताब्यात आलेले आहे परंतु काही मिळकतधारक जागा मुद्दाम ताब्यात देत नाहीत त्यामुळे सदर भागातील रस्ता विकसीत करता येत नाही त्यामुळे नागरिकांची रस्त्याअभावी अडचण निर्माण झाली आहे त्यामुळे सदर रस्ता भूसंपादनाने ताब्यात घेणे आवश्यक आहे.

तरी मौजे पुनावळे येथील मंजूर विकास योजनेतील स.नं. १,२,६,८,९,१० व ११ मधील १८ मी. रुंद रस्ता (औंध-रावेत बीआरटी ते मुंबई-बेंगलोर हायवे) व मौजे

पुनावळे येथील मंजूर विकास योजनेतील स.नं. ४४,५० व ५१ मधील १८ मी. रस्ता (मुंबई-बेंगलोर हायवे ते पुनावळे) रस्त्याखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.सागर गवळी -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रामंक – २८६ विषय क्रमांक – १४

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१५/२०१८ दि.२५/०६/२०१८
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.२४५ दि.२०/०७/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २६१ दि.६/०९/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागा मार्फत महानगरपालिका हद्दीमधिल ओला व सुका कचरा संकलन करण्यात येत असून प्रत्येक प्रभाग स्थरावर कचरा संकलनासाठी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठी छोट्या वाहनांची व्यवस्था महानगरपालिके मार्फत करण्यात आलेली आहे. तथापी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठीची वाहने पार्किंग करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे महानगरपालिका हद्दीमध्ये महानगरपालिकेच्या नियोजन प्राधिकरण कक्षेमधिल काही आरक्षित जागांमध्ये “ट्रान्सफर स्टेशन” या प्रयोजनार्थ जागा आरक्षित करणे आवश्यक वाटते. त्यास अनुसरुन मा. आयुक्त यांचा दिनांक २८/०७/२०१७ चे मंजूर प्रस्तावानुसार, तसेच आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २२/०३/२०१७ चे पत्रान्वये मागणी मौजे भोसरी (कासारवाडी) आ.क्र.३१ एस.टी.पी. अंतर्गत स.नं.५१४, मौजे सांगवी मधिल हरितपट्ट्यातील स.नं.८४, व मौजे भोसरी आ.क्र.४०५ अंतर्गत स.नं.२१० या ठिकाणी ४०० चौ.मी. क्षेत्राची जागा, तसेच मौजे पिंपळे निलख आ.क्र.३७४ गार्डन अंतर्गत स.नं.६५ मधिल ४०० चौ. मी. क्षेत्राची

जागा १२.०० मी. रुंद पोहच रस्त्यासह महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये “ट्रान्सफर स्टेशन” या प्रयोजनार्थ आरक्षित करणेचा फेरबदल बाबत सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करणेस मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच या विषयातील ट्रान्स्फर स्टेशनसाठी मौजे पिंपळे निलख आ.क्र.३७४ गार्डन अंतर्गत स.नं. ६५ मधील ४०० चौ.मी. क्षेत्राची जागा १२.०० मी. रुंद पोहच रस्त्यासह गार्डनसाठी आरक्षित असल्याने सदरची जागा ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठी वाहने पार्किग करिताचे “ट्रान्सफर स्टेशन” आरक्षणाचे फेरबदलातून वगळण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड  महानगरपालिका, हद्दीतील मौजे पुनावळे येथील मंजूर विकास योजनेतील स.नं. १,२,६,८,९,१० व ११ मधील १८ मी. रुंद रस्ता (औंध-रावेत बीअरटी ते मुंबई-बेंगलोर हायवे) व मौजे पुनावळे येथील मंजूर विकास योजनेतील स.नं. ४४,५० व ५१ मधील १८ मी. रस्ता (मुंबई-बेंगलोर हायवे ते पुनावळे) प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्याचे काही क्षेत्र मनपाच्या ताब्यात आलेले आहे परंतु काही मिळकतधारक जागा मुद्दाम ताब्यात देत नाहीत त्यामुळे सदर भागातील रस्ता विकसीत करता येत नाही त्यामुळे नागरिकांची रस्त्याअभावी अडचण  निर्माण झाली आहे त्यामुळे सदर रस्ता भूसंपादनाने ताब्यात घेणे आवश्यक आहे.

तरी मौजे पुनावळे येथील मंजूर विकास योजनेतील स.नं. १,२,६,८,९,१० व ११ मधील १८ मी. रुंद रस्ता (औंध-रावेत बीअरटी ते मुंबई-बेंगलोर हायवे) व मौजे पुनावळे येथील मंजूर विकास योजनेतील स.नं. ४४,५० व ५१ मधील १८ मी. रस्ता (मुंबई-बेंगलोर हायवे ते पुनावळे) रस्त्याखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनूकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १५

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
मातंवि/२/कावि/३०/१८ दि.८/०८/२०१८
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २६५ दि.६/०९/२०१८

केंद्र शासनामार्फत नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी स्वच्छ, शाश्वत व पर्यावरण पुरक शहरे तयार करण्यासाठी "स्मार्ट सिटी अभियान" या महत्वकांक्षी अभियानाची घोषणा मा. प्रधानमंत्री महोदयांच्या हस्ते दि. २५/०६/२०१५ रोजी करणेत आलेली होती.

केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार Smart City Proposal तयार करणेकरिता चार मुख्य पर्याय सुचवले आहेत. १) Retrofitting २) Redevelopment ३) Green Field आणि ४) १ ते ३ पैकी पर्यायांचा एकत्रित अवलंब करणे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने Retrofitting या पर्यायाचा प्राधान्याने वापर करून Smart City Proposal तयार केलेले आहे. महानगरपालिकामार्फत तयार करणेत आलेल्या Smart City Proposal मध्ये प्रामुख्याने Area Based Development (ABD) आणि Pan City Solutions हे दोन घटक असून त्यांचे करीता एकूण र.रू.११४९.२ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पांचा समावेश आहे. त्यापैकी Area Based Development (ABD) चे अंतर्गत एकूण र.रू.५९३.६७ कोटी इतक्या व Pan City Solutions अंतर्गत एकूण र.रू ५५५.५३ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पांचा समावेश करणेत आलेला आहे.

केंद्र शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी अभियानांतर्गत तिस-या फेरीत निवड केलेनंतर राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरीता विशेष उद्देश वहन(एस.पी.व्ही) स्थापन करणेबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. स्मार्टसि-२०१६/प्र.क्र.५०३/नवि -२३ दि.९ जानेवारी २०१७ अन्वये

मान्यता दिलेली असुन महानगरपालिकेने विशेष उद्देश वहन(एस.पी.व्ही) चे तात्काळ गठन करणेकामी निर्देश दिलेले होते व महाराष्ट्र शासनाकडुन निश्चित केलेल्या अटी शर्तीनुसार दि. १३ जुलै २०१८ रोजी " पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड " या नावाने विशेष उद्देश वहन स्थापन करणेत आलेली आहे.

केंद्र शासनाने घोषित केलेल्या स्मार्ट सिटी अभियानाचा कालावधी पाच वर्ष असुन या योजनेत प्रत्येक पात्र शहराला पाच वर्षाच्या कालावधीत अंदाजे रु. ५०० कोटींचे केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होणार असुन राज्य शासनाचा अनुदान हिस्सा रु. २५० कोटी व महानगरपालिकेचा स्वहिस्सा अंदाजे रु. २५० कोटी द्यावा लागेल. याप्रमाणे अभियानाचे पाच वर्ष कालावधीत महानगरपालिकेस अंदाजे एकुण र.रु १००० कोटी पर्यंतचे प्रकल्प स्मार्ट सिटी अभियानाचे निर्देशानुसार पुर्ण करावे लागतील. त्यामध्ये शहारातील नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा, खात्रीशीर वीज पुरवठा, शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, कार्यक्षम शहरी दळणवळण व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सक्षम इंटरनेट सुविधा, शहरी आरोग्य आणि शिक्षण सुविधा, ई-गर्व्हनन्स व नागरिकांचा सहभाग, शाश्वत पर्यावरण, नागरिकांची सुरक्षा व संरक्षण इ. घटकांचा समावेश असेल. या सर्व बाबींचा समावेश करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्मार्ट सिटी प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे दि. ३१/३/२०१७ रोजी सादर करणेत आलेले आहे. त्यास मा. महापालिका सभेने ठराव क्र. २९ दि.१९/०७/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तथापी, वरील प्रकल्प स्मार्ट सिटी कंपनीमार्फत राबविताना महापालिकेच्या मालकीच्या जागा, रस्ते, उद्याने, विद्युत पोल, मनपा हद्दीतील चौक, शाळा, इमारती व इतर मालमत्तांचा वापर करणे आवश्यक आहे.

सबब, स्मार्ट सिटी योजने अंतर्गत PAN City प्रकल्प व Area Based Development (ABD) प्रकल्प राबविणेकामी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड या विशेष उद्देश वहनास मनपाच्या मालकीची जागा, रस्ते, उद्याने, विद्युत पोल, मनपा हद्दीतील चौक, शाळा, इमारती व इतर मालमत्तांचा वापर करणेस मान्यता मिळणेकामी व त्याअनुषंगीक परवानगी देणेचे अधिकार पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीस देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी स्मार्ट सिटी योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजूर केलेल्या स्मार्ट सिटी आराखडयातील PAN City प्रकल्प व Area Based Devlopment (ABD) प्रकल्प राबविणेकामी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमीटेड या विशेष उद्देश वहनास मनपाच्या मालकीची जागा, रस्ते, उदयाने, विदयुत पोल, मनपा हद्दीतील चौक, शाळा, इमारती व इतर मालमत्तांचा वापर करणेस मान्यता देणेकामी व त्याअनुषंगीक परवानगी देणेचे अधिकार पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमीटेड कंपनीस देणे ऐवजी उक्त सर्व अधिकार मा.आयुक्त सो., पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना देणेस मान्यता देणेत यावी तसेच स्मार्ट सिटीच्या आराखडया व्यतिरीक्त कामे स्मार्ट सिटी एस.पी.व्ही. मार्फत राबवावयाचे ठरल्यास प्रस्ताव परत सर्वसाधारण सभेसमोर आणणेस मान्यता देणेत यावी.

**मा. सागर आंगोळकर –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.अजित गव्हाणे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह महापौर साहेब स्मार्टसिटी अंतर्गत मगाशी आयुक्त साहेबांनी खुलासा केलेला आहे. पूर्वी आपल्याला स्मार्टसिटीत घेतले नव्हत. आम्ही सगळे लोक त्याठिकाणी दिल्लीला गेलो होतो. आमच्या शहराला स्मार्टसिटीतून वगळले. त्यासाठी आम्ही प्रयत्न केले परंतु ते नंतर झाले. कुणीतरी त्याच्यातून माघार घेतली आणि नंतर मग आपल्या शहराला स्मार्टसिटी अंतर्गत घेण्यात आले. तर हयाच्यामध्ये साहेब पूर्वी सुध्दा आम्ही अस म्हणत होतो की याच्यामध्ये स्मार्टसिटी करताना तुम्ही पिंपळेगुरव आणि पिंपळे सौदागरची निवड केली. मुळातच ही शहरं ही दोन गावे आहेत ती ऑलरेडी स्मार्ट आहेत. साहेब, दोन गावं इतकी चांगली आहेत. त्याठिकाणी परदेशातला माणूस जरी आणला तरी तो सुध्दा म्हणेल की खूप चांगल गाव आहे. आम्हाला असं वाटत होतं की जस जेएनएनयुआरएममध्ये वेगवेगळया ठिकाणी फंडस मिळणार आहेत. तस जर होत असेलतर स्मार्टसिटीमध्ये एका विशिष्ट भागामध्ये निधी दिला जातो. हा इतर भागामध्ये अन्याय होतोय. महापौर साहेब, तुम्ही चिखलीचे आहात स्मार्टसिटी चिखलीला करा नाहीतर आमच्या भोसरीला दया. महापौर साहेब, आपण महापौर आहात भोसरीसाठी तुम्ही प्रयत्न करावेत. आयुक्त साहेब, तिथल्या दोन तीन शाळा जरी

घेतल्या त्याच्यामध्ये चिखलीची शाळा घेतली. चिखलीच्या एका शाळेची निवड जर तुम्ही त्याठिकाणी केली किंवा भोसरीच्या एखादया शाळेची निवड तुम्ही केली तर मला वाटत खूप चांगल झालं असतं. महापौर साहेब, तुमच्याकडून आमच्या खूप अपेक्षा आहेत. तुम्ही ग्रामीण भागातले महापौर आहात तुम्हाला याठिकाणी पक्षाने संधी दिलेली आहे आणि तुमचं काम खरच चांगल आहे. गेल्या महिन्या दोन महिन्यात जेव्हापासून तुम्ही महापौर झालेला आहात. जे निर्णय तुम्ही घेतलेले आहेत. ज्या ज्या बैठका घेतल्यात विशेषत: पाणीपुरवठयाची बैठक तुम्ही घेतलीत. त्या बैठकीमध्ये तुम्ही या शहराला ख-या अर्थाने मगाशी कुठल्या तरी महिला सदस्यांनी पाण्याचा प्रश्न मांडण्याचा प्रयत्न याठिकाणी केला. आपल्या शहराला ख-या अर्थाने इथून पुढच्या काळामध्ये चांगला पाणीपुरवठा व्हायचा असेल तर आपल्याला आंद्रा आणि भामा आसखेड या धरणातून पाणी आले पाहिजे. या दृष्टीकोनातून प्रयत्न आपण करताय त्याबद्दल निश्चितपणे आनंद आहे. आमचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा निश्चितपणे पाठींबा आहे. आम्ही विरोधासाठी विरोध कधीच करणार नाहीत. परंतु स्मार्टसिटीअंतर्गत बापू काटेंना जरी खाजगीत विचारल किंवा नाना काटेंना विचारल खरच तुमच्या गावाला स्मार्टसिटी घ्याव का तर दोघांचेही मत याबाबतीत एक येईल. त्यामुळे महापौर साहेब, आपल्याला माझी विनंती आहे की तुम्ही आयुक्तांना आणि संपूर्ण या स्मार्टसिटीमध्ये जे लोक काम करतात त्यांना विनंती करा त्यात आमचे विरोधी पक्षनेते आहेत, प्रमोद कुटे आहेत, शिवसेनेचे गटनेते आहेत, मनसेचे आहेत, पक्षनेते आहेत ही सगळी जी मंडळी आहेत या सगळयांना माझी विनंती आहे की स्मार्टसिटीमध्ये आमच्या भोसरीची निवड आपण करावी आणि भोसरीचाही विकास करावा. अशा प्रकारची अपेक्षा या निमित्ताने मी आपल्याकडे करतो.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह खरतर आदरनीय अजितभाऊ गव्हाणे यांनी जी सुचना मांडली त्याला माझे अनुमोदन आहे. खरतर याच्यावर अगोदरच बरीच काही चर्चा झालेली आहे. मला वाटतं हे सगळं डोंगरावरुन पाणी वाहून गेलेले आहे. का डोंगराच्या खालून गेले आहे. याविषयाबाबत स्मार्टसिटीमध्ये ज्यावेळेस काही चर्चा झाली. त्यावेळेस महापौर तुम्ही नव्हता आणि मी पण त्यावेळेस विरोधी पक्षनेता नव्हतो. या काळामध्ये जे सन्माननीय सदस्य याच्यामध्ये होते. त्यांच्या कार्यकाळामध्ये महापौर साहेब खरच स्मार्टसिटीमध्ये खूप

मोठा त्या काळात अन्याय झालेला आहे. ज्या पध्दतीने स्मार्टसिटीचा प्रकल्प राज्याच्या, केंद्राच्या समोर आला आहे. परंतु जो एरिया पहिलाच पूर्ण स्मार्ट आहे तसं अजितभाऊपनी सांगितले आहे की राष्ट्रवादी काँगेसच्या काळातच तो एरिया तसा खूप सुंदर आणि चांगला होता. जर खरच स्मार्टसिटीमध्ये घ्यायच होतं तस महापौर आता आपण दोघ मिळून हा निर्णय घेऊ. कारण आपण आता त्यामध्ये आहोत. आमचे महापौर स्मार्ट आहेत. असं सगळेच म्हणतात. तर स्मार्ट विकास आपल्या परिसरामध्ये व्हावा. जसे आपल्या ग्रामीण भागातील गावे समजा आपण घेतली. सेकंड फेजमध्ये जर घेतली. परंतु आता हे शक्य नाही. कारण त्यावेळेस पोमण साहेबांनी कोणाला कळू दिले नाही. तरी ही परिस्थिती सभागृहाला पण कळणे गरजेचे आहे. यावर ज्यावेळेस मतदान झाले त्यावेळेस सभागृहातल्या १२८ नगरसेवकांना मी विचारु इच्छितो. सभागृहातल्या कुठल्याही नगरसेवकाला माहिती झालं. कुठल्या प्रभागात मतदान झालं. कोणी कोणी मतदान केले. कुठल्या नगरसेवकांला स्मार्टसिटीचे अधिकारी किंवा आयुक्तांनी येऊन सांगितल का तुमच्या प्रभागामध्ये मतदान आहे. स्मार्टसिटीमध्ये तुमची निवड होणार आहे. राजू मिसाळ आहेत आमचे. मला वाटतं प्राधिकरणामध्ये जास्त मतदान झालं होतं. आम्ही कुत्र्याचा विषय काढलेला नाही. मला परत काढावा लागेल. म्हणून मला वाटतं की वाकड आणि पिंपळे निलख घेऊन मतदान केलेले आहे, हे चुकीचे आहे. पण प्राधिकरणाच्यामध्ये पहिले एक नंबर मतदान प्राधिकरणामध्ये झाले असताना तिथे न होता ही स्मार्टसिटी खरतर वशिल्याने केली का कोणी तिकडे वळवून नेली. माझी आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की जे झाले ते झाले. आता त्याच्यामध्ये काय बदल होणार नाही आम्हाला पण माहिती आहे. पण महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की आपण या येणा-या पुढच्या टप्प्यामधला जो सेकंड फेज आहे. त्या सेकंड फेजमध्ये ग्रामीण भागातचा समावेश करावा किंवा आपल्या भागातला जो एरिया डेव्हलप झालेला आहे. मग भोसरी असेल, चिखली असेल, मोशी असेल किंवा दिघी असेल. आकुर्डी असेल प्राधिकरण आलं ना त्याच्यामध्ये. मी पहिलं प्राधिकरण म्हटलं होतं. फक्त ते जॉईन एकत्र केल्यामुळे प्राधिकरणाचा भाग बाहेर गेला. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की येणा-या स्मार्टसिटीमध्ये आपला हा जो परिसर आहे तो चांगला झाला. डेव्हलप झालेला परिसर जर तुम्ही डेव्हलप करायला निघाले तर नक्कीच स्मार्ट काय करायचे ते आम्हाला कळालेले नाही. स्मार्ट केलेल्या सिटीलाच तुम्ही परत स्मार्ट करीत असाल तर एखादा ग्रामीण पट्टा जर घेतला स्मार्ट

करावा असे मी या निमित्ताने सांगतो. मतदानामध्ये मी अध्यक्ष महोदयांना पुन्हा एकदा सांगतो की जे त्या गावामध्ये घडलेले आहे. स्मार्ट सिटीमध्ये प्रत्येक नगरसेवकाला विश्वासात घेऊन जो तुम्हाला परत एकदा जो ढोबळ एरिया कसा घ्यायचाय. त्या भागात मतदान घेतले आता जो आयटीपार्क एरिया होता, त्या आयटीपार्कवाल्यांनी मतदान केले, सगळे केले. पण जो शेतकारी आमचा परिसर ग्रामीण आहे. त्याला मेल पण माहित नाही, मतदान पण माहिती नाही. त्याचे पुढे काय झाले ते पण माहिती नाही. त्याच्यापर्यंत स्मार्टसिटी पोहचतील काय. मग तो भाग मतदानामध्ये घेतला नाही म्हणून आमची विनंती आहे की ज्यावेळेस हे सगळे प्रकल्प करीत असताना पुन्हा पुन्हा आपल्याला महापौर का सांगतोय. कारण आता आपल्याला तसा एरिया डेव्हलप करणे गरजेचे आहे. त्यामुळे तुम्ही तो परिसर घ्यावा अशी विनंती करतो, चिटींग न करता. दोनदोन गावे एकत्र न करता, दोनदोन शहरे एकत्र न करता विभागवाईज मतदान घ्यावे. लकी ड्रॉ करुन करावे अशी मी महापौर साहेब आपल्याला विनंती करतो. आपले शहर ऑलरेडी स्मार्ट आहे. तुम्हीही स्मार्ट आहात असं सगळे म्हणतात. महापौर आपल्याला विनंती आहे की आपण सगळयांना स्मार्टसिटीमध्ये एकत्र करुन त्यांचे विचार किंवा त्यांचे सजेशन्स त्यांना विश्वासात घेऊन स्मार्टसिटीचा विषय आपण येथून पुढच्या काळामध्ये विश्वासात घेऊन काम करावे. असं आपल्याला आयुक्त साहेब आणि महापौर साहेब सांगतो आणि थांबतो, धन्यवाद .

**मा. संदिप कस्पटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह खरतर या स्मार्टसिटी संदर्भात ऑनलाईन ओटींग झाले होते. तर सर्वात जास्त ओटींग आमच्या वाकड आणि पिंपळे निलख या प्रभागातुन झाले होते. कारण सर्वात जास्त आयटीएन्स आमच्या प्रभागामध्ये राहतात. मोठमोठे गृहप्रकल्प याठिकाणी आहेत. सर्वात जास्त टॅक्सपेअर्स या प्रभागामध्ये राहतात. महापौरसाहेब, ज्यावेळेस ओटींग झाले आणि त्यानंतर हा मॉडेल वॉर्ड पिंपळे सौदागर आणि पिंपळेगुरवला कसं गेलं. हे फक्त पोमणसाहेबच सांगू शकतील असं मला वाटत. खरतर आयुक्त साहेब वाकड आणि पिंपळे निलख या प्रभागाला लागून पुणे महानगरपालिकेची हद्द आहे. पुणे महानगरपालिकेचे औध, बालेवाडी आणि बाणेर हे प्रभाग आमच्या वॉर्डाला जोडून आहेत. खरतर आता याठिकाणी मा. महापौर साहेब त्यांनी चांगले रस्ते केलेत.

एलईडीलाईन, जॉगींग ट्रॅक, सायकलींग ट्रॅक त्याठिकाणी गेल्यानंतर फॉरेनला गेल्यासारखे फील होते. आणि त्या उलट आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये आपण आलो नुसता पुल ओलांडून जरी आलो तरी ग्रामपंचायत असल्यासारखे वाटते. तर ख-या अर्थाने वाकड आणि पिंपळे निलख हया प्रभागासाठी मॉडेल वॉर्ड व्हावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा.महापौर -** सर्व सदस्यांना मी सुचवितो की स्मार्ट सिटी योजनेमध्ये टप्प्याटप्प्याने संपूर्ण शहराचा विकास करण्याचा आराखडा तयार करुन तीन महिन्यामध्ये सभागृहामध्ये सादर करावा. प्रत्येक सदस्याला वाटते की माझा प्रभाग हा स्मार्ट झाला पाहिजे आणि प्रत्येक जनतेला वाटते की माझे शहर स्मार्ट झाले पाहिजे. येत्या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये आपण स्मार्टसिटीचा पूर्ण आराखडा या सभागृहासमोर सादर करावा.

**मा. नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - २८७ विषय क्रमांक – १५

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
मातंवि/२/कावि/३०/१८ दि.८/०८/२०१८
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २६५ दि.६/०९/२०१८

केंद्र शासनामार्फत नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी स्वच्छ, शाश्वत व पर्यावरण पुरक शहरे तयार करण्यासाठी "स्मार्ट सिटी अभियान" या महत्वकांक्षी अभियानाची घोषणा मा. प्रधानमंत्री महोदयांच्या हस्ते दि. २५/०६/२०१५ रोजी करणेत आलेली होती.

केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार Smart City Proposal तयार करणेकरिता चार मुख्य पर्याय सुचवले आहेत. १) Retrofitting २) Redevelopment ३) Green Field आणि ४) १ ते ३ पैकी पर्यायांचा एकत्रित अवलंब करणे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने Retrofitting या पर्यायाचा प्राधान्याने वापर करून Smart

City Proposal तयार केलेले आहे. महानगरपालिकामार्फत तयार करणेत आलेल्या Smart City Proposal मध्ये प्रामुख्याने Area Based Development (ABD) आणि Pan City Solutions हे दोन घटक असून त्यांचे करीता एकूण र.रू.११४९.२ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पांचा समावेश आहे. त्यापैकी Area Based Development (ABD) चे अंतर्गत एकूण र.रू.५९३.६७ कोटी इतक्या व Pan City Solutions अंतर्गत एकूण र.रू ५५५.५३ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पांचा समावेश करणेत आलेला आहे.

केंद्र शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी अभियानांतर्गत तिस-या फेरीत निवड केलेनंतर राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरीता विशेष उद्देश वहन(एस.पी.व्ही) स्थापन करणेबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. स्मार्टसि-२०१६/प्र.क्र.५०३/नवि -२३ दि.९ जानेवारी २०१७ अन्वये मान्यता दिलेली असुन महानगरपालिकेने विशेष उद्देश वहन(एस.पी.व्ही) चे तात्काळ गठन करणेकामी निर्देश दिलेले होते व महाराष्ट्र शासनाकडुन निश्चित केलेल्या अटी शर्तीनुसार दि. १३ जुलै २०१८ रोजी " पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड " या नावाने विशेष उद्देश वहन स्थापन करणेत आलेली आहे.

केंद्र शासनाने घोषित केलेल्या स्मार्ट सिटी अभियानाचा कालावधी पाच वर्ष असुन या योजनेत प्रत्येक पात्र शहराला पाच वर्षाच्या कालावधीत अंदाजे रु. ५०० कोटींचे केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होणार असुन राज्य शासनाचा अनुदान हिस्सा रु. २५० कोटी व महानगरपालिकेचा स्वहिस्सा अंदाजे रु. २५० कोटी द्यावा लागेल. याप्रमाणे अभियानाचे पाच वर्ष कालावधीत महानगरपालिकेस अंदाजे एकुण र.रु १००० कोटी पर्यंतचे प्रकल्प स्मार्ट सिटी अभियानाचे निर्देशानुसार पुर्ण करावे लागतील. त्यामध्ये शहरातील नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा, खात्रीशीर वीज पुरवठा, शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, कार्यक्षम शहरी दळणवळण व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सक्षम इंटरनेट सुविधा, शहरी आरोग्य आणि शिक्षण सुविधा, ई-गर्व्हनन्स व नागरिकांचा सहभाग, शाश्वत पर्यावरण, नागरिकांची सुरक्षा व संरक्षण इ. घटकांचा समावेश असेल. या सर्व बाबींचा समावेश करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्मार्ट

सिटी प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे दि. ३१/३/२०१७ रोजी सादर करणेत आलेले आहे. त्यास मा. महापालिका सभेने ठराव क्र. २९ दि.१९/०७/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तथापी, वरील प्रकल्प स्मार्ट सिटी कंपनीमार्फत राबविताना महापालिकेच्या मालकीच्या जागा, रस्ते, उद्याने, विद्युत पोल, मनपा हद्दीतील चौक, शाळा, इमारती व इतर मालमत्तांचा वापर करणे आवश्यक आहे.

सबब, स्मार्ट सिटी योजने अंतर्गत PAN City प्रकल्प व Area Based Development (ABD) प्रकल्प राबविणेकामी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड या विशेष उद्देश वहनास मनपाच्या मालकीची जागा, रस्ते, उद्याने, विद्युत पोल, मनपा हद्दीतील चौक, शाळा, इमारती व इतर मालमत्तांचा वापर करणेस मान्यता मिळणेकामी व त्याअनुषंगीक परवानगी देणेचे अधिकार पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीस देणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी स्मार्ट सिटी योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजूर केलेल्या स्मार्ट सिटी आराखडयातील PAN City प्रकल्प व Area Based Devlopment (ABD) प्रकल्प राबविणेकामी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमीटेड या विशेष उद्देश वहनास मनपाच्या मालकीची जागा, रस्ते, उदयाने, विदयुत पोल, मनपा हद्दीतील चौक, शाळा, इमारती व इतर मालमत्तांचा वापर करणेस मान्यता देणेकामी व त्याअनुषंगीक परवानगी देणेचे अधिकार पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमीटेड कंपनीस देणे ऐवजी उक्त सर्व अधिकार मा.आयुक्त सो., पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना देणेस मान्यता देणेत येत आहे तसेच स्मार्ट सिटीच्या आराखडया व्यतिरीक्त कामे स्मार्ट सिटी एस.पी.व्ही. मार्फत राबवावयाचे ठरल्यास प्रस्ताव परत सर्वसाधारण सभेसमोर आणणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अंबरनाथ कांबळे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १६

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.नरवि/कावि/ ३६/१७४/२०१८ दि.०५/०७/२०१८

मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.६३ येथे मंजूर विकास आराखडयानुसार श्री.कवडे यांचे घरापासून कांकरीया गॅस गोडाऊन असा दक्षिणोत्तर १२ मी रुंदीचा रस्ता आहे. सदर रस्त्याची लांबी ३३५ इतकी मी. आहे. व जागेवर सुमारे १३७ मी अंतरामध्ये घरे असुन सदर घरे सुमारे ३.०० मी इतके रस्ता रुंदीने बाधित होत आहे. व उर्वरीत जागेत पूर्णत: १२ मी रस्ता विकसीत झालेला आहे.

सदर रस्ता रुंदीने बाधीत नागरिकांनी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये नोटीस पाठविली आहे. सदर नोटीसीनुसार २४ महिने कालावधीत सदर जागेचे भूसंपादन करावे लागणार आहे.

तरी स.नं.६३ मधील १२ मी रस्त्याचे सुमारे १३७ मी लांबीतील सुमारे ३ मी प्रमाणे भुसंपादन तातडीने करावे लागणार आहे सदर क्षेत्राचा भुसंपादनाने ताबा घ्यावयाचा असल्याने सदर भुसंपादनकामी येणा-या सर्व खर्चास व त्यासंबधीत इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २८८ विषय क्रमांक – १६

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.नरवि/कावि/ ३६/१७४/२०१८ दि.०५/०७/२०१८

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १७

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्र.लेखा/०८/कावि/ ९९१३/२०१८ दि.३०/०८/२०१८

मा.सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षण रायगड भवन,सातवा मजला, नवी मुंबई-४००६१४ (शासकीय ऑडीट) यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाचे सन २०१३-१४ या कालावधीचे लेखापरिक्षण पूर्ण केलेले असून त्यांनी त्यांचे अहवालामध्ये एकत्रित १२२ परिच्छेद उपस्थित केलेले आहेत. त्याकामी संबंधित विभागांकडून परिच्छेदाची पूर्तता करून घेणेत आलेली आहे. सदर अहवाल व त्यातील परिच्छेदाचे प्राप्त अनुपालन अवलोकनार्थ नगरसचिव विभागात ठेवले आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम १० (१) अन्वये मा.सहसंचालक ( म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षा, नवी मुंबई यांचेकडील अनुपालन पूर्तता अहवाल सादर करणेकामी मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ चा विचार माहे डिसेंबर २०१८ चे सभेत करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २८९ विषय क्रमांक – १७

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्र.लेखा/०८/कावि/ ९९१३/२०१८ दि.३०/०८/२०१८

विषय क्रमांक १७ चा विचार माहे डिसेंबर २०१८ चे सभेत करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १८

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्र.मसाभां/५/कावि/ ३८४/२०१८ दि.३१/०८/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयाकरीता Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System ही मशीन ई-निविदा सुचना क्रमांक-17/2011-2012 मागवून मे. मनाली एंटरप्रायझेस यांनी सादर केलेले

दर स्विकृत करुन ( कमी केलेल्या दरानुसार ) खरेदी करणेकामी मा.स्थायी समिति ठराव क्रमांक - 48, दिनांक 17/04/2012 अन्वये मे. मनाली एंटरप्रायझेस यांचेड्रून प्राप्त झालेल्या ई-निविदा दरामध्ये कमी करुन दिलेल्या दरानुसार करारनामा करुन खरेदी करण्यास व येणा-या र.रु. 2,79,24,750/- चे खर्चास मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मे. मनाली एंटरप्रायझेस यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयाकरीता Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System पुरवठयाकामी मे. मनाली एंटरप्रायझेस यांना मसाभां/5/कावि/348/2012, दिनांक 31/05/2012 अन्वये आदेश देण्यात आला होता. आदेशात नमुद केलेनुसार मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी मशिनचा पुरवठा दिनांक ०१/१२/२०१२ रोजी केलेला आहे. सदर मशिनचे दिनांक ३०/०१/२०१३ रोजी इनस्टॉलेशन केलेले आहे. मशिनचे इनस्टॉलेशन झालेनंतर मशिन कार्यरत होती. तथापि काही कारणास्तव मशिन बंद असलेने Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System ह्या मशीनची ई-निविदेत नमुद केलेले स्पेशिफिकेशन प्रमाणे तांत्रीक तपासणी मा.प्रोफेसर, इन्स्ट्रूमेंटेशन अण्ड कंट्रोल,कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून करुन घेण्यात आलेली आहे. त्यांनी अहवालानुसार संबंधित ठेकेदाराकडून दुरुस्ती करुन घेण्यात येवून मशिन चालू करण्यात आलेली होती. तथापि काही कालावधी नंतर सदरची मशिन कुलिंग सिस्टिम अभावी बंद होती. वाय. सी.एम. रुग्णालयात उपलब्ध करुन दिलेली एच.बी.ओ.टी. मशिन कुलिंग सिस्टीम बंद असलेने मशिन बंद स्थितीत असलेने दिनांक २५/०४/२०१५ रोजी मे.कास्को इंडस्ट्रीज प्रा.लि. यांनी दिलेल्या सर्व्हिस रिपोर्ट नुसार मे.मनाली एंटरप्रायझेस यांचेकडून सदर मशिनकरीता आवश्यक लागणारे स्पेअर पार्टस् खरेदीकामी कोटेशन सादर केलेले होते. एच.बी.ओ.टी मशिन दुरुस्त करणेकामी र.रु. ७,१७,५००/- इतका अपेक्षित खर्च येणार असल्याने प्रस्ताव सादर करुन त्यास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-१८२५७, दिनांक २९/११/२०१६ अन्वये एच.बी.ओ.टी. मशिन दुरुस्त करणेकामी आवश्यक स्पेअर पार्टसचा पुरवठा करुन दुरुस्त करणेकामी मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी सादर केलेल्या कोटेशनमधील कमी करुन दिलेल्या र.रु. ७,१७,०००/- चे खर्चास मान्यता दिलेली होती. मा.स्थायी समिती ठरावाच्या अनुषंगाने मे.मनाली एंटरप्रायझेस यांना पत्र क्र.YCMH/भां/२/कावि/३५४/२०१६, दिनांक ३०/१२/२०१६ अन्वये नोटराईजड प्रतिज्ञापत्र, करारनामा व आवश्यक एफ.डी.आर. जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी दिनांक ०१/०३/२०१७ रोजी करारनामा करुन दिलेला आहे. सदरचा करारनामा दिनांक ०२/०३/२०१७ रोजी मा.स्थायी समिती कार्यालयाकडे सील करणेकामी पाठविण्यात आला होता. दिनांक ३०/०६/२०१७ पर्यंत

करारनामा सील झालेला नसलेने एच.बी.ओ.टी. मशीनचा दुरुस्ती आदेश निर्गत करण्यात आला नव्हता. तसेच पुर्वीच्या दरपत्रकाची वैधता संपल्यापमुळे संबंधित प्रक्रिया रद्द करुन त्रयस्थ संस्थेची एच.बी.ओ.टी. मशीन चालविणेकामी नेमणूक करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता.

मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन चालविणेस देणेकामी Expression of Interest वृत्तपत्राचे विशेष रोटेशन घेवून प्रसिध्द करण्यात आले होते. त्या अनुषंगाने मे. बॅरोमेडिक हेल्थकेअर प्रा. लि. व मे. ऍडव्हेंट हेल्थकेअर यांचे मार्फत प्रस्ताव प्राप्त झालेले होते. सदर प्रस्तावाचा विचार करुन वाय. सी. एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन कार्यान्वित करुन चालविणेस देणेकामी मे.क्रिसिल इन्फ्रास्ट्रक्चर सोल्यूशनस प्रा. लि., यांचे मार्फत RFP तयार करण्यात आलेली आहे. Y.C.M. Hospital करीता उपलब्ध करुन दिलेली HBOT मशिन महागडी असून तिचा वापर होणे आवश्यक आहे. सदयस्थितीत वाय.सी.एम. रुग्णालय येथे प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता असले मुळे HBOT मशिन चालविणे शक्य होत नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ (ब) नुसार Request for Proposal Selection of Operator for Operation and Maintenance of the existing HBOT centre at Y.C.M. Hospital साठी ई-निविदा प्रसिध्द करण्याकरीता मा. महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे.

सबब, वाय. सी. एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन चालविणेस देणेकामी M/s. Crisil यांनी Request for Proposal Selection of Operator for Operation and Maintenance of the existing HBOT centre at Y.C.M. Hospital चा मसुदा सादर केलेला असून Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System ही मशीन चालविणेस देणेची ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शितल उर्फ विजय शिंदे** – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २९० विषय क्रमांक – १८

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्र.मसाभां/५/कावि/३८४/२०१८ दि.३१/०८/२०१८

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.माधवी राजापुरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १९

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र

क्र.स्वभाअक/३/कावि/२७६/२०१८ दि.६/०९/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-

याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०८/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

| महानगरपालिकेचे नाव | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | शेरा |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १४६५४ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १४४०१ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ११४८९ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१०९८२ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ७२९१<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३६९१ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ८०७२ लाभार्थी | GOI+GOM =४८४.३२लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १६१.४४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | एकुण | ६४५.७६ लाख | |

| | | | |
|---|---|---|---|
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ७१६२ लाभार्थी | GOI+GOM =४२९.७२लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१४३.२४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | एकुण | ५७२.९६ लाख | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

**मा.चंदा लोखंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडतो- मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२६२६ दि.०२/०५/२०१८ अन्वये घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे या कामासाठी १) अ व फ क्षेत्रीय कार्यालय २) ब व ड क्षेत्रीय कार्यालय ३) क व इ क्षेत्रीय कार्यालय ४) ग व ह क्षेत्रीय कार्यालय या प्रमाणे ४ फेरनिविदा त्वरीत काढण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत नि.नो.क्र. ०५/०१/२०१८-१९ (अ व फ क्षेत्रीय कार्यालय) नि.नो.क्र. ०५/०२/२०१८-१९ (ब व ड क्षेत्रीय कार्यालय), नि.नो.क्र. ०५/०३/२०१८-१९ (क व ई क्षेत्रीय कार्यालय), नि.नो.क्र. ०५/०४/२०१८-१९ (ग व ह क्षेत्रीय कार्यालय) याप्रमाणे ४ निविदा महाराष्ट्र शासनाचे वेबसाईटवर दि.१७/०९/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत. सदर ८ वर्षे कालावधीकरीता काढलेल्या निविदेस व त्याकामी पुढील ८ वर्षे कालावधीकरीता येणा-या अंदाजे र.रु. ५७० कोटीच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ (ब) नुसार प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.शितल उर्फ विजय शिंदे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा. माधवी राजापूरे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – २९१ विषय क्रमांक – १९

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र

क्र.स्वभाअक/३/कावि/२७६/२०१८ दि.६/०९/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०८/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र “अ”

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या | १४६५४ | |

| | | | |
|---|---|---|---|
| कुटुंबांची संख्या | | | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १४४०१ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ११४८९ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण- १०९८२ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ७२९१ सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३६९१ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ८०७२ लाभार्थी | GOI+GOM =४८४.३२लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १६१.४४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६४५.७६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ७१६२ लाभार्थी | GOI+GOM =४२९.७२लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१४३.२४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५७२.९६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२६२६ दि.०२/०५/२०१८ अन्वये घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे या कामासाठी १) अ व फ क्षेत्रीय कार्यालय २) ब व ड क्षेत्रीय कार्यालय ३) क व इ क्षेत्रीय कार्यालय ४) ग व ह क्षेत्रीय कार्यालय या प्रमाणे ४ फेरनिविदा त्वरीत काढण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत नि.नो.क्र. ०५/०१/२०१८-१९ (अ व फ क्षेत्रीय कार्यालय) नि.नो.क्र. ०५/०२/२०१८-१९ (ब व ड क्षेत्रीय कार्यालय), नि.नो.क्र. ०५/०३/२०१८-१९ (क व ई क्षेत्रीय कार्यालय), नि.नो.क्र. ०५/०४/२०१८-१९ (ग व ह क्षेत्रीय कार्यालय) याप्रमाणे ४ निविदा महाराष्ट्र शासनाचे वेबसाईटवर दि.१७/०९/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत. सदर ८ वर्षे कालावधीकरीता काढलेल्या निविदेस व त्याकामी पुढील ८ वर्षे कालावधीकरीता येणा-या अंदाजे र.रु. ५७० कोटीच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ (ब) नुसार प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २९२ विषय क्रमांक – २०

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दिनांक ०३/०८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २९३ विषय क्रमांक – २१

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

अ) दिनांक ०७/०८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २१/०८/२०१८ व दि.२७/०८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २९४ विषय क्रमांक – २२

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दिनांक १०/०७/२०१८ व दिनांक २४/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २४/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक १४/०८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २९५ विषय क्रमांक – २३

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

अ) दिनांक २७/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २९६ विषय क्रमांक – २४

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>.शिक्षण समिती</u>**

**अ)** दिनांक ०२/०८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १६/८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २५

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र. नस/४/कावि/६१०/२०१८ दि.१८/९/२०१८

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा.उपकुलसचिव, निवडणूक विभाग यांचेकडील पत्र क्र.साफुपुविनि/८८२/२०१८, दिनांक – १४ सप्टेंबर २०१८ चे कृपया अवलोकन होणेस विनंती. सदर पत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(म) (२८)(२)(y) नुसार मा.कुलगुरुंनी विद्यापीठ क्षेत्रातील नगरपालिका/महानगरपालिकांच्या सदस्यांपैकी एका सदस्याचे विद्यापीठ अधिसभेवर एक वर्षासाठी चक्रक्रमाने नामनिर्देशन करण्याची तरतूद असल्याचे कळवून त्यासाठी आपल्या महानगरपालिका सदस्यांपैकी किमान पदवीधर असलेल्या सदस्याची माहिती विहित नमुन्यात तात्काळ विद्यापीठाच्या निवडणूक विभागाकडे पाठविणेबाबत कळविले आहे.

सबब पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे एक वर्षासाठी किमान पदवीधर असलेल्या एका सदस्याचे नामनिर्देशन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे एक वर्षासाठी किमान पदवीधर असलेल्या मा.शर्मिला राजू बाबर या सदस्याचे नामनिर्देशन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव कमांक – २९७ विषय क्रमांक – २५

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र. नस/४/कावि/६१०/२०१८ दि.१८/९/२०१८

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा.उपकुलसचिव, निवडणूक विभाग यांचेकडील पत्र क्र.साफुपुविनि/८८२/२०१८, दिनांक – १४ सप्टेंबर २०१८ चे कृपया अवलोकन होणेस विनंती. सदर पत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(म) (२८)(२)(y) नुसार मा.कुलगुरुंनी विद्यापीठ क्षेत्रातील नगरपालिका/महानगरपालिकांच्या सदस्यांपैकी एका सदस्याचे विद्यापीठ अधिसभेवर एक वर्षासाठी चक्रक्रमाने नामनिर्देशन करण्याची तरतूद असल्याचे कळवून त्यासाठी आपल्या महानगरपालिका सदस्यांपैकी किमान पदवीधर असलेल्या सदस्याची माहिती विहित नमुन्यात तात्काळ विद्यापीठाच्या निवडणूक विभागाकडे पाठविणेबाबत कळविले आहे.

सबब पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे एक वर्षासाठी किमान पदवीधर असलेल्या मा.शर्मिला राजू बाबर या सदस्याचे नामनिर्देशन करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव कमांक – २९८ विषय क्रमांक – २६

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र/कावि/३२८/१८ दि.१९/०९/२०१८

मा.मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. ईएलआर२०१८/प्र.क्र.३५१/३३ दि.१० मे २०१८ नुसार दि.०१ जानेवारी २०१९ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषीत केला आहे. त्यानुषंगाने २०६ पिंपरी (अ.जा.) विधानसभा मतदार संघाच्या एकूण ३९९ यादी भागामधील स्थलांतरित, दुबार, मयत मतदारांची वगळणीचे काम सुरु आहे. सदर कार्यक्रमा दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे मार्फत स्थलांतरित दुबार मतदारांना नोटीसा बजावण्यात अल्या होत्या. या नोटीसा बजावून प्राप्त झालेले जबाब, पंचनामे याची छाननी करुन २०६ पिंपरी (अ.जा) विधानसभा मतदार संघामधील पहील्या टप्प्यामध्ये सोबत सादर केलेल्या CD मधील यादीनुसार संबंधित यादी भागातील ४६४५ मतदार वगळणीस पात्र आहेत.

सदर प्रस्तावित ४६४५ मतदारांच्या नावाची प्रसिध्दी मा.मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य, मा.जिल्हाधिकारी पुणे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका या तीनही Website वर अवलोकनासाठी उपलब्ध ठेवण्यात येणार आहे.

या वगळणी कार्यक्रमाच्या व्यापक प्रसिध्दीचा भाग म्हणून प्रस्तावित वगळणी करण्यात येणारे मतदाराची यादी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

या प्रस्तावित वगळणीच्या अनुषंगाने व्यापक प्रसिध्दीचा एक भाग म्हणून सदर वगळणी प्रस्तावस मान्यता देणेत येत आहे.

या संपुर्ण प्रक्रियेत कालमर्यादा दिलेली आहे. त्यामुळे सोबत सादर केलेल्या वगळणी प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव कमांक – २९९ विषय क्रमांक – २७

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.
वायसीएमएच/८ड/कावि/२२६/२०१८ दि. १८/०९/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये नियोजित पदव्युत्तर संस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. याकामी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक ०४ मार्च २०१४. अन्वये विविध संवर्गातील एकूण ११८ पद निर्मितीस मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये अधिष्ठाता (गट ‘अ’) या एका पदास मंजुरी दिलेली आहे.

नियोजित पदव्युत्तर संस्थेकरीता अधिष्ठाता (गट‘अ’) हे पद ३ वर्षे कालावधीकरीता एकत्रित मानधनावर भरणेकामी मा. अति. आयुक्त यांनी दिनांक ११/०७/२०१८ चे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर पद भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात क्र. ५७/२०१८ दिनांक १३/०७/२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असुन दि.१६/०७/२०१८ ते ०१/०८/२०१८ पर्यंत अर्ज स्विकारण्यात आलेले आहेत. सदर पदाकरीता एकूण ०७ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क. | अर्जदाराचे नाव | अर्ज प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| १ | डॉ.मारोती राजाराम गायकवाड | २३/०७/२०१८ |
| २ | डॉ. ललीत पुनमचंद उने | २४/०७/२०१८ |
| ३ | डॉ. सुरेश के. जरीवाला | २६/०७/२०१८ |
| ४ | डॉ. राजेंद्र नामदेव वाबळे | ३०/०७/२०१८ |
| ५ | डॉ. अमृत ए. महाजन | ३०/०७/२०१८ |
| ६ | डॉ. राम चंद्र गोयल | ३०/०७/२०१८ |
| ७ | डॉ. मुकुंद सैदाजी डिग्गीकर | ०१/०८/२०१८ |

सदर प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन, मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी तयार करणे, उमेदवारांच्या मुलाखती घेणे यासाठी दिनांक १८/०८/२०१८ रोजी निवड समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर पदभरतीचे मुलाखतीस दिनांक ३१/०८/२०१८ रोजी उमेदवारांना व निवड समिती मध्ये सदस्य म्हणून नियुक्ती केलेल्या संबंधित अधिकारी यांना उपस्थित राहणे बाबत दिनांक २१/०८/२०१८ रोजी या कार्यालया मार्फत स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करुन तसेच ईमेलद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार निवड समितीतील सदस्य दिनांक ३१/०८/२०१८ रोजी अधिष्ठाता (गट-अ) या पदभरतीचे मुलाखतीसाठी उपस्थित राहिलेले होते.

दिनांक.१८/०८/२०१८ रोजीचे मान्य प्रस्तावान्वये गठीत केलेल्या निवड समिती मार्फत सदर प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन दिनांक ३१/०८/२०१८ रोजी मुलाखतीसाठी उपस्थित राहिलेल्या खालील ३ उमेदवारांच्या मुलाखती घेणेत आलेल्या आहेत.

| अ.क. | अर्जदाराचे नाव |
|---|---|
| १ | डॉ. मारोती राजाराम गायकवाड |
| २ | डॉ. ललीत पुनमचंद ठने |
| ३ | डॉ. राजेंद्र नामदेव वाबळे |

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ३ उमेदवाराच्या मुलाखती घेऊन अधिष्ठाता (गट'अ') या पदासाठी जाहिराती मध्ये नमुद असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर बाबी विचारात घेऊन निवड समिती मार्फत उपरोक्त ३ उमेदवारांपैकी खालील उमेदवाराची अधिष्ठाता (गट 'अ') पदासाठी निवड केलेली आहे.

| अ.**क.** | **नाव** |
|---|---|
| १ | **डॉ. राजेंद्र नामदेव वाबळे** |

सदर उमेदवाराची अधिष्ठाता (गट 'अ') या पदावर अस्थायी अस्थापनेवर ३ वर्षे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करावयाची असल्याने त्यांना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक ०४ मार्च २०१४. सोबतचे परिशिष्ट मध्ये नमुद असलेल्या वेतनश्रेणी ३७४००-६७००० अके ग्रेड पे १०००० नुसार येणारे व जाहिरातीत नमुद केले प्रमाणे तसेच सोबतचे प्रपत्र 'अ' नुसार दरमहा एकत्रित मानधन र. रु. १,६७,९५०/- अदा करावे लागणार आहे.

पी.सी.एम.सी (वाय.सी.एम.एच) व एम. यु. एच. एस. पी. जी. इन्स्टिटयुट या लेखाशिर्षासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता एकुण ८,५०,००,०००/- इतकी तरतुद केलेली आहे. सदर लेखाशिर्षावर उपलब्ध असलेल्या शिल्लक रक्कमेमधुन सदरचा खर्च करण्यात येईल.

डॉ. राजेंद्र नामदेव वाबळे यांची अधिष्ठाता (गट 'अ') या पदावर जाहिरातीत नमुद केलेल्या विहित अटी व शर्ती नुसार अस्थायी अस्थापनेवर ३ वर्षे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर नियुक्ती करणेकामी तसेच त्यांना मानधनापोटी दरमहा र.रु.१,६७,९५०/- (अक्षरी र.रु एक लाख सदुसष्ठ हजार नऊशे पन्नास फक्त) अदा करावयाचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव कमांक – ३०० विषय क्रमांक – २८

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.वायसीएमएच/कावि/८ड/२२९/२०१८ दि.१९/०९/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विविध संवर्गातील ११८ पदांना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक ०४ मार्च २०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक या पदनामास मंजुरी दिलेली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पदव्युत्तर संस्थेत प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक ही पदे भरणेकामी महापालिका सभेने ठराव क्र. ८६, दि.१६/१०/२०१७ नुसार विविध संवर्गातील ५३ पदे ३ वर्षे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर भरणेकरीता मान्यता दिलेली आहे. सदर पदांपैकी भरलेली पदे व रिक्त राहिलेली पदे तसेच सदर संस्थेस आवश्यक असलेली पदे याबाबतचा विचार करुन ६२ पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात क्र. १३२६, दिनांक १३/०६/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर पदे भरण्याकरिता दिनांक १८/०६/२०१८ ते दिनांक ०३/०७/२०१८ अखेर उमेदवारांकडुन अर्ज मागविणेत आले होते. सदर कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जाची निवड समिती मार्फत छाननी करुन पात्र ठरलेल्या उमेदवारांना दिनांक ३०/०७/२०१८ ते दिनांक ०२/०८/२०१८ या कालावधीत मुलाखतीसाठी बोलावले होते. सदर उमेदवारांच्या मुलाखती घेऊन निवड समिती मार्फत विविध विषयातील उमेदवारांची निवड केलेली आहे.

मा.विधी समिती ठराव क्र. २६, दिनांक १५/०९/२०१७ व महापालिका सभा ठराव क्र. ८६ दिनांक १६/१०/२०१७ अन्वये विविध संवर्गातील ५३ पदे भरण्यासाठी मान्यता दिलेली आहे. सदर महापालिका सभा मान्यता प्राप्त विविधपदावर १० उमेदवारांची पदव्युत्तर संस्थेकरीता नियुक्ती करणेबाबतचे आदेश प्राक्रिया कार्यान्वित आहे. त्यामुळे निवड समितीने निवड केलेल्या ०६ विषयातील उर्वरीत ११ उमेदवारांची पदव्युत्तर संस्थे करीता नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर पदांना यापुर्वी मा.महापालिका सभेची मान्यता घेतलेली नसल्याने सोबतचे प्रपत्र' 'अ' मध्ये नमुद असलेल्या विविध ०६ विषयातील पदांवर ११ उमेदवारांच्या नियुक्तीबाबत मा.महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे.

तसेच पदव्युत्तर संस्था उभारणीसाठी शासन मान्य अध्यापकांच्या पदांपैकी प्रपत्र 'ब' प्रमाणे विषयवार व संवर्गनिहाय १६ पदे रिक्त आहेत.

प्रपत्र 'अ' मधील  नेमणूक करावयाची ११ पदे तसेच प्रपत्र 'ब' मधील रिक्त असलेली शासन मान्य आवश्यक विविध विषयाची १६ पदे ३ वर्षे कालावधीकरीता भरणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर पदांना महापालिका सभेची मान्यता प्राप्त झाल्यावर सदर पदभरतीमुळे पदव्युत्तर संस्थेच्या उभारणीस मदत होणार आहे.

सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये नमुद असलेल्या एकुण ११ विषयावर अध्यापकांची नियुक्ती करुन त्यांना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. पीसीसी-३०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, दिनांक ०४ मार्च २०१४. सोबतचे परिशिष्ट मध्ये नमुद असलेल्या वेतनश्रेणीनुसार दरमहा एकत्रित मानधन अदा करावे लागणार आहे.

पी.सी.एम.सी. (वाय.सी.एम.एच.) व एम.यु.एच.एस.पी.जी. इन्स्टिटयूट या लेखाशिर्षासाठी सन २०१८-१९ या आर्थीक वर्षाकरिता एकूण ८,५०,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे. सदर लेखाशिर्षावर उपलब्ध असलेल्या शिल्लक रक्कमेमधुन

सदरचा खर्च करणेत येईल. सदर लेखाशिर्षावरील तरतूद अपुरी पडलेस संभाव्य खर्चासाठी सुधारीत अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणे आवश्यक असणार आहे.

प्रपत्र ‘अ’ मधील नेमणुक करावयाची ११ पदे तसेच प्रपत्र ‘ब’ मधील रिक्त असलेली शासनमान्य आवश्यक विविध विषयांची १६ पदे भरणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, सदर पदांना महापालिका सभेची मान्यता मिळाल्यानंतर सदर २७ पदांवर अध्यापकांची जाहिरातीत नमुद केलेल्या विविध अटिशर्तीनुसार अस्थायी अस्थापनेवर तीन वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात एकत्रीत मानधनावर नियुक्ती करणेकामी तसेच दरमहा मानधनापोटी सोबतचे प्रपत्र ‘क’ मध्ये नमुद केलेप्रमाणे एकुण र.रु. ३१,५०,०८०/- (अक्षरी रक्कम रुपये- एकतीस लाख पन्नास हजार ऐंशी फक्त) अदा करावयाच्या संभाव्य खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विलास मडिगेरी** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव कमांक – ३०१ विषय क्रमांक – २९

दिनांक – २७/०९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.
क्र.स्था/कावि/बीआरटीएस/७३०/२०१८
दि. १८/०९/२०१८.

स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत बीआरटीएस रस्त्यांची, उड्डाणपुल व ग्रेड सेपेरेटर बांधणेची कामे करणेत येतात. पुणे आळंदी, सांगवी किवळे व प्रजिमा-३१ या रस्त्याची रुंदीकरण व मजबुती करणाची कामे करणेत आलेली आहेत. तथापि न्यायालयीन बाबी अथवा इतर बाबींमुळे काही ठिकाणी रस्ता रुंदीकरणाची कामे करता

आलेली नाही. तथापि सद्यस्थितीत न्यायालयाचा निकाल लागल्यामुळे तसेच शासन/संस्था स्तरावरील निर्णय घेणेत आल्यामुळे पुणे आंळदी रस्ता व प्रजिमा -३१ या रस्त्याचे उर्वरीत ठिकाणचे रस्ता रुंदीकरण करता येऊ शकेल.

पुणे आंळदी रस्त्यावरील वडमुखवाडी फाटा ते चोविसावाडी फाटा येथील कृषी खात्याकडील ६०.०० मी. रुंदीच्या रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बाबत मा.संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था नागपुर यांचे कडील पत्र क्र. वनामती/बांधकाम/२५२५/२०१८, दि.१६/०८/२०१८ अन्वये प्राचार्य प्रादेशिक विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था पुणे यांना कळविणेत आले आहे. त्यानुसार त्यांनी दि.०७/०९/२०१८ अन्वये पुणे आळंदी ६०.००मी. रुंद रस्ता बाधित २७८९.०० चौ.मी. जागा हस्तांतरीस करणेस सहमती दिली असुन दि.१२/०९/२०१८ रोजी जागेचा ताबा दिला आहे. सदर ठिकाणी रस्ता रुंदीकरण करणे व नाल्याचे बांधकाम करणे या कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.सी.व्ही.कांड कन्स्लटंट प्रा.लि. यांनी राज्यस्तरीय दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास र.रु.२६,००,००,०००/- खर्च येणार आहे.

प्रजिमा -३१ या रस्त्यावरील भुमकर चौक ते मनपा हद्दीपर्यंतच्या रस्त्याची ६६३ चौ.मी. ताब्यात न आल्यामुळे येथे रस्ता रुंदीकरण करणेत आलेले नाही. तथापि मा.उच्च न्यायालय मुंबई येथिल न्यायालयीन अवमान याचिका क्र.१२४/२०१८ दि.०३/०८/२०१८ मा. न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे तेथिल जागेत रस्ता रुंदीकरणाचे काम करता येईल. प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार मे. इन्फ्रा किंग. कन्संल्टींग इंजि. प्रा.लि. यांनी, सदर ठिकाणी रस्ता रुंदीकरण करण्याच्या कामाचे राज्य स्तरीय दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास र.रु.२,८०,००,०००/- इतका खर्च येणार आहे.

सांगवी किवळे रस्त्यावरील साई चौक (जगताप डेअरी) ते पुनावळे चौका पर्यंत रस्त्यावरील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी स्टॉर्म वॉटर लाईन ही रस्त्याच्या कडेला फुटपाथ लगत टाकणे अपेक्षीत होते. तथापि तात्कालीन शहर अभियंता पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे सुचनेनुसार रस्त्याच्या मध्यभागी आल्यामुळे चेंबरसची नेहमी तुटफुट होत असुन ते खचण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे वाहने चालविताना त्रासदायक होत असुन नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. याबाबत

दि.२३/०८/२०१८ रोजी खासदार, आमदार व नगरसदस्य यांचे बैठकीत चर्चा झाली असुन सदर ठिकाणची स्टॉर्म वॉटर लाईन फुटपाथ लगत नव्याने टाकणे बाबत सर्वानुमते ठरले आहे. त्यानुसार सदरकामांचे मे.इन्फ्रा किंग सर्व्हिसेस प्रा. लि. यांनी राज्य स्तरीय दरसुची नुसार अदांज पत्रक तयार केले असुन त्यास र.रु.२०,५०,००,०००/- खर्च येणार आहे.

उपरोक्त उल्लेख केलेली तिन्ही कामांचा मनपाच्या सन २०१८-१९ अंदाजपत्रकात सामवेश नाही. सदर तिन्ही कामांना मनपा सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच सदर कामांना आवश्यक ती तरतुद बीआरटीएस विभागातील इतर कामांवर होणा-या वाढ /घट करुन करावी लागणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता घेणेची र.रु. | लेखाशिर्ष | पान क्र./ अ.क्र. | सन २०१८-१९ ची तरतुद | वाढ र.रु | घट र.रु. | सन २०१८-१९ चा सुधारित अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे आळंदी रस्त्यावरील वडमुखवाडी फाटा ते चोविसावाडी फाटा येथील कृषी खात्याकडील ताब्यात आलेल्या जागेवर रस्ता रुंदीकरण व नाल्याचे बांधकाम करणे. | २६.०० कोटी | UTF अंतर्गत बीआरटीएस रस्त्यांची अनुषंगिक कामे | - | - | २.५० कोटी | - | २.५० कोटी |
| २ | प्रजिमा-३१ या रस्त्यावरील भुमकर चौक ते मनपा हद्दीपर्यंतच्या रस्त्यावरील सर्वे नं.८३ येथिल जागा मनपाच्या ताब्यात आल्याने तेथे रस्ता रुंदीकरण करणे. | २.८० कोटी | UTF अंतर्गत बीआरटीएस रस्त्यांची अनुषंगिक कामे | - | - | १.५० कोटी | - | १.५० कोटी |
| ३ | सांगवी किवळे | २०.५० | UTF | - | - | २.५० | - | २.५० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रस्त्यावरील साई चौक (जगताप डेअरी) ते पुनावळे चौक पर्यंतच्या रस्त्यावरील स्टॉर्म वॉटर लाईन रस्त्याकडेच्या कडेला फुटपाथ लगत टाकणे. | कोटी | अंतर्गत बीआरटीएस रस्त्यांची अनुषंगिक कामे | | | कोटी | | कोटी |
| ४ | सागंवी फाटा ते किवळे रस्तावर रक्षक चौक येथे सबवे बांधणे | १०.०० कोटी | UTF अंतर्गत बीआरटीएस रस्त्यांची अनुषंगिक कामे | ५२२/२० | ७.०० कोटी | - | ६,५०, कोटी | ५० लाख |
| | **एकुण-** | | | | ७.०० कोटी | ६.५० कोटी | ६.५० कोटी | ७.०० कोटी |

तरी वरील प्रमाणे प्रशासकीय मान्यता व नियोजित कामांना वाढ/घट द्वारे करावयाची तरतुद यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/५०२/२०१८
दिनांक - २७/११/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.